जानेवारी १९८७] [किंमत [illegible] रुपया

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



जानेवारी — १९८७

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान.
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक

श्री. रा. द. बन्ने

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

: कार्यकारी संपादक :

**प्रा. सौ. इंदिरा खेर**
एम.ए. पी.एच.डी.
(इंग्रजी आवृत्ती)

श्री. सदानंद चेंदवणकर
(मराठी आवृत्ती)

---

**वर्ष ६५ वे ]** **किंमत १ रुपया** **[ अंक १० वा**

**दूरध्वनी : ४१२ २५ ६१**

---

: कार्यालय :

**''साईनिकेतन'', प्लॉट नं ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.**

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.

**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



# श्री साई वाक्सुधा

तुम्ही कोणी कुठेंही असा।
भावें मजपुढे पसरितां पसा।
मी तुमचिया भावासरिसा।
रात्रं दिसा उभाच ॥ ६७ ॥

माझा देह जरी इकडे।
तुम्ही सातां समुद्रांपलीकडे।
तुम्ही कांहीही करा तिकडे।
जाणीव मज तात्काळ ॥ ६८ ॥

कुठेंही जा दुनियेवर।
मी तों तुम्हांबरोबर।
तुम्हां हृदयींच माझें घर।
अंतर्यामी तुमचे मी ॥ ६९ ॥

ऐसा तुम्हां हृदयस्थ जो मी।
तयासी नमा नित्य तुम्ही।
भूतमात्राच्याही अंतर्यामीं।
तोच तो मी वर्ततों ॥ ७० ॥

यास्तव तुम्हांस जो जो भेटे।
घरीं दारीं अथवा वाटे।
ते ते ठायीं मीच रहाटें।
मीच तिष्ठें त्यामाजीं ॥ ७१ ॥

कीडमुंगी जलचर खेचर।
प्राणी मात्र श्वान शूकर।
अवघ्या ठायीं मीच निरंतर।
भरलों साचार सर्वत्र ॥ ७२ ॥

मजशीं धरूं नका अंतर।
तुम्हीं आम्ही निरंतर।
ऐसें मज जो जाणील नर।
भाग्य थोर तयाचें ॥ ७३ ॥

— श्री साई सच्चरित् अध्याय १५ वा.

*

# सुविचार

हस्तस्य भूषणं दानं।
सत्यम् कण्ठस्य भूषणम्।
श्रोतस्य भूषणं शास्त्रं।
भूषणैः किं प्रयोजनम्॥

हाताचे भूषण दान करणे हे होय. सत्य बोलणे हा गळ्याचा अलंकार होय. शास्त्र (ऐकणे) हे कानांचे भूषण होय. असे असतांना मग आणखीन अलंकारांची आवश्यकताच काय?

*

## नूतन वर्ष शुभचिंतन

ख्रिस्ती शताब्दी प्रमाणे सुरू होणारे हे नूतन वर्ष आमच्या सर्व वाचकांना, हितचिंतकांना, भक्तांना सुखाचे, समृद्धीचे नि भरभराटीचे जावो.

*


या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

# अनुक्रमणिका


| क्रमांक | लेख-कविता शिर्षक | लेखक-कवि नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | — | ४ |
| २ | ब्रह्मज्ञान कथन | — श्री. मु. ब. निंबाळकर | ७ |
| ३ | श्री साईनाथांचा शरणार्थी (१९) | — श्री. विश्वास खेर | १२ |
| ४ | बाबांच्या कृपेनेच वाचविले | — श्रीमती सुशीला बलसे | १५ |
| ५ | साईचरणी भावपाकळी अर्पियली हृदयी साधनेची कळी उमलली | — श्री. वि. म. हटवार | १७ |
| ६ | दीन-दुबळ्या दे हात! साईनाथ साईनाथ!! | — श्री. सिताराम पवार | १८ |
| ७ | श्री साईबाबांच्या तीन गोष्टी | — श्री. संजीव चंदने | २० |
| ८ | दैनंदिन जीवनातून साईभक्ती कशी साधावी | — कुमार सुधीर चिखलींकर | २१ |
| ९ | श्री खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी | — | २२ |
| १० | श्री साई अभंग | — श्री. महेश शिवलकर | २३ |
| ११ | साई दरबारातील नवरत्ने — ५ | — | २४ |
| १२ | श्रद्धेचे फळ | — श्री. बाळकृष्ण देसाई | २९ |
| १३ | श्री साईबाबांचे तत्त्वज्ञान | — कु. सुधा पाटील | ३१ |
| १४ | श्री साईनाथांची आरती | — श्री. मिलिंद जोशी | ३२ |
| १५ | अन्नदान | — श्री. प्रमोद रायसोनी | ३३ |
| १६ | ज्याचे मुखीं साई जगी त्यास भय नाही | — श्री. चंद्रकांत गरगटे | ३४ |
| १७ | कबीर : भक्तिसाधना | — श्री. य. न. पंडित | ३६ |
| १८ | बालवय आणि ज्ञानप्राप्ती | — श्री. सुनील द. राणे | ३८ |
| १९ | आत्मा जो शिवाचा राम जप | — श्री. शाम जुवळे | ३९ |
| २० | संत तुकारामांचे अभंग - शतकांचा प्रभाव | — | ४० |
| २१ | तिळगूळ घ्या, गोड बोला | — | ४१ |
| २२ | ग्रंथ परिचय | — | ४४ |
| २३ | अन् बाबांच्या व्यापकत्वाची खूण पटली | — डॉ. अनिल मोरे | ४७ |
| २४ | साई माझी माऊली | — सौ. उमा वाळिंबे | ४८ |
| २५ | साईनाथांनी मृत्यूच्या दारातून वडिलांना परत आणले | — सौ. संगीता गोडबोले | ४९ |
| २६ | मुलाचा पाय बरा झाला | — श्री. शाम वि. जावळकर | ५१ |
| २७ | श्री साईनाथ कृपाळू | — श्री. बी. सी. पाटील | ५२ |
| २८ | पातलो साईपदी, चालता सप्तपदी | — श्री. म. प. घोंगे | ५३ |
| २९ | श्री साईबाबा धावून आले.... | — श्री. लक्ष्मण धुरी | ५४ |
| ३० | बाबा तारी त्यास कोण मारी | — श्री. शंकर चौबळ | ५५ |
| ३१ | असे घडले साईदर्शन | — श्री. सुरेश सातपुते | ५६ |
| ३२ | अरे साईनाथा | — सौ. नीता जाधव | ५७ |
| ३३ | सेवाभावी साईनाथ | — श्री. दत्ताराम धुगे | ५८ |
| ३४ | जपाचे महत्त्व | — | ५९ |
| ३५ | शिरडी वृत्त | — | ६० |

## संपादकीय

# श्री साईनाथांची अद्‌भूत अतींद्रियशक्ती



श्री साईलीला या मासिकात श्री साईबाबा या एकाच विषयावर गेली ६५ वर्षे संपादकीय लिहिले जात आहे. श्री साईबाबांची विचार-सरणी, तत्वज्ञान, त्यांची उपदेशवाणी, लीला, त्यांची उदी, त्यांचे भक्तगण, त्यांचे विचार-सामर्थ्य इ.इ. प्रत्यक्ष परब्रम्ह श्री साईनाथ यांचेकडे विविध दृष्टीकोनांतून पाहिले असता त्यांच्या एका जबरदस्त अचाट सामर्थ्याकडे कुणाचेही लक्ष वेधते आणि ते अचाट सामर्थ्य, शक्ती म्हणजे त्यांची अतींद्रियता. सध्याच्या २१ व्या शतकाकडे वाटचाल करणाऱ्यांना अतींद्रियता या शब्दाचा अर्थही कळणे मुष्कील! मग त्या दिव्यशक्तीची कल्पना ती काय येणार!

श्री साईबाबा हे अतींद्रिय होते. म्हणजे एकाच क्षणाला निरनिराळे देह धारण करून भक्तांना दर्शन देण्यासाठी त्यांनी दूर दूर संचार केला होता. आहे की नाही अजब शक्ती! आपल्याकडे अनेक थोर संत निसिद्ध पुरुष होऊन गेले. पण अगदी मोजक्याच संतश्रेष्ठांना ही शक्ती प्राप्त झाली होती. अगदी अलीकडचेच उदाहरण नावासह द्यावयाचे झाले तर ते श्री संत गाडगे महाराजांचे देता येईल. गाडगेबाबांनी पंढरपूरच्या चंद्रभागेच्या वाळवंटात आणि मुंबईतल्या गिरगावात एकाच दिवशी एकाच वेळी आपल्या हजारो भक्तांसमोर किर्तन करून अक्षरशः मंत्रमुग्ध केलेले आहे. ही गप्प नव्हे तर सत्य घटना आहे.

योगाभ्यास करून ऋद्धिसिद्धी प्राप्त करून घेतल्यावर सिद्ध पुरुषाला ही शक्ती प्राप्त होते. श्री साईनाथांना ही शक्ती प्राप्त होती व या शक्तीचा उपयोग करून त्यांनी आपल्या चमत्कारात भर घातलेली आहे. त्यांच्या या प्राप्त शक्तीच्या अनेक सत्यकथा आहेत. एके दिवशी शिरडीला सर्व भक्तमंडळींनी रात्री बाबांची नेहमी प्रमाणे शेजारती केली. दुसरे दिवशी ती सर्व मंडळी पुन्हा दर्शनाला गेली असतां बाबा म्हणाले, "काल मी दक्षिण दिशेला फिरावयास गेलो होतो" बाबांच्या या बोलण्याचा प्रथम कुणालाच अर्थ कळला नाही. नुसते आश्चर्य प्रगट करून ती मंडळी गप्प बसली. थोड्याच वेळात दक्षिणेच्या बाजूच्या एका खेड्यातून एक मनुष्य दर्शनाला आला व "काल संध्याकाळी बाबा आमच्या गावात आले होते" असे सांगू लागला. बाबांच्या बोलण्यातील सुसंगती लक्षात येऊन सर्वांना एकाच वेळी दोन देह धारण करण्याची बाबांची अतींद्रिय शक्ती प्रत्यक्ष अनुभवण्याची सुवर्णसंधी मिळाली. श्री कोल्हटकरांच्या "श्रीमद्‌भागवतार्थ दर्शन" या ग्रंथात आत्मा अमर असून त्याला अशा प्रकारचे अनेक चमत्कार करता येतात हे सप्रमाण सिद्ध करून दाखविले आहे.

श्री साई भगवान जागृतावस्थेत व स्वप्नावस्थेत निरनिराळे देह धारण करून भक्तांना दर्शन देत असत. एके रात्री तर श्री. बळवंतराव खापर्डे यांच्या स्वप्नात साईबाबा आले व भोजन करून स्वस्थपणे झोपाळ्यावर बसून विडा चघळून निघून गेले. नंतर घरच्या मंडळींच्या आग्रहावरून कुणालाही ही हकीगत न सांगता बळवंतराव बाबांच्या दर्शनास गेले. त्यांना पहाताक्षणीच श्री म्हणाले, "काल तुमच्या घरी पोटभर जेवलो. पण नंतर दक्षिणा दिली नाहीस" असे म्हणून त्यांनी बळवंतरावांकडून दक्षिणा मागून घेतली. परमभक्त खापर्डे यांचा हा अनुभव बाबांच्या गूढ अतींद्रिय शक्तीचा स्पष्ट पुरावा नाही काय?

तसेच काकासाहेब दीक्षितांचा अनुभवदेखील आपली मती गुंग करणारा आहे प्रातःकाळी स्नानसंध्या करून दीक्षित ध्यानधारणा करीत बसले होते त्यावेळेस त्यांना पंढरीच्या विठोबाची सावळी मूर्ति पाहिल्याचा भास झाला. आपला जप पुरा झाल्यावर काकासाहेब द्वारकामाईत भगवंतांच्या दर्शनास गेले. अत्यंत सुहास वदनाने त्यांच्याकडे पाहात महाराज म्हणाले, "काय रे विठ्ठल पाटील आला होता ना! त्याला नीट पाहिलेस? तो फार लबाड पळपुट्या आहे. चांगला घट्ट धरून ठेव. नाहीतर तुझ्या हातावर तुरी देऊन पळून जाईल" बाबांचे हे उद्गार ऐकून काकासाहेबांची काय स्थिती झाली असेल याचा आपणच विचार करा. दीक्षितांचे मन गहिवरून आले. त्यांनी बाबांचे चरणी लोटांगण घातले. भोजन करण्याकरिता ते वाड्यात गेले. याच सुमारास बाहेरगावाहून एक फेरीवाला देवादिकांची चित्रे विकावयास घेऊन आला. बाबांची लीला खरोखरीच अगाध आहे. तिचे वर्णन करताना मानवी मन गोंधळून जाते. फेरीवाल्याजवळ असलेल्या चित्रात काकासाहेबांना एक विठ्ठलाचे चित्र दिसले. सकाळी ध्यानाच्या वेळी पाहिलेल्या विठ्ठलासारखे ते रूप पाहून दीक्षितांनी ताबडतोब बाबांच्या आज्ञेप्रमाणे ते चित्र विकत घेतले आणि आपल्याकडे नित्य पूजेसाठी ठेऊन दिले.

एकदा हरिभक्त परायण दासगणू यांना महाराजांनी नाम सप्ताह सुरू करावयास सांगितले. त्यावर सातव्या दिवशी प्रत्यक्ष विठोबाचे दर्शन होईल तर आपण सप्ताह सुरू करतो असे दासगणूनी उत्तर दिल्यामुळे बाबांनी लागलीच आपली छाती उघडी करून आत्मविश्वासाने सांगितले की "अरे वेड्या, विठ्ठल हा इथेच बसलेला आहे. त्याला पहावयाचे असेल तर भक्ताने मात्र अत्यंत तळमळ आणि निष्ठा दाखविली पाहिजे, ठेवली पाहिजे. शिरडी हेच विठ्ठलाचे पुरातन स्थान आहे."

योगायोग असा की, पुढे देव मामलेदारांनी शिरडीचा पुरातन इतिहास शोधण्याचा प्रयत्न केला आणि बरेचसे संशोधन केल्यावर त्यांनी असे सिद्ध केले की शिरडी-शीलधी हे फार पुरातन खेडे असून ते जुन्या पंढरपूरच्या क्षेत्रात येते, व कृष्ण युगातील अगदी दक्षिणेचे टोक जे द्वारका तीच ही 'शिरडी' आहे.

१९१८ च्या सुमारास बापूशास्त्री गुळवे हे श्री साईबाबांच्या दर्शनास गेले. त्यांनी काशीहून पवित्र गंगा नदीचे तीर्थ आणले. शास्त्री बुवांनी गंगेच्या पवित्र पाण्याने शास्त्रोक्त पध्दतीने बाबांना अभिषेक केला आणि श्रीरामदास नवमीला सज्जनगडावर जाण्याची परवानगी मागितली. बाबांनी, "अवश्य जा तिथे मीच आहे." असे सांगितले. शास्त्रीबुवा

सज्जनगडला गेले, व दास नवमीच्या दिवशी पहाटेस पाच वाजण्याच्या सुमारास बुवांना साईबाबांनी साक्षात् दर्शन दिले व आपले पाय दाबण्यास सांगितले. थोडावेळ शास्त्रीबुवांकडून सेवा करून घेतल्यावर बाबा एकाएकी अदृश्य झाले.

प्रत्यक्ष देहाने भक्तांना भेट दिल्याची श्री साईबाबांची कितीतरी उदाहरणे दाखवून देता येईल. परमभक्त देव मामलेदार यांच्या घरी भोजन केल्याची हकीगत तर अतिशय हृदयंगम आणि कुणाच्याही मनाला चटका लावणारी अशीच आहे.

देव मामलेदार डहाणूला असताना त्यांच्या घरी एका व्रताचे उद्यापन होते. आपल्या घरी या निमित्ताने सद्गुरू बाबांचे पाय लागावेत या सदिच्छेने देवांनी बापूसाहेब जोग यांना शिरडीला पत्र लिहून कळविले. जोगांनी ते पत्र बाबांना वाचून दाखविले, व देवांची इच्छा कळविली. बाबांनी उलटपक्षी, "आपण भोजनास दोघा मित्रांना घेऊन अवश्य येऊ" असे लिहिण्यास सांगितले. बाबांचा तो निरोप ऐकून देवांना खूप आनंद झाला. कुणाला होणार नाही! पुढे काही दिवसांनी एक बंगाली संन्यासी गोशाळेची वर्गणी वसूल करण्याच्या निमित्ताने डहाणूला आला. देवांनी त्याची योग्य ती संभावना करून जास्त मदतीकरिता महिन्याभरात येण्यास सांगितले. त्याप्रमाणे तो बंगाली संन्यासी देवांच्या घरी टांग्यातून उतरला. देव मामलेदार उद्यापनाच्या भोजन समारंभाच्या गडबडीत होते. संन्याशाने आपण आज वर्गणी गोळा करण्याच्या निमित्ताने आलो नसून भोजनाकरिता केवळ आलो आहोत असे सांगितले. देवांनी त्याचे स्वागत केले. संन्यासी आपल्याबरोबर दोन मित्र आहेत त्यांनाही घेऊन येतो असे सांगून निघून गेला व भोजनाच्या ऐनवेळी खरोखरच आपल्या दोघा मित्रांसह आला व यथेच्छ भोजन करून निघून गेला.

इकडे देव मामलेदार साईनाथ महाराज कबूल करूनही आले नाहीत म्हणून मनातून फार खट्टू झाले. त्यांनी शिरडीला श्री. जोगांना पुन्हा पत्र लिहिले. बाबांना ते पत्र वाचून दाखविताच बाबा हसून जोगांना म्हणाले, "अरे कबूल केल्याप्रमाणे मी माझ्या दोन संन्यासी मित्रांना घेऊन देवांच्या घरी गेलो होतो व पोटभर जेऊन आलो. मला त्यांनी ओळखले नाही. त्याला मी काय करू? उद्यापनाच्या दिवशी देवांच्या घरी तिघे संन्यासी जेवले की नाहीत याबद्दल पत्र लिहून खात्री करून घे." श्री. जोगांनी देवांना पाठविलेले वरील हकीगतींचे पत्र वाचून देवांना खूप आनंद झाला पण आपण बाबांना ओळखले नाही याबद्दल त्यांना तितक्याच दुःख वेदना झाल्या.

भक्तांनो, श्री साईबाबांच्या लीला अशाच अत्यंत चमत्कारिक आणि मनाला गुंग करून सोडणाऱ्या आहेत. त्यांची प्रत्येक कृती विचारात घेण्यासारखी आहे. श्री साईनाथ अजूनही जागृत अवस्थेतच आहेत. मंडळींनो! तुम्ही बाबांची प्रार्थना, पूजा, अर्चा, पोथी पारायणं इ. सेवा करता. समजा बाबांना तुम्ही कधी काळी अत्यादराने बोलावलेत, त्यांना कळवळून हाक मारलीत तर ते कदाचित तुमच्याही घरी येऊन जातीलही. अक्षरशः 'फ्लाईंग व्हिजिट' देऊनही जातील पण तुम्ही मात्र त्यांना ओळखा हं!

# श्री साईंचे सत्य चरित्र - अध्याय १६ वा

## ब्रम्हज्ञान कथन - १

**गद्य अनुवाद - श्री. मु.ब. निंबाळकर**
ले. कर्नल (निवृत्त)
१/१४, फाईव्ह स्टार अपार्टमेंट, बंड गार्डन,
पुणे - ४११ ००१.

● श्री गणेशाला नमस्कार असो. श्री सरस्वती देवीला नमस्कार असो. श्री गुरुमहाराजांना नमस्कार असो. श्री कुलदेवतेला नमस्कार असो. श्री सीता व रामचंद्र यांना नमस्कार असो. श्री सद्‌गुरु साईनाथांना नमस्कार असो.

''शांति'' रूपी सिंहासनावर बसलेले, 'स्वानंद (आत्मतुष्टि)' रूपी साम्राज्याचे मालक, राजांचे राजे व चक्रवर्ती असे आपले एकच आश्रय असलेल्या गुरुमहाराजांना नमस्कार करू या. त्यांच्या दोन्ही बाजूस 'अभेदभक्ति (अविभक्त भक्ती)' व 'सहजस्थिति' या चवऱ्या ढाळीत आहेत, 'स्वानुभूति (स्वानुभव)' व 'सद्यःप्रतीति (प्रत्यक्ष अनुभव)' हे अत्यंत आदराने पंख्यांनी वारा घालीत आहेत, व 'स्वात्मस्थिती (स्व. स्वरूपी स्थिर झालेली अवस्था)' छत्र धरीत आहे व 'शांतिसंवित्ति (शांतीचे ज्ञान)' वेत्र (काठी) धरीत आहे. षड्रिपु (काम, क्रोध वगैरे सहा शत्रु) व मायामोहाची वृत्ति तेथे क्षणभरही टिकू शकत नाहीत. या सभेचा थाट काय वर्णावा? चार, सहा व आठ तर स्तुती गाणारे आहेत. लखलखाट 'चिन्मय (चैतन्याने परिपूर्ण)' असल्याने चमकत आहे व 'स्वानंद' घनदाट पसरलेला आहे. विरक्ति, भक्ति, शुद्ध ज्ञान, श्रवण, मनन, निदिध्यासन (अविरत चिंतन), निजानुसंधान (आत्मध्येय), व साक्षात्करण हे अष्ट प्रधान (आठ मंत्री) सेवेत चूर आहेत. 'शांति' व 'दान्ति' (आत्मनिग्रह)' हे दिव्य मणि त्यांचा कंठ भूषवीत आहेत. व वेदान्तरूपी (क्षीर) सागरातील अमृत वाहणारी अशी त्यांची मधुर वाणी आहे. सतेज झळकणाऱ्या ज्ञानरूपी तलवारीचा वार करण्यासाठी उंचावलेला त्यांचा हात पाहून संसाररूपी वृक्ष थरथर कापत आहे. हे निरंजना (निर्मळा), अव्यया (अविनाशा), व गुणाच्या पलीकडे असलेल्या योगीराजा! तुमचा जयजयकार असो, दीन जनांचा उद्धार व परोपकार करण्यासाठीच तुम्ही हा देह धारण केला आहे. (ओ. १-८)

मागच्या अध्यायांत श्री साई बाबांनी एका भक्ताची (चोळकराची) इच्छा पूर्ण करून, त्याने केलेला पण (नवस) पुरवून, त्याला त्याच्या मनाची खूण कशी पटविली याचे वर्णन झाले. (आतां) आलेल्या ब्रम्हज्ञानाच्या भोक्त्याची बाबा कशी तृप्ती करतात, आपल्या भक्तांना कसा उपदेश करतात हे परमार्थासाठी (श्रोत्यानीं) ऐकावे. सद्‌गुरुंच्या सर्व इच्छा सदा पूर्ण झालेल्या असतात. शिष्य त्यांच्या इच्छा काय पूर्ण करणार? शिष्याचीच सेवा करण्याची इच्छा पुरवून त्याला ते निरिच्छ करतील. फूल पान सुद्धा भक्तीने त्यांना

अर्पण केले तर ते अत्यंत प्रेमाने घेतील परंतु तेच अभिमानाने दिले तर लागलीच त्याचा अव्हेर करतील. सत्य, ज्ञान व सुखाचे सागर असल्याने त्यांना बाह्य (दिखाऊ) उपचाराचे महत्व वाटत नाही. परंतु तेच भावार्थाने अर्पण केले असता अत्यंत आनंदाने त्याचा ते स्वीकार करतात. काहीच समजत नाही असे दाखवितात परंतु अज्ञान घेऊन ज्ञान देतात व शिष्याने जर मर्यादेचे उल्लंघन केले नाही तर त्याला गोड शिकवणही देतात. त्यांची प्रेमाने सेवा केली असता सेवा करणारा ब्रम्हसायुज्य (ब्रम्ह व जीव यांची ऐक्यता) प्राप्त करतो. इतर सर्व साधने सोडावी व गुरुच्या सेवेत लीन व्हावे. त्या सेवेत थोडीही कुचराई केली किंवा त्यात आपला जास्त शहाणपणा दाखविला तर साधक संकटात सापडेल. गुरुच्या चरणी विश्वास पाहिजे. स्वतः शिष्य काय करतो? सद्‌गुरुच त्याची सोय लावतो, शिष्यास आपले नुकसान माहित नसते गुरुच नकळत त्याचा उपाय करतो. गुरुपेक्षा आणखी मोठा दाता (वदान्य) त्रिभुवनात दुसरा कोणी नाही. शरण जाण्या योग्य व्यक्तींचेही शरण जाण्या योग्य जे मोठे ठिकाण त्या सद्‌गुरुला अनन्यपणे शरण जाऊ या. सद्‌गुरुला चिंतामणीची उपमा द्यावी तर चिंतामणी फक्त चिंतिलेलेच (ज्याचा मनात विचार येईल) तेच देतो परंतु गुरु ज्याचा मनांत विचारही आला नसेल तेही देऊन भक्ताला आश्चर्याचा धक्का देतो. कल्पवृक्षासी तुलना करावी तर तर तो ज्याची भक्त कल्पना करील तेच पुरवितो. परंतु गुरुराज ज्याची कल्पना करता येत नाही अशी 'निर्विकल्प (अखंड ब्रम्हाकार)' स्थिति देतो. कामधेनु इच्छा करावी ते देते पण गुरुरूपी धेनुची (गाईची) थोरवी तिच्याहूनही मोठी आहे. गुरुधेनु शिवाय अचिंत्यदानी (कधीही न इच्छिलेले देणारी) अशी पदवी कोण मिरवु शकेल? (ओ. ९-२०)

आता श्रोत्यांना हीच विनंती की मागच्या अध्यायाच्या शेवटी मी ब्रह्मार्थिला (ब्रम्हज्ञान मागणाऱ्याला) ब्रम्हज्ञान प्राप्ति कशी झाली हे सांगेन म्हटले होते त्या कथेकडे लक्ष द्यावे. संतांना नेहमी कुठलीही इच्छा नसते व त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण झालेल्या असतात परंतु भक्तांना खूप इच्छा असतात व त्यांच्या इच्छा सदा अपूर्ण असतात. कोणी पुत्रसंतती मागतात, कोणी राज्यसंपत्ति मागतात, कोणी भावभक्ति मागतात तर एकादाच संसारातून मुक्ती मागतो. अशाच एका भावार्थी परंतु पैसा मिळविण्यात दंग असलेल्या भक्ताला बाबांची उदंड कीर्ति ऐकून त्यांच्या दर्शनाची ओढ लागली. घरी खूप संपत्ति व संतति होती. नोकर-चाकर होते. त्याच्या मनात आले की उदारमूर्ति बाबांचे दर्शन घ्यावे, बाबा मोठे ब्रम्हज्ञानी आहेत, साधुसंतांचे मुकुटमणि आहेत. त्यांची करणी अगाध आहे. त्यांच्या चरणी मस्तक ठेवू या. आपल्याला कसली कमी नाही. तर आपण ब्रम्हज्ञान मागू या. हे सहज साधले तर मी धन्य होईन. त्यावर त्याचे मित्र म्हणाले, 'ज्ञान जाणणे सोपे नाही ते तुझ्यासारख्या लोभ्याला प्रकट होणे अवघड. धन, स्त्री व मुलेबाळे यांच्या पलीकडे ज्याला सुखाचे कारण माहीत नाही, ज्याला ब्रम्ह हे केवळ स्वप्न वाटते त्याला शांती कशी मिळेल? इंद्रिये शक्तिहीन झाली व जगात कोणी मान देनासे झाले की (काही लोक) उगाच रिकामटेकडे बसल्यावर ब्रम्हाचे सूत कातततात, (ब्रम्ह जाणण्याचा वायफळ प्रयत्न करतात) तशी ही तुझी ब्रम्ह जाणण्याची इच्छा आहे. तुझ्या चिकट

हातातून तर पैसा सूटत नाही. तुझी ही इच्छा पुरविणारा तुला कोणी मिळावयाचा नाही. (ओ. २१-३२)

असो. अशी आस्था मनात धरून तो ब्रम्हार्थी परत भाड्याचा टांगा करून शिरडीला निघाला व तेथे पोहोचल्यावर त्याने साईंचे दर्शन घेतले व त्यांच्या पायांना नमस्कार केला. मग साई जे गोड वाक्य म्हणाले ते आता श्रोत्यांनी ऐकावे, हा साईरूपी कल्पवृक्ष अवधान (लक्ष देणे) रूपी पाणी पाजल्याने पक्का रूजेल आणि श्रोत्यांचा आदर जसा जसा वाढेल तसा तसा फळांचा भार उगवेल. तो रसभावाने सर्वांगी भरेल, सुगंधित पुष्पांनी फुलेल, मधुर फळांच्या भाराने वाकेल व भक्तांच्या इच्छा पुऱ्या करेल. ब्रम्हार्थी म्हणाला, "बाबा! ब्रम्ह दाखवा. हेच जीवाशी धरून आलो. लोक म्हणतात शिरडीकर बाबा ब्रम्ह चटकन् दाखवितात म्हणून इतक्या दूर आलो. मार्ग कंठता फार थकलो. तरी जर ब्रम्ह मिळेल तर कृतकृत्य झालो म्हणेन. बाबा म्हणाले, "चिंता करू नकोस. ब्रम्ह आता रोकडे दाखवितो. येथे उधारीची गोष्ट नाही. तुझ्यासारखा विचारणाराच मिळणे कठीण. बहुतेक लोक धनसंपत्ति मागतात, रोग व संकट निवारा म्हणतात आणि सदा लौकिक, मान, राज्यपद व सुख मागतात. फक्त या जगातील सुखासाठी लोक शिरडीस धावून येतात व माझ्या फकीराच्या भजनी लागतात. ब्रम्ह कोणीही मागत नाही. अशाचाच मला सुकाळ आहे व तुझ्यासारख्यांचाच दुष्काळ आहे. ब्रम्हजिज्ञासूंचा मी भुकेला आहे. हा मला पर्वकाळ (चांगली संधी) आहे. ज्या ब्रम्हवस्तुच्या भीतीने सूर्य व चंद्र यांचे सतत चालणे, नियमाने उगवणे व मावळणे; (दिवसाचा) प्रकाश व (रात्रीचे) चांदणे नियमित उद्‌भवणे; ग्रीष्म वसंत वगैरे ऋतु (नियमाने येणे) ; इंद्रादि देव व लोकपाळ यांनी नेमाने प्रजेचे पालन करणे; हे सर्व घडते त्याला मूळ हे ब्रम्ह. म्हणून देह पडण्यापूर्वी विचारवंत पुरुष ब्रम्हगुरुषार्थ साधतात. त्याशिवाय सतत पुनर्जन्म खास पाठीशी लागेल. हे ब्रम्ह जाणल्याशिवाय जर शरीर पडेल तर संसाराचे बंधन पिच्छा पुरवील व पुनर्जन्म चुकणार नाही. तुला ब्रम्हच काय पण सगळे ब्रह्मगुंडाळेच (ज्याच्यात ब्रम्हाचा गड्डा अथवा भेंडोळे आहे अशी चीज) दाखवितो. तेच तुला नखशिखांत वेटाळोत आहे व तेच मी उकलून वेगळे करतो." काय ती बाबांची अमृताच्या गोडीची वाणी. जणूकाय केवळ अद्वैत सुखाची खाणच. जे प्राणी संशयरूपी झोक्यावर बसलेले आहेत त्यांचाही उद्धार करण्यास ती समर्थ आहे. तात्कालिक आनंद देणाऱ्या सुखाच्या मोहात जे दिवसरात्र गुंतलेले आहेत त्यांनाही बाबांची ही वचनरूपी वाट विहित (शास्त्रांनी योग्य म्हटलेल्या) आचरणाकडे नेऊन सोडील. चिंतामणी प्रसन्न झाला तर लौकिक सुख हाताशी चढेल व महेंद्र प्रसन्न झाला तर स्वर्गसंपत्ति लाभेल. परंतु गुरुची विशेषता यापेक्षाही (विशेष) आहे. गुरुसारखा दाता कोणी नाही. तो जर सुप्रसन्न होऊन पावला तर दुर्लक्ष असे ब्रह्मच भक्ताला दाखवील. या गोड कथेच्या श्रवणाने संसार दुःखाचा विसर पडेल. ब्रम्हार्थियांना कसे शिकवावे हे बाबा जाणत होते. (ओ. ३३-५२)

असो. बाबांनी मग त्या ब्रम्हार्थीला बसविले व क्षणभर दुसऱ्या व्यवसायात गुंतविले, जणूकाय तो प्रश्नच आपण विसरलो असे त्यास दाखविले. मग बाबांनी काय केले?

एका मुलास जवळ बोलाविले व त्याला म्हणाले, 'लवकर जा व नंदू मारवाड्याला निरोप दे की बाबांना फार जरूर आहे, पाच रुपये थोडा वेळ उसने चटकन् दे'. मुलगा नंदूच्या घरी गेला तर त्याच्या दाराला कुलूप होते. तेव्हा तसाच माघारी येऊन त्याने बाबांस ती बातमी सांगितली. बाबा म्हणाले, 'परत जा. बाळा वाणी घरी असेल त्याला तोच निरोप देऊन रुपये घेऊन ये.' परंतु त्याची हीही फेरी व्यर्थ गेली. बाळा वाणीदेखील तेव्हा घरी नव्हता. मुलाने येऊन हे घडलेले बाबांस सांगितले. नंतर आणखी एक दोन ठिकाणी बाबांनी त्याला घाईने धाडले. (तिथे देखील) हेलपाट्यापायी तो थकला परंतु कवडीसुद्धा मिळाली नाही. नंदू व बाळा वाणीपैकी कोणी घरी नव्हते हे बाबांना पूर्णपणे माहित होते, अंतर्ज्ञानीच होते ना महाराज? चालते बोलते ते ब्रम्ह. त्यांना काय पाच रुपयास अडेल? परंतु त्या ब्रम्हर्थिया पायी ही नवलाई मांडिली. पाहुणा घरी आल्यावर त्याच्या पाहुणचारासाठी जे मिष्टान्न किंवा शिरा केलेला असतो तो इतरांना पण खायला मिळतो. तसे या ब्रम्हभोक्त्याचे निमित्त पुढे करून महाराजांनी सर्वांच्या कल्याणाकरिता भक्तांना हा उपदेश केला. त्या ब्रम्हार्थीचे खिशांत त्यावेळी दोनशे पन्नास रुपयांचे पुडके होते ते साईनाथांना कळले होते. ब्रम्हार्थीला हे कळत नव्हते का? त्याला डोळे नव्हते का? खिशात नोटांचे पुडके असून तो (द्यावे की न द्यावे? परत मिळतील की नाही?) या संशयाने पिडला. साईबाबांना पाच रुपड्या उधार आणि त्याही एक घटकाभर द्यावयाचा धीर झाला नाही आणि ब्रम्हसाक्षात्कार मागायला येतो! साई महाराज सत्यवचनी व हातउसनी रक्कमही लहान, तर देऊन पहावी असे मनात येताच संशय येऊन आदळला. पाच रुपयांची ती काय कथा? परी तेही द्यावयाला ज्याचा जीव होत नाही, एवढीपण सोय करता येत नाही, तो मूर्तिमंत लोभच जन्मला नाही का? इतर कोणी भाळाभोळा ज्याला बाबांचा खरा जिव्हाळा असता त्याने हा उसनवारीचा सोहळा उघड्या डोळ्यांनी बघितला नसता. ब्रम्हाची ज्याला इतकी तहान लागली होती त्याला हा प्रश्न समजला नसेल असे मला नाही वाटत. परंतु तो धनाच्या मोहाने गिळला गेला होता. स्वस्थ बसावे तेही नाही, परत जाण्याची घाई सुटली. बाबांना म्हणाला, 'ब्रम्ह ठिकाणी पाडा की?'

(ओ. ५३-७१)

बाबा म्हणाले, "बसल्या जागी ब्रम्ह दाखवावे याचसाठी आतापर्यंत उपाय केले ते कळलेच नाही का तुम्हाला? ब्रम्हासाठी पाच प्राण, पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, अहंकार, बुद्धि व मन ही समर्पण करावी लागतात. ब्रम्हज्ञानाचा मार्ग अवघड असतो. सर्वांना सरसकट सोपा नसतो. उदयकाळ झाला की भाग्यवानाला तो अचानक प्रकट होऊन लाभतो. ब्रम्हदेवाच्या पदापर्यंतच्या उत्कर्षाविषयी देखील जो विरक्त असतो व ज्याची इतर कोठेही आसक्ति नसते तोच ब्रम्हविद्या प्राप्त करण्याचा अधिकारी असतो. अंगात किंचितही वैराग्य नसेल त्याला कोणीही कितीही ब्रम्हतत्त्वाचा उपदेश केला तर त्याला काय यश येईल? उत्तम अधिकार असलेल्यांना ब्रह्मज्ञान अडचणीशिवाय प्राप्त होते तर मध्यम अधिकार असलेल्यांना सदा परंपरे आधीन व्हावे लागते. एक आकाश मार्गाने जातात तर दुसरे शास्त्रसंमत क्रमाक्रमाने जिना चढून जातात. परंतु अधिकार

नसलेले लोक मात्र ब्रह्म जाणण्याकरिता व्यर्थ श्रम करतात. एका आत्मविवेकाशिवाय श्रेष्ठ ब्रह्मप्राप्तीचे साधन नाही हे जरी वेदान्त वाक्य खरे असले तरी ते काय सर्वांनाच शक्य होते? अभ्यास व श्रम करून हाडांची काडे करावी लागतात (खूप मेहेनत करावी लागते). तेव्हाच गुरुकृपेच्या प्रकाशाने हळूहळू हाताशी येते. मी एक ईश्वर मीच नियंत्रण करणारा असा जेव्हा हिरण्यगर्भाला (ब्रह्मदेवाला) अभिमान चढतो व स्वतःच्या आत्म्याचा विसर पडतो तेव्हा विश्वाची उत्पत्ति होते. 'मीच ब्रह्म आहे' असे जेव्हा ज्ञान होते तेव्हा ज्ञानी स्वस्वरूपी लीन होतो व तेव्हाच त्याचे विश्वाचे भान नाहीसे होते असे श्रुति (वेद) गर्जना करून सांगते. आत्मजागृती झाली व अंतःकरणात 'हे सर्व ब्रह्मच आहे' अशी वृत्ति जिरली की ब्रह्मरूपी अग्नीत विश्वाची आहुती पडते व सृष्टिची राख होते (लय होतो). जीवांची देखील हीच स्थिती. जेव्हा भ्रम नाहीसा होतो तेव्हा दोर, सूर्याचे किरण व शिंपला यांचा खोटा आभास निवळतो. शिंपल्याचे खरे ज्ञान नसल्यामुळे ते रूपे भासू लागते, (परंतु तेच भासणाऱ्या) रूप्याचे खरे ज्ञान प्राप्त झाले की ते शिंपलाच आहे हे कळते. भ्रमाचे निवारण झाले की रूपे दिसेनासे होते व शिंपल्याचे स्वच्छ ज्ञान होते. एकमेकांच्या मोहाचे हे लक्षण आहे. ज्ञानरूपी दीप पेटवून अज्ञानरूपी मळ धुवून काढा. त्यामुळे खोट्या आभासाचा नाश होईल. जन्ममृत्युचे बंधन नसते तर मोक्षासाठी आत्मसंयमन कशाला? वेदान्ताशी आमचा काय संबंध? आणि मग हा ग्रंथही कशासाठी? मी (संसारात) बांधलेला आहे व मला मुक्त व्हावयाचे आहे अशा दृढनिश्चयाला जो चिकटलेला आहे तोच फक्त येथला अधिकारी आहे. अत्यंत अज्ञानी अथवा पूर्ण ज्ञानी हे दोघेही अधिकारी नव्हेत. बद्धच नाही तर मुक्ति कसली ही वस्तुस्थिती आहे. (सत्व, रज व तम) या त्रिगुणांचा समागम झाला म्हणजेच बंधन व मुक्तता ही दोन्ही येतात याची माहिती सर्वांना आहेच. दुजेपणाचे अस्तित्वच जेथे नाही तेथे कोण कोणास बांधेल व सोडेल? द्वैत व अद्वैत गेल्यावर कोणीही बद्ध नाही किंवा मुक्त नाही. दिवस आणि रात्र हे काय सूर्य उत्पन्न करते? हा तर दृष्टिदोषाचा व्यवहार. सूर्य या भानगडीतच नसतो. मी एक कर्ता, मी एक भोक्ता (भोगणारा) असा चित्तात अभिमान धरून स्वर्गनरकाचा व सुखदुःखाचा अनुभव घेतला की वासनेची आसक्ति वाटते.

(ओ. ७२-९२)

— (क्रमशः)

## लेखक - कवींस निवेदन

**श्री साईलीला मासिकाकडे साहित्य पाठविताना लेखक-कवींना पुढील गोष्टींची दक्षता घेणे आवश्यक आहे.**

**सुवाच्च अक्षरात कागदाच्या डाव्या बाजूस भरपूर समास सोडून लिखाण असावे, ते पाठोपाठ असू नये, शक्यतो टंकलिखित असावे.**

**हयात असलेल्या संतांविषयीचे लेख, सामान्य दर्जाचे अनुभव पाठवू नयेत.**

**अभ्यासपूर्ण, तर्कशुद्ध, मीमांसक व वैचारिक स्वरुपाच्या लेखांना प्राधान्य दिले जाईल.**

**का.सं.**

# श्री साईनाथांचा शरणार्थी (१९)

लेखक : ब्रह्मीभूत स्वामी साईशरणानंद
अनुवादक : वि. बा. खेर

माझ्या अशा नाजूक किंवा विचित्र मानसिक स्थितीत, एकदा बाबा न्हाण्याच्या तयारीत असता राधाकृष्णआईने माझ्या दोन खांद्यांवर दोन टुवाल ठेवून ती मला म्हणाली, 'जा'. मी गेलो तेव्हा बाबा आंघोळ आटोपून उभे होते म्हणून सर्व त्यांचे शरीर पुसू लागले. मी तेवढा झाडाच्या खोडासारखा शून्यमनस्क टुवालांसहित उभा राहिलो. एका दुसऱ्या गृहस्थाने माझी ही स्थिती पाहून माझ्या खांद्यांवरच्या टुवालांनी बाबांचे अंग पुसले तेव्हा मला समजले की माझ्या खांद्यांवर टुवाल ठेवण्यात राधाकृष्णआईचा हेतू मी फक्त द्वारकामाईत टुवाल घेऊन जावे असा नव्हता तर त्या टुवालांनी, दोन्ही हातांनी, बाबांचे शरीर पुसावे असा होता. परंतु त्या वेळच्या मनःस्थितीत सर्व साधने व सेवेची संधी उपलब्ध असूनसुद्धा ती सेवा माझ्या हातून घडली नाही. तसेच राधाकृष्णआईच्या इच्छेनुसार मी चावडीला जायला निघालो असता, मी कशाला जाऊ, राधाकृष्णआईची इच्छा राक्षसी मायाच आहे असे समजून मी चावडीत न जाताच माघारी फिरलो.

या काळी मला जेवायचे भान नसे. दुपारी अनेक वेळा मी जेवण्याचे विसरत असे. एकदा डॉ. पिल्ल्यांनी मला सकाळी आमंत्रण दिले पण त्याची मला विस्मृती पडली. सायंकाळी मला त्यांनी विचारले, "का नाही आलात?" तेव्हाच मला आठवण झाली. राधाकृष्णआईकडे सुद्धा आठवण झाली तरच जाई. अशा रीतीची मानसिक स्थिती झाल्यामुळे शरीराची सुकून काडी झाली होती. वाड्यात राहणारा एक भक्त मला म्हणाला, "वामनराव, तुम्हाला कसले दुखणे अथवा चिंता आहे? तुम्ही आलात त्या वेळेपेक्षा तुमचे शरीर अर्धे झाले आहे." हे सर्व बघून बापुसाहेब बुटी मला एकदा म्हणाले, "तुम्हाला येथे राह्यचे असेल तर खुशाल राहा. तुमच्या खर्चासाठी मी महिना ५० ते ६० रुपये देईन परंतु असे दुःखी होऊ नका." मी अर्थातच ही गोष्ट मानली नाही हे सांगण्याची जरूरी नाही. बापुसाहेबांच्या सदिच्छेच्या उद्‌गारांना मी उत्तर दिले नाही तर मग आभार कसले मानणार?

एकदा सर्व दीक्षितवाड्यात जेवत होते परंतु दीक्षितांच्या सौभाग्यवती जेवायला बसल्या नव्हत्या. मी तेथे फिरत असता त्यांची नजर माझ्याकडे गेली व त्या मला म्हणाल्या, "वामनराव, जेवायला चला. आपण दोघे बसू या." मी 'हो' म्हणून भोजनास बसलो. जेवत असता माझ्या ताटाबाहेर एक आणा पडलेला दिसला. मी विचार करू लागलो की हा आणा आला कोठून? दीक्षितांच्या सौभाग्यवतींनी तो ठेवला नव्हता व तेथे कोणी आले नव्हते म्हणून कोणी दुसऱ्याने ठेवण्याचा संभव नव्हता. तेव्हा आवाज आला, "या आण्याचा अर्थ आहे गुरुकृपा." अकरा महिने मी शिरडीला राहिलो त्या दरम्यान एके दिवशी सुमारे तीन वाजता राधाकृष्णआईने माझ्यावर आरोप केला होता की मी तिचा एक आणा चोरला. त्याचा अर्थ या रीतीने मला आता समजला. राधाकृष्णआईला असे सांगावयाचे होते की मेहनत

करून जे ज्ञान तिने प्राप्त केले होते ते मी चोरले होते! तिच्यामार्फत बाबांनी मला पुष्कळच दाखविले ही गोष्ट तर निःसंशय व तो आरोप एका दृष्टीने खराच होता. एका संध्याकाळी बाबा माधवरावांना म्हणाले, "ह्याने माझे पाय कापून नेले!" अशाच तऱ्हेचा राधाकृष्णआईचा आरोप होता. मला राधाकृष्णआईचा आरोप मान्य आहे व बाबांचे म्हणणे तर खोटे असेलच कसे? ह्या दोन्ही गोष्टींनी मला संतोष झाला.

या सुमारास मला घेऊन जायला माझा थोरला मेहुणा आला होता. बाबांची अनुज्ञा झाली व मी त्याच्याबरोबर जायला निघालो. वाटेत नदीला भारी पूर आलेला पाहिला म्हणून माघारा फिरलो. नावेतून उतरून काठावर जाताना पुरात वाहून जाण्यापासून बचावलो. मला परत आलेला पाहून काकासाहेब दीक्षित जरा पण नाखूश झाले नाहीत, व त्यांनी पूर्ववत् माझा संभाळ स्नेहपूर्वक चालू ठेवला.

सन १९१३ साली राधाकृष्णआईचा प्रथम परिचय झाला. तिने माझ्यावर सुरुवातीपासून खूप प्रेम केले व माझे लाड पण केले. ती मला एका बालकाप्रमाणे समजे व मी तिला आईसारखाच मान देई. आमचा परिचय होऊन दोनचार दिवस झाले असतील. चातुर्मासाचे दिवस होते. तिने मला गरम बंडी घालण्यास लावून डोक्यावर फेटा बांधला व माझ्याकडे बघून म्हणाली, "वामन्या, आता तू वारकरीच झालासा दिसतोस."

भगवद्गीता पठनाने माझे मन या काळात दृढ राहात असे. श्रेयसाला चिकटून प्रेमाला दूर राखण्याची किंवा सोडण्याची शक्ती भगवद्गीतेतून मला प्राप्त होई असा मला अनुभव आला. एकदा मी चावडीतून निघून द्वारकामाईकडे जाण्याच्या तयारीत असता बाबा म्हणाले, "माझ्या वामन्याला खायला मिळेल."

एकदा अगदी पहाटेस उठून अंधारात शौचासाठी विहिरीकडे जात असता वाटेत मोठा खड्डा होता तो मला दिसला नाही. पण त्यावेळी सगुण मेरु नायक उठले होते. त्यांनी मला खड्ड्याकडे जाताना पाहून लगेच माझ्यामागे धावत आले व मला खड्ड्यात पडण्यापासून वाचविले. प्रेरणा तर बाबांचीच पण निमित्त सगुणराव झाले. सगुणरावांनी मला तेथून मागे बोलावून वाड्यात नेऊन सोडले.

एके दिवशी संध्याकाळी बाबांच्या फेरीसमयी मी बाबांच्या पाया पडून भक्तांसह, हल्ली जेथे माध्यमिक शाळा भरते व जेथे बाबांच्या काळी श्यामसुंदर घोडा बांधला जाई, त्या घराच्या भिंतीला टेकून उभा होतो. इतक्यात भास झाला की राधाकृष्णआईंच्या खोलीतून काही श्वास आला, प्राणवायु निघून बाबांच्यावर पसरला व हा प्राणवायु विस्तार पावून बाबांच्या नित्य आकार व रूपाऐवजी रुद्राक्षधारी रूप दिसले. हे लिहिताना जाणवते की ह्या देखाव्याने बाबांना कदाचित असे सांगावयाचे असेल की मी तर शुद्ध, बुद्ध, निर्गुण, निरंजन, निराकार आहे. पण मायेच्या श्वासानेच (स्पंदनानेच) हे शिवत्व प्राप्त झाले; माझे शिवरूप दिसले तसेच ह्या माझ्या कफनीधारी, डोक्याला फडके बांधलेल्या दाढीमिशावाल्या आकाराला समजावे.

एक दिवस मी द्वारकामाईत जात होतो. आवाराची भिंत पार करून दरवाज्यापासून एक दोन पावले दूर असेन, तेथेच मला कोणीतरी हुकूम केला, "येथे उभा रहा."

त्याप्रमाणे मी उभा राहिलो. नंतर हुकूम झाला, ''बाबांचे नाव येथे उभ्या उभ्या पुकार.'' त्याप्रमाणे या जागेवर उभा राहून खूप मोठ्याने बाबांच्या नावाचा उच्चार करायला लागलो. हे ऐकून काही वेळाने बाबा आपल्या आसनावरून उठून तुलसीच्या चौथऱ्यावर येऊन बसले, मला बोलावले किंवा मी आपोआप गेलो, प्रेमाने त्यांच्या पायी लागलो, तेव्हा ते पुनः आसनस्थ झाले. माझ्या ह्या नामघोषाने बाबा आसन सोडून आले हे नोंदण्यासारखे आहे.

आवाराच्या भिंती जवळून मी जात होतो किंवा तेथे उभा असेन इतक्यात तेथे काकासाहेब दीक्षित बाबांकडून आले आणि मला त्यांनी बाबांचा प्रसाद, सीताफळाचा एक तुकडा दिला. या काळी मला ज्ञानाचा अभिमान होता किंवा ज्ञान प्राप्तीची खास अभिलाषा असल्याने हा प्रसाद मला रुचला नाही; म्हणून जरी मी प्रसाद काकासाहेबांकडून घेतला तरी मनाने स्वीकारला नाही. या आवाराच्या भिंतीवर तो जसाच्या तसाच ठेवून मी शिरडीच्या सडकेवर फिरण्यासाठी निघालो. रस्त्यात विचार करता जाणीव झाली की सीताफळ बाबांनी खास माझ्यासाठी काकासाहेबांबरोबर पाठविले, त्याचा उद्देश मला सीताफळ म्हणजे सीतेची अनन्य अव्यभिचारिणी भक्तीच आचरण्यास योग्य आहे हे प्रबोधन करण्याचा होता. पण त्याकाळी मला थोडा ज्ञानाचा अभिमान होता. म्हणजे माझ्या मनात ही भावना होती की ज्ञानाशिवाय जन्ममरणाचा फेरा टळणार नाही. आणि शिवाय असा पण अभिमान होता की माझी पात्रता तर ज्ञानानीच आहे मग भक्ती कशासाठी? फिरता फिरता या विचारावर मी आलो की याबाबतीत माझा हट्ट काय कामाचा? गुरुमहाराज आपली भूमिका ठीक ओळखू शकतात व आपल्यासाठी योग्य तेच आपल्याला देतात. आपली लायकी ढबुची असली व आपण शंभर रुपयांची आशा ठेवली तर ते कसे चालणार? म्हणून बाबांनी पाठविलेल्या प्रसादाची अवगणना करण्यात आपली गंभीर चूक होत आहे या विचाराने मी माघारा फिरलो, व ज्या जागी सीताफळाचा तुकडा ठेवला होता तेथे गेलो तर तो जसा मी ठेवला होता तसाच होता. हे पाहून इतका बराच वेळ जाऊन सुद्धा कोणी माणूस, पक्षी किंवा जनावराची नजर त्याच्याकडे गेली नाही याचे मला आश्चर्य वाटले. ह्या प्रसादाचा अस्विकार करण्यात माझी गंभीर चूक होती हे तर मनावर ठसलेच होते. म्हणून सीताफळाचा तुकडा पाहून तो आनंदाने सेवन केला. आज सुद्धा मला असेच वाटते की बाबांचा उपदेश सीता मातेची रामचंद्रावर जशी अनन्य प्रेमलक्षणा भक्ती होती तशीच भक्ती आचरण्याचा आहे. आणि मी संन्यास घेतल्यानंतर सुद्धा गुरुभक्तीचे प्रेमाराधन करण्याचा उपदेश श्री. पणशीकरांनी मला बळजबरीने अर्पण केलेल्या पादुकाद्वारा दिला असे मी समजतो.

एके दिवशी संध्याकाळच्या बैठकीच्या वेळी मी गेलो व कठड्याच्या बाहेर बसलो तेव्हा बाबा थोड्या गुश्शात दिसले व म्हणाले, ''ह्या सर्वांना तिला (राधाकृष्णआईला) आणून माझ्या उजव्या हातासमोर बसवायचे आहे परंतु मी तिला बसू देणार नाही. हे सर्व मुंबईचे लोक चळले आहेत. सर्वच बघून बघून स्त्रीच पाहतात. स्त्रियांचेच लोक गुलाम आहेत.'' ह्या वेळी काकासाहेब वगैरे जे जे वर बसण्यास आले होते त्या सर्वांना बाबांनी बसू दिले नाही. मला एकट्यालाच बसवून वरील उद्गार काढले.

एका सकाळी नऊ वाजता मला एक फकीर भेटला. त्याने मला विचारले, "वामनराव एल्.एल्.बी. तुम्हीच का?" मी उत्तर दिले, "तुम्ही कशासाठी हे जाणू इच्छिता?" तेव्हा तो म्हणाला, "बाबांनी मला एक रुपया दिला आहे व सांगितले आहे की अमूक दर्ग्यावर जाऊन वामनराव एल्.एल्.बी. च्या तबियतीसाठी प्रार्थना कर. म्हणून मी तुम्हाला विचारतो की ते तुम्हीच का?" बाबांना केवढी काळजी! आणि ही गोष्ट हा फकीर, बाबा स्वतः व माझ्याशिवाय कोणाला माहित नाही. अशी आहे महात्म्याची निष्काम शांत प्रेमसेवा ती भक्ताच्या पात्र अपात्रतेचा विचार करत नाही. बाबांनी माझ्या योग्यता अयोग्यतेचा विचार केला असता तर मी अयोग्यच ठरलो असतो. ते तर सर्वज्ञ होते. माझ्या उणीवा सर्व जाणतच होते. परंतु त्यांच्याकडे लक्ष न देता माझ्या तबियतीसाठी लाड करणाऱ्या आईबापांप्रमाणे प्रार्थना केली. या निष्काम प्रेमाची फेड माझ्याकडून कशी होणार होती? वरील मजकूर वाचून कोणाला असे वाटले की बाबांनी त्यांना दिलेल्या दक्षिणेतून हे सर्व केले तर त्यांनी हे लक्षात ठेवावे की माझ्यापेक्षा दसपट किंवा अधिक बाबांसाठी खर्च करणारे किंवा दक्षिणा देणारे त्यांचे भक्त होते. वामनराव नार्वेकर, ज्यांनी एकावेळी पांचशे रुपये बाबांना दिले आणि बाबांनी त्यांचा आजार दूर केला, असे अनेक श्रीमंत होते; त्यांच्यासमोर माझी किंमत ती काय? परंतु तरीही बाबांनी अप्रतिम प्रेम दाखवून न फेडण्यासारखा उपकार केला. असे कित्येक उपकार ते करत आले आहेत आणि त्यांची गणना करण्यास बसले तर ती कधीच संपणार नाही.

*******

# बाबांच्या कृपेनेच वाचविले

**— श्रीमती सुशीला बलसे**
द्वारा सौ. शोभा देसाई
१ एलोरा, एस.टी.सी. हौसिंग सोसायटी,
श्रद्धानंद रोड, विलेपार्ले (पूर्व),
मुंबई-४०० ०५७.

माझी नात सौ. प्रमिला अमोणकर हिला मुलगा झाल्यानंतर ३ महिने होतात न् होतात तोच तिला रक्तदाबाचा त्रास सुरू झाला. वैद्यकिय उपचार करूनही चक्कर व उलट्या होणे बरे व्हायची चिन्हे दिसेनात. आठ महिनेपर्यंत अनेक प्रकारचे इलाज केले; डोक्याचे फोटोही काढले परंतु काहीच उलगडत नव्हते. सरतेशेवटी माझा मुलगा कमलाकर याने डॉ. संजगिरी ह्यांचे नाव सुचविले. डॉ. संजगिरी यांनी डोक्यात ट्युमर झाल्याचे व डोक्याचा फोटो वगैरे काढून त्वरेने शस्त्रक्रिया करण्याची आवश्यकता असल्याचे सांगून विलंब केल्यास रुग्ण अंध होण्याची शक्यताही वर्तविली. शस्त्रक्रिया १२ तासांची होती. मला काहीच सुचत नव्हते. मी माझ्या साईबाबांपुढे बसून त्यांची आराधना करीत होती. बाबांनी माझी हाक ऐकली; व बारा तासांची शस्त्रक्रिया सहा तासातच आटोपली. सौ. प्रमिला ही आता व्यवस्थित असून ती कामावरही जात असते. ही सर्व साईंचीच कृपा!



# श्री मार्तंड महाराज नागरे साईचरणी विलीन



शिरडी येथील श्री खंडोबा मंदिराचे सर्वस्व व श्री साईनाथांचे परमभक्त श्री म्हाळसापती यांचे वयोवृद्ध चिरंजीव श्री मार्तंड महाराज यांचे शुक्रवार ता. १४ नोव्हेंबर १९८६ रोजी श्रीगोरखनाथ जयंतीस वृद्धापकाळामुळे निधन झाले.

श्री मार्तंड महाराज उर्फ भगत यांचा जन्म इ.सन १८९० साली रविवारी गोकुळ अष्टमीचे दिवशी झाला. रविवारी जन्म झाल्याने खंडेरायाचा प्रसाद म्हणून त्यांचे नाव मार्तंड ठेवण्यात आले. म्हाळसापतींना हा मुलगा झाल्यावर काही दिवसांनी श्रीसाईबाबा एकदा म्हाळसापतींना म्हणाले, "या मुलाला पंचवीस वर्षे जपावे." त्यावर म्हाळसापती म्हणाले, "बाबा आपल्या शिवाय मुलाला कोण जपणार!" तेव्हा श्री साई उत्तरले, "शेतकऱ्याने जरी शेत पेरले तरी त्याला शेतात हा हा करावीच लागते." श्रीबाबांचे सांगण्याप्रमाणे म्हाळसापतींनी मुलाला २५ वर्षे होईतोपर्यंत जीवापाड जपले. श्रीसाईबाबांच्या सांगण्यावरून मार्तंडजी दररोज नेमाने खंडोबा, द्वारकामाई, शनिमंदिर या देवस्थानांची मनोभावे पूजा करीत.

श्रीमार्तंड महाराजांच्या राहात्या निवासस्थानीच म्हाळसापतींची समाधी असून त्यावेळचे देव व श्रीसाईंच्या काही परमपवित्र वस्तू आहेत. शिरडीला भेट देणारे भाविक याही स्थानाला भेट देऊन जात असत. निधन समयी श्री मार्तंड महाराजांचे वय ९६ वर्षांचे होते. श्रीसाईबाबा संस्थानने त्यांना श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या मागे त्यांचे तीन पुत्र, दोन कन्यका, सूना, नातवंडे व असंख्य भक्त आहेत.

श्रीसाईनाथ महाराज मृतात्म्याला चिरशांती व सद्‌गती देवोत.

धर्मादर्थः प्रभवति धर्मात् प्रभवते सुखम्।
धर्मेण लभते सर्वं धर्मसारमिदं जगत्॥

(वाल्मीकी रामायण, अरण्यकांड. ९.३०)

**अर्थ** — धर्मापासून अर्थाचा व सुखाचा लाभ होतो. (किंबहुना) धर्मापासून सर्वच काही मिळते. (कारण) जगतातली एकमात्र सारभूत वस्तू धर्म हीच आहे.

# साईचरणी भावपाकळी अर्पियली हृदयी साधनेची कळी उमलली

— श्री. वि.म. हटवार
१४९, रेशीमबाग,
नागपूर-९.

माणसाच्या सर्वश्रेष्ठ मानवी जीवनाचे दोन प्रकार आहेत, एक ऐहिक जीवन आणि दुसरे पारमार्थिक जीवन. नश्वर व अशाश्वत जीवन स्वानुभवाने अपूर्ण आहे. अध्यात्म विषयाकडे वळणारे पारमार्थिक जीवन स्वानुभूतीसह रममाण होणारे आहे. अध्यात्मज्ञान साधुत्वाचे संस्कार व संतांच्या कृपेनेच अवगत होऊ शकते, यात पूर्वसुकृताचा वाटाच अधिक असतो.

पवित्र व उन्नत झालेल्या मनास आत्मबोधामृत मिळाले तर अंतःकरण उजळून निघते. संतसाहित्य भक्तीरस जागवून भगवद्भक्ती वाढविते. परमार्थाचा साधक दया, करूणा, क्षमा, संतोष अशा दैवी गुणांनी युक्त असतो. ईश्वराची व आत्म्याची एकरूपता साधणे हाच त्याचा प्रयत्न असतो. जीवन चांगले व्हावे याकरिता मनुष्य जिज्ञासू वृत्तीने जीवनात संतुलन निर्माण करतो.

श्रद्धा म्हणजे भावनामय भक्ती. मग ती देव, धर्म व संतांवर असो किंवा आपल्यास श्रेष्ठ असणाऱ्या व्यक्तिमत्वावर असो. श्रद्धेने मुक्ती देणारी भक्ती व भक्तीने परमार्थ साधणारे अधात्मज्ञान प्रकटत असते. चैतन्यरूप ज्योतीने बुद्धी प्रकाशित होते आणि आत्मदर्शन घडून मुक्तिलाभास पात्रता लाभते. श्रेष्ठ आदर्श भगवान श्रीराम मर्यादा पुरूषोत्तमच होते.

शील संवर्धन व चारित्र्य संपन्नता धर्मशिक्षणाचे उद्दिष्ट मानले आहे. परद्रव्याची व परस्त्रीची अभिलाषा करणे वाईट प्रवृत्तिचे लक्षण आहे. यावर जो विजय पावेल तो शक्तीसंपन्न होतो. अर्जुनाची परीक्षा पाहावयास इंद्राने चित्रसेन गंधर्वाच्या मार्फत संदेश पाठवून श्रेष्ठ अप्सरा उर्वशीला कृष्णभक्त अर्जुनाकडे पाठविले. साजशृंगार केलेली उर्वशी अर्जुनास आपल्याकडे आकर्षित करीत होती. तिने आपला उद्देश सांगितला तेव्हा अर्जुन म्हणाला, 'तू पुरूवंशाची जननी मला गुरुसमान आहेस, मला मातेसमान पूजनीय आहेस. तू मला पुत्रासमान मानून माझे कामवासने पासून रक्षण कर.' भारतात अशा कामविजयी पुरुषांची अनेक उदाहरणे आहेत. वीरपुरुष शुद्धचरित्र, जीतेन्द्रीय व मनोनिग्रही असतो.

कोणत्याही वैभवाचे भूषण सौजन्य आहे. सौजन्य असेल त्या माणसास गर्व होणार नाही. शांतवृत्ती, संयमी वाचा, सत्पात्री दान, निष्कपट वर्तन व शील माणसाचे श्रेष्ठ भूषण आहे. सज्जनाचे भूषण सदाचरण आणि चारित्र्य हेच संतांचे भूषण आहे.

प्रत्येक मानसिक भावाची एक ठराविक शारीरिक प्रतिक्रिया असते. तसेच शारीरिक परिवर्तन मानसिक परिवर्तनास कारणीभूत होते. जीवनातील प्रत्येक कार्यातून मानव अनुभव

प्राप्त करतो. ते सारे अनुभव त्याला चांगल्या किंवा वाईट मार्गाकडे घेऊन जातात.

मानवाच्या कैवाराकरिता परमेश्वर देह धारण करून अवतरतो. श्रीसाईबाबा भक्तांना त्याची चूक दाखवून देत. त्याला समज देऊन सां"त, तेव्हा भक्तही कृतज्ञ होऊन आदराने मनोभावे त्या साक्षात ईश्वरी अवतारास साष्टांग दंडवत घालीत असत. समाधिपूर्वी त्यांनी अशा सर्व भक्तांना जवळ बोलावून सांगितले, **'नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य समजावे, जो जो प्राणी जन्माला येतो त्याला मृत्यू येतोच. ज्याला अस्तित्व आहे, त्याला नाश आहे. जो जीव आकारला त्याला लय आहे. आत्मा फक्त शाश्वत आहे, तो मात्र कोणाचा आप्त नव्हे.'** ज्या घडीला जे होणार ते कोणालाही चुकत नाही. मग शोक करण्यापेक्षा शांत राहून जे शाश्वत आहे त्याचा शोध घेण्यास शिकावे. श्री साई निर्वाण समयी एकादशी लाभणे भाग्याचे लक्षण आहे.

प्राणज्योती मंद होता, साईदेह विश्रामला।
नाही पडून वा निजून, स्वस्थपणे गादीसी बैसून, केले विसर्जन देहाचे।

शिर्डीचे जागृत स्थान श्रीसाईबाबांचे अनंत काळाचे निवासस्थान झाले. श्रद्धापूर्वक साई जीवनाचे अनुशीलन केले पाहिजे. कारण श्रद्धा हाच अध्यात्म विषयाचे ज्ञान प्राप्त करून घेण्याचा एकमेव उपाय आहे. श्रद्धेच्या अभावामुळेच नाना प्रकारचे संशय, शंका उपस्थित होतात व मानवाला खरा ज्ञानलाभ अखेरपर्यंत होऊ देत नाहीत.

# दीन-दुबळ्या दे हात! साईनाथ साईनाथ!!

**— श्री. सिताराम नारायण पवार**
१३/२ प्रतिरक्षा नगर,
वाकोला ब्रिज, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई - ४०० ०५५.

श्रीकृष्णांनी गीतेमध्ये सांगितले आहे की, ज्या ज्या वेळेला धर्माचा ऱ्हास होतो, सगळीकडे अधर्म फैलावतो अशा वेळेस परमेश्वराला या जगात संतांची निर्मिती करावी लागते. हे संत प्रत्यक्ष आपल्या आचरणाने जगाला ज्ञानाचा प्रकाश देतात. हे जग हा एक महासागर आहे, अशी कल्पना केल्यास संतांचे कार्य ह्या महासागरातील दिपस्तंभासारखे असते. ते स्वतः अढळस्थानी राहून जगाला मार्गदर्शन करतात. लोकांना अधर्मापासून तसेच पाप-चारणातून दूर नेतात. **आपल्याला मिळालेले मानवी जीवन हे परमेश्वराकडून मिळालेले एक बहुमूल्य वरदान आहे. म्हणून जीवनाची साफल्यता प्राप्त करण्यासाठी आपण ते सत्कार्मी लावले पाहिजे.** (चांगल्यासाठी खर्च केले पाहिजे.) चांगले विचार, आचार याबरोबरच त्याला भक्तीयोगाची जोड देऊन आपल्या जीवनाची नौका पलीकडच्या तिराला सुखरुपपणे लावली पाहिजे. याची जाणीव हे संतच आपणाला करून देतात.

अशा महान संतांपैकी एक विभूती अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी या गावी निर्माण झाली. हे थोर संत आहेत "श्री साईबाबा". साईबाबांनी दिलेली शिकवण ही फक्त त्या काळापुरती मर्यादित नसून युगानूयुगे त्यांचे विचार साऱ्या जगाला सागरातील दिपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करतील असे आहेत. एवढेच नव्हे तर आजच्या ह्या मतलबी, स्वार्थी जगाला बाबांच्या शिकवणीची, त्यांच्या विचारांची खरी गरज आहे. लोकांनी बाबांच्या जीवनाचा अभ्यास करून, त्यांचे विचार आचरणात आणले तरच हळूहळू अधोगतीच्या दिशेने जाणारा हा जीवनप्रवाह रोखला जाईल, एवढेच नव्हे तर उन्नतीच्या दिशेने त्याची वाटचाल चालू होईल.

"श्रद्धा" व "सबुरी" हे दोन महामंत्र बाबांनी आपणास दिले. जणू ती टवटवीत फुलेच सांभाळण्यास दिली आहेत. ती अशीच अखंड टवटवीत ठेवण्याचा जेवढा प्रयत्न करू तोपर्यंत त्याचा सुगंध सगळीकडे पसरत जाईल. तुम्ही आयुष्यात सत्कर्मे करीत राहा, माझ्यावर "श्रद्धा" ठेवा, मी तुमच्या हाकेला धावून येईन. असे बाबांनी आपल्याला दिलेले वचन आहे. श्रद्धापूर्वक जो बाबांची भक्ती करील, त्यांना शरण जाईल, त्याच्या हाकेला बाबा धावून जाणार नाहीत असे कधीही होणार नाही. अशी प्रचिती आजपर्यंत बऱ्याच साईभक्तांना येत आहे. तसेच आपण केलेल्या सत्कर्माचे-भक्तीचे फळ आपणास ताबडतोब मिळावे अशी अपेक्षा करू नका, योग्य वेळ येताच मी ते फळ तुमच्या पदरात नक्कीच टाकीन. हे सुद्धा बाबांनी भक्तांना दिलेले वचनच आहे.

माझ्या देशात राहाणारे माझे देशबांधव आहेत. हे फक्त आपण पुस्तकात वाचले आहे. पण आज आपल्या देशाच्या परीस्थितीकडे नजर टाकली तर आपल्याला असे दिसून येईल की, देशामध्ये भाषिकवाद, जातीयवाद प्रचंड प्रमाणात दिसून येत आहे. काही धर्माचे लोक आम्हाला वेगळे राज्य हवे म्हणून ओरड करीत आहेत, आंदोलने करून 'राष्ट्रीय एकात्मतेचा' अर्थ लोक विसरत चालले आहेत. तो अर्थ बाबांनी त्यावेळी जाणला होता. त्यांच्या भक्तांमध्ये सर्व धर्माचे, सर्व जातीचे लोक होते. कोठेही भेदाभेद नव्हता. एवढेच नव्हे तर बाबा ह्या सर्व धर्माच्या लोकांना एकाच पंगतीला बसवून आपल्या हाताने अन्न शिजवून त्यांना वाढत असत.

बाबांचा दुसरा एक महान गुण होता, तो म्हणजे आपल्या भक्तांच्या संकटकाळी हाकेला तत्पर धावून जाणे. दीन-दुबळी, पीडीत व व्याधीग्रस्त माणसे बाबांच्या दर्शनाला येत. बाबांजवळ आपले दुःख, आपल्या वेदना बोलून दाखवीत. बाबा हे आपले उद्धारकर्तेच आहेत. अशा भावनेने त्यांच्याजवळ ते सगळेजण आपली दुःखे सांगत. बाबा आपल्या विभूतीच्या शक्तीवर त्यांची दुःखे दूर करीत. त्यांची सेवा करण्यात बाबांना अपूर्व असा आनंद प्राप्त होत असे. ही सेवा बाबा निस्वार्थ भावनेने करीत असत. त्यांनी कधीही कोणाकडून एका पैशाची अपेक्षा केली नाही. उलट आपल्या झोळीतून पैसे काढून गरजूंना देत असत. प्रसंगी आपल्या भक्तांची दुखणी मोठ्या मनाने अंगावर ओढून घेण्यासही त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. महामारीसारख्या भयंकर रोगाला त्यांनी आपल्या प्रचंड सामर्थ्यावर थोपवून धरले. प्रसंगी रागावून त्यांनी आपल्या भक्तांना योग्य मार्ग-

दर्शन केले. अमूल्य ज्ञानाचा ठेवा त्यांच्या हवाली केला. वेगवेगळी उदाहरणे देऊन ती भक्तांच्या गळी उतरवून त्यांचे अज्ञान दूर केले. स्वतः आयुष्यभर बैरागी वृत्तीने राहिले. पण आपले सगळे आयुष्य परोपकार करण्यात तसेच भक्तांच्या कल्याणासाठी घालविले. खरोखरच ''श्रीसाईबाबा'' ही महान विभूती होऊन गेली. आज जरी ते आपल्यात नसले तरी त्यांच्या शिकवणीच्या रूपाने ते आजही अमर आहेत. शिरडीची त्यांची समाधी आज लाखो लोकांची प्रेरणास्त्रोत बनून राहिली आहे. ते आजही तितक्याच तत्परतेने भक्तांच्या हाकेला धावून येतात. ''श्रद्धा'' व ''सबुरी'' हे त्यांनी दिलेले महामंत्र टवटवीत फुलाप्रमाणे त्यांच्या लाखो भक्तांची वेदवाक्येच बनून राहिली आहेत. अधर्माकडे वळू घातलेला हा जीवन प्रवाह पुन्हा धर्माकडे वळविण्यासाठी आज साऱ्या जगाला बाबांच्या शिकवणीची नितांत गरज आहे.

**********

# श्री साईबाबांच्या तीन गोष्टी

**— श्री. संजीव गजानन चंदने**
एम्.कॉम्.
माणिक कॉलनी, चाळ नं ३/७,
अहिल्यादेवी चौक, प्रकाश सिनेमा शेजारी,
कल्याण - ४२१ ३०१.

श्री साईबाबा हे एकमेव संत आहेत की, ज्यांनी समाजाला कोणताही प्रत्यक्ष उपदेश केला नाही. पण साध्या-साध्या शब्दांमधून तसेच स्वतःच्या वर्तणुकीतून समाजाला उपदेशाचे कडू औषध पाजण्याचा प्रयत्न केला. मार्गदर्शनाच्या निमित्ताने समोर येणाऱ्या भक्ताला उद्देशून त्यांनी जो काही उपदेश केला त्याचे संकलन पुढील प्रमाणे —

१) वाईट संगत, निंदा आणि स्वार्थ ह्या तीन गोष्टींपासून सावध रहाणे.

२) ईश्वर, परिश्रम आणि विद्या ह्या तीन गोष्टींचे चिंतन केले तर उन्नतीचा मार्ग मोकळा होतो.

३)वेळ, मरण आणि ग्राहक ह्या तीन गोष्टी कोणाचीही वाट पहात नाहीत.

४) पुढील तीन गोष्टी एकदा बाहेर पडल्या की पुन्हा माघारी येत नाहीत. भात्यातून बाण, तोंडातून शब्द आणि शरीरातून प्राण.

५) आई, वडील आणि तारुण्य ह्या गोष्टी एकदाच मिळतात.

६) कर्ज, कर्तव्य आणि कारुण्य कधीही विसरु नये.

७) वासना, मोह आणि उन्मत्तपणा ह्या तीन गोष्टी प्रत्येकाने ताब्यात ठेवलेल्या बऱ्या.

८) आई, वडील आणि गुरु ह्या तीन व्यक्तिंचा नेहमी आदर करा.

९) लहान मूल, भुकेली व्यक्ती, आणि वेडी व्यक्ती ह्या तीन व्यक्तिंवर नेहमीच दया करा.

१०) संपत्ती, भोजन आणि स्त्री ह्या गोष्टी पडद्याआड शोभून दिसतात.

# दैनंदिन जीवनातून साईभक्ती कशी साधावी

— कुमार सुधीर चिखलीकर
श्री लक्ष्मी छापखाना,
म्हापसा-गोवा.

श्रद्धा आणि सबुरी ही दोन भक्ती पुष्पे घेऊन आपण संत चुडामणी श्री साईनाथांची सेवा करतो. त्याचप्रमाणे आपल्या दैनंदिन जीवनातून श्री साईनाथांची भक्ती कशी साधावी याचा आढावा आपण या लेखात घेऊ.

एक लहानसं उदाहरण घेऊ या. आपण कित्येक वेळा आपल्या कामानिमित्त बस, रेल्वेतून प्रवास करीत असतो. अशावेळी कित्येक वृद्ध, अपंग, स्त्री, लहान मुले उभी असतात. अशावेळी आपणास शक्य असेल तर त्यांच्यात श्री साईनाथांना पाहून त्यांना बसावयास जागा दिली तर ती सुद्धा एक श्री साईचरणी सेवा होते.

श्री साईनाथांनी सांगितले आहे की, प्रत्येक प्राणीमात्रात माझा अंश भरलेला आहे. मी तुमच्या हृदयात आहे तसेच आपण सर्व माझ्यात आहात. पूर्वजन्मीचे ऋणानुबंध असल्यामुळे आपण ऐकमेकांजवळ येतो. तेव्हा आपणाजवळ कोणीही प्राणी किंवा मनुष्य जवळ आला तर कृपया त्याला दुष्ट बुद्धिने झिडकारु नका. अत्यंत प्रेमाने त्याला जवळ घ्या. थोडक्यात सांगायचे म्हणजे, सर्वत्र श्री साईनाथांना पहा, ते सर्व विश्व व्यापून आहेत. फक्त भक्ताजवळ त्यांना बघण्यासाठी 'श्रद्धा आणि सबुरी' हवी. श्री साईनाथांचे चिंतन, मनन करा म्हणजे बेडा पार होईल.

परमेश्वर हा भावाचा भुकेला आहे. तुमचा भाव जर परमेश्वरावर शुद्ध असेल तर परमेश्वर प्राप्तीसाठी विलंब लागणार नाही, भाव तोचि देव. आईवडिलांचा आदर करा, त्यांच्यात श्री साईबाबांना पहा, त्यांची सेवा करा. मानवी जीवनात आई-वडिलांना फार महत्व आहे. आई-वडील हे आपले पहिले गुरु आहेत. संत पुंडलिकाने सुद्धा आई वडिलांचे महत्व स्पष्ट केले आहे. ते म्हणतात, 'आई वडील दैवत असता घरी, कशाला जाऊ मी पंढरपुरी?' जीवनात यशस्वी व्हायला आईवडिलांचे आर्शीवाद हवेत.

आत्मकल्याण साधतेवेळी कुटुंबकल्याण साधण्याचा थोडा तरी प्रयत्न करा. हीच खरी साईभक्ती, तोच खरा परमार्थ. प्राणीमात्रांवर भुतदया दाखवा, तहानल्या जीवाला पाणी पाजा. भुकेल्या अतिथीला अन्नाचा घास द्या, गरिबाला तुमच्या जवळील वस्त्र अर्पण करा, म्हणजे प्रत्यक्ष श्री हरीला तुमच्या हाकेला धावत येणे भाग पडेल, असे समर्थ श्री साईनाथांचे सांगणे आहे.

गरिबांना तुमच्या ऐपतीप्रमाणे मदत करा. जे गरिबांना करिती सहाय्य, श्री साईबाबा त्यांना करिती सहाय्य ही गोष्ट लक्षात ठेवा. परोपकारी वृत्ती मनात ठेवण्याचा प्रयत्न करा. वरील गोष्टींतून चित्तशुद्धी होते, आत्मानंद प्राप्त होतो. थोडक्यात सांगायचे असे की, खरी श्री साईभक्ती म्हणजे, जे का रंजले गांजले, त्यासी जो म्हणे आपुले, देव तेथेची जाणावा, साधु तेथेची ओळखावा.

# श्री. खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी

अनुवादक-साईनंद

### रविवार, ७-१-१९१२

सकाळी मी लवकर उठलो व काकड आरतीला उपस्थित राहिलो. साईमहाराज उत्साही दिसत होते. संपूर्ण दिवस मी एक प्रकारच्या हर्षोन्मादात घालविला. सकाळ नंतर मी, बापूसाहेब जोग आणि उपासनी मिळून रंगनाथांच्या योग वसिष्ठास प्रारंभ केला. त्यानंतर आम्ही साईमहाराजांना बाहेर जाताना पाहिले आणि मध्यंतरात मशिदीत आलेल्या मोहम्मदनूस ह्या युवकांशी बातचीत केली. त्यापैकी एकाने काही श्लोक तोंडपाठ म्हणून दाखविले. दुपारची आरती उशिरा झाली. साईबाबांनी एका उत्कृष्ट कथेस आरंभ केला. ते म्हणाले की, 'त्यांच्याकडे एक चांगली विहिर होती. त्यातील पाणी आकाशीनिळे होते. आणि त्यातील पाण्याचा पुरवठा न संपणारा होता. त्या पाण्यावर वाढलेल्या झाडांची फळे चविष्ट असत.' येथवर येताच त्यांनी पुढील गोष्ट सांगण्याचे थांबविले. दुपारी दिक्षितांचे रामायणातील दोन पाठांचे वाचन झाले. त्यावेळी मी, उपासनी, राममारूती आणि दिक्षित हजर होतो. तद्नंतर आम्ही साईबाबांकडे गेलो आणि त्यांच्या रपेटीत सामील झालो. लाकूडतोड्या महिलांवर ज्याप्रमाणे राग केला जाईल तश्या प्रकारचा वरकरणी क्रोध अंधार पडताना त्यांनी केला. रात्री भीष्माचे भजन आणि दिक्षितांचे रामायण झाले.

### सोमवार, ८-१-१९१२

सकाळी मी बऱ्याच लवकर उठलो. आणि तसे उमगल्यावर पुन्हा झोपी गेलो. त्यामुळे बऱ्याच गोष्टी पुढे ढकलाव्या लागल्या आणि नित्याचा पूर्ण दिवसाचा क्रम विस्कळीत झाला. प्रार्थना झाल्यानंतर मी, बापूसाहेब जोग, उपासनी, राममारूती आणि माधवराव देशपांडे यांच्याबरोबर रंगनाथांचे योग वसिष्ठ वाचण्यास बसलो. आम्ही साईमहाराजांना बाहेर पडताना आणि परतताना पाहिले. दुपारच्या आरती नंतर साईमहाराजांनी आकस्मिक क्रोध दर्शविला आणि त्वेषाने अपशब्द उच्चारले. यातून असे निदर्शनास येत होते की, प्लेगची साथ पुन्हा येत आहे व साई महाराज तिच्या पुनरागमनास प्रतिबंध करीत आहेत. भोजनानंतर आम्ही गप्पागोष्टी मारण्यास बसलो. मी रामायणातील छोटासा भाग वाचला. आणि त्यानंतर कोपरगावचे मामलतदार श्री. साने, धुळीयाचे डेप्युटी कलेक्टर श्री. जोशी यांच्यासमवेत दाखल झाले. रामायणातील एका पाठाचे वाचन झाल्यानंतर आम्ही साईमहाराजांकडे गेलो. आम्ही त्यांना पाहण्यासाठी बराच वेळ तेथे थांबलो. आणि त्यांच्या नित्याच्या फेरफटक्यानंतर शेज आरतीला उपस्थित राहिलो. रात्री नेहमी प्रमाणे रामायण व भजन झाले.

बुधवार, १०-१-१९१२


सकाळी मी लवकरच उठलो आणि माझी प्रार्थना संपविली. दिवस उजाडण्यापूर्वी सर्व विधी उरकून मी साईमहाराजांना बाहेर पडताना व मशिदीत परतताना पाहण्यासाठी गेलो. तेथे एक मारवाडी आला आणि त्याने त्याचे स्वप्न सांगितले. तो म्हणाला, त्याला पुष्कळ चांदी व सरतेशेवटी सुवर्णाचे गज मिळाले. ते मोजत असतानाच त्याला जाग आली. साईसाहेब म्हणाले की, हे स्वप्न कुणातरी महान व्यक्तिचा मृत्यू सुचवित आहे.

# श्री साई अभंग

जिकडे तिकडे शोधिशी का रे
फिरशी वेड्यापरी -
वसे तो साई तुझ्या अंतरी ॥ धृ. ॥
घेतो मानव जन्म एकदा
साई असे तो सदासर्वदा
या विश्वाचा तो निर्माता
भाव असे अंतरी
वसे तो साई तुझ्या अंतरी ॥ १ ॥
सुखदुःखाच्या या संसारी
साई नाम ते अती गुणकारी
तो सखलांचा भाग्यविधाता
जागा असे श्री हरी
वसे तो साई तुझ्या अंतरी ॥ २ ॥
शिरडीच्या या भव्य मंदीरी
साई देव तो नित्य वास करी
साई विना ना जगते काही
आनंद भजना करी
वसे तो साई तुझ्या अंतरी ॥ ३ ॥

— **श्री. महेश गजानन शिवलकर**
राजापूर.

# साईदरबारातील नवरत्ने.... ५
# रावसाहेब गोविंदराव रघुनाथ दाभोलकर
# उर्फ हेमाडपंत



श्रीसाईबाबांचे लाडके अण्णासाहेब दाभोलकर यांना साईबाबा प्रेमाने 'हेमाडपंत' किंवा कधीमधी 'हेमाड्या' अशी हाक मारीत असत. प्रथम बाबा केवळ थट्टेने व विनोदाने हे नाव घेत असावेत असाच स्वतः दाभोलकरांचा व इतरांचा समज झाला पण पुढे दाभोलकरांच्या हातून जी भरीव कामगिरी झाली ती पाहिली की श्रीसाईनाथांच्या लीलेचे कौतुकच करावेसे वाटते. फार पुरातन काळी देवगिरीच्या रामदेवराजाच्या पदरी हेमाडपंत हा अत्यंत चतुर आणि बुद्धिमान प्रधान होता. त्याने बरेच ग्रंथ लिहिले आहेत. मराठीतील

मोडी लिपी त्यानेच सुरू केली. अण्णासाहेब दाभोलकरांना बाबांनी 'हेमाडपंत' अशी पदवी विनोदाने बहाल केली आणि दाभोलकरांनी देखील ते नाव सार्थ करून दाखविले. साई संस्थानची सर्व व्यवस्था अत्यंत चोख रीतीने त्यांनी ठेवली होती. हिशोब बरोबर व्यवस्थित ठेवले आणि 'साईसच्चरित्' नावाचा अत्यंत बहुमोल व बाबांच्या लीला आणि उपदेश यांनी भरलेला ग्रंथ अण्णासाहेबांनी बाबांच्या परवानगीनेच लिहिण्याला सुरुवात केली व त्यातील प्रत्येक शब्दाला आणि वाक्याला बाबांचा वरदहस्त आणि आशीर्वाद मिळाला असल्यामुळे त्या जगप्रसिद्ध लौकिकाला आणि साईभक्तांच्या परम आदराला खूपच महत्व प्राप्त झालेले आहे.

गोविंदरावजींचे वडील दाभोली गाव सोडून उत्तरकोकणांत केळवें-माहीम गावी आले ते घरच्या "अत्यंत गरीबी" मुळे, असे कोणी म्हणतात, लिहितात व समजतात. वास्तविक अत्यंत गरीब म्हणण्यासाखी त्यांच्या घराण्याची स्थिती नव्हती. गोविंदराव ज्या भारद्वाज गोत्री घराण्याचे होते त्या घराण्याच्या मालकीचा बहुतेक संबंध दाभोली गाव होता. वर सांगितलेल्या सामाजिक आपत्काली त्या घराण्याचे पूर्वज दाभोली गावातून परागंदा झाले व बऱ्याच वर्षांनी त्यांच्या पुढील पिढीचे काही पुरुष पुनः दाभोली गावी येऊन राहिले. त्या संधिकालात गावाचा मोठा भाग दुसऱ्या जातीच्या लोकांनी (न्यायाने नव्हे अन्यायाने चढवण करून) गिळंकृत केल्यामुळे त्या घराण्यातील लोकांची फांकाफांक झाली. गोविंदरावजींच्या घराण्यातील बाळकृष्ण प्रभु नावाच्या पुरुषानेच आमच्या दाभोली मठाला आपल्या "सेडण" नावाच्या क्षेत्रातील जागा इनाम दिली होती, ती 'मठस्थळ" या नावाने ओळखली जाते; व गोपाळ प्रभु व केशव प्रभु ह्या दुसऱ्या बंधूंनी "चंदनभाट" ह्या नावाचे नदीतीरावरील क्षेत्र दीप-नैवेद्यासाठी श्रीमठाला दत्त करून दिले होते. ह्या प्रभु * दाभोलकर घराण्यापैकी काही पुरुष वरघांटी गेलेले तिकडेच स्थायिक झाले आहेत. दाभोली गावात गोविंदरावजींच्या वडिलांच्या नावाची आजमितीसहि थोडी जमीन आहेच. त्यांच्या पूर्वजांनी कैक शतकांपूर्वी स्थापन केलेली श्रीनारायण व गौतमेश्वर ही दोन देवालये 'मठस्थळा'पासून जवळच नदीतीरावर आहेत. त्यांच्या दर्शनासाठी गोविंदराव हे कधी कधी दाभोली गावी जात असत. गेल्या ८/१० वर्षापूर्वी मठस्थळानजीकची उंच जागा खणीत असताना त्यांच्या पुरातन घराचे अवशेष दगडी पाया व मोठ्या काळीथर दगडांचे काही बांधकाम वगैरे-सापडले होते. दाभोली गावातील लोहखंडवाडीत सध्या राहणारे भारद्वाज गोत्री दाभोलकर व गोविंदराव हे मूलतः एकाच घराण्यातील होत.

* या "दाभोलकर" घराण्यातील कित्येकजण अज्ञानाने, बेफिकीर वृत्तीने, अगर परप्रत्ययनेय बुद्धीने अलीकडे स्वतःचे नाव "दाभोळकर" असे लावीत असल्याचे आढळते! "दाभोळ" ह्या नांवाचे रत्नागिरी जिल्ह्यात तालुक्याचे गाव आहेः पण ते कुडाळप्रांतातील ह्या दाभोली गावापासून उत्तरेस सव्वाशे मैल दूर आहे. त्याच्या व ह्या गावच्या नांवात साम्य नाहीः व दोघांचा काहीच संबंधही नाही! एक "ळ" कारान्त तर दुसरे "ली" कारान्त. दाभोली, तेंडोली, खानोली, आडेली ही लीकारान्त ग्रामनामे प्राचीनकाळी "पल्लिआ" अथवा "पल्या" होत्या.

गोविंदरावांच्या घराण्यात ईश्वरभक्ति हा गुण आनुवंशिक आहे. त्यांचे पितामह उत्तरेस श्रीबद्रीनारायणाच्या दर्शनास गेले ते परत आलेच नाहीत. त्यांचे वडील शिवभक्ति परायण (दाभोली गावातील ''गौतमेश्वर'' शिवाचे भक्त) होते व गोविंदरावांचाही लहानपणापासून ईश्वरभक्तीकडे विशेषतः श्रीमारुतीच्या उपासनेकडे फार ओढा होता. ही त्यांची ईश्वरभक्ति हळुहळु वाढत गेली. मोठेपणीही अधिकारप्राप्तीमुळे बेहोष होऊन देवधर्मास न लाथाडता, आपल्या ब्राह्मणोचित परंपरागत वहिवाटीप्रमाणे स्नानसंध्या करून गुरूचरित्र, एकनाथी भागवत, रामायण, उपनिषदे, भगवद्गीता वगैरे धार्मिक ग्रंथांचे पठण करण्याचा त्यांचा नित्य परिपाठ असे. अशा त्यांच्या ईशभक्तीत रंगलेल्या मनाला योग्य मार्ग दाखविणाऱ्या सद्गुरूची गाठ सन १९०९ साली पडली. हे सद्गुरू म्हणजे शिरडी येथील प्रसिद्ध सत्पुरुष **श्रीसाईबाबा** होत.

ह.भ.प. श्री. गोविंदराव रघुनाथ दाभोलकर हे श्रीबाबांचे निःसीम भक्त होते. त्यांचा जन्म इ.स. १८५९ साली मार्गशीर्ष शु. ५ रोजी ठाणे जिल्ह्यातील केळवे-माहिम येथे कुडाळ देशस्थ गौड ब्राह्मण ज्ञातीत झाला. त्यांचे वडील देवभक्त. ते विशेष करून शंकरभक्त होते. त्यांना एक बंधू होते व ते शाळामास्तर होते, परंतु तरुण वयात ते मरण पावले. आपल्या वडिलांप्रमाणेच गोविंदराव हे पण लहानपणी देवभक्त होते. त्यांनी लहानपणापासून मारुतीची उपासना विशेष आवडीने केली. त्यांचे आजोबा श्री. बदरीनारायणाचे दर्शनास गेले ते परत घरी आले नाहीतच.

दाभोलकरांच्या घरची स्थिती अत्यंत गरीबीची होती. त्यामुळे गोविंदरावांना मराठी शिक्षण गावीच फार श्रमाने करावे लागले. इंग्रजी पाचवीची परीक्षा ते पुण्याहून उत्तम प्रकारे उत्तीर्ण झाले. त्यावेळी ही परीक्षा पब्लिक सर्व्हिस परीक्षा म्हणून ओळखली जात असे. घरची गरीबी असल्यामुळे त्यांनी त्यावेळचे ठाणे जिल्ह्याचे डेप्युटी इन्स्पेक्टर कै. साबाजी चिंतामण चिटणीस यांच्या मदतीने राहाते गावी आठ रुपये पगाराची शाळामास्तरची नोकरी पकडली. ती नोकरी त्यांनी उत्कृष्ट प्रकारे केली. पुढे साबाजीरावांना कुलाबा जिल्ह्यात मामलेदाराची जागा मिळाली. त्यामुळे त्यांनी गोविंदरावांना कुलाबा जिल्ह्यात तलाठी या जागेवर नेमले. तिथे त्यांची विशेष अक्कलहुशारी त्या जिल्ह्याचे कलेक्टर सिंक्लेअरसाहेब यांना दिसून आली, व त्यांनी त्यांना आपल्या कचेरीत इंग्रजी कारकूनाची २५ रु. पगाराची नेमणूक करून टाकली. गोविंदराव आपल्या या नव्या नोकरीत अतिशय कर्तव्यदक्ष राहिले. त्यामुळे साहेबांची त्यांच्यावर मर्जी वाढत गेली.

पुढे गोविंदरावांनी रेव्हिन्यू खात्याची परीक्षा दिली. त्या परीक्षेत ते पास झाल्यावर महाड येथे अव्वल कारकुनाच्या जागेवर त्यांची नेमणूक करण्यात आली. पुढे खुद्द सिंक्लेअरसाहेबांची बदली ठाण्यास झाल्यावर त्यांनी गोविंदरावांना ठाणे जिल्ह्यात बदली करून घेतले व फॉरेस्ट सेटलमेंटचे कामावर त्यांना बढतीची जागा देवविली. या जागेवर गोविंदरावांनी कुशलतेने कामकाज सांभाळले. पुढे भडोच मुक्कामी कामावर त्यांना नेमण्यात आले. तिथे गोरगरीबांना अन्न वाटण्याची कामगिरी त्यांनी तत्परतेने केली. इतकेच नव्हे, तर पूर्वी सधन असलेले पण दुष्काळामुळे बिकट स्थिती प्राप्त झाली असतानाही अन्न

न मागणारे अशांचा बारकाईने तपास करून त्यांच्या घरी जाऊन त्यांना अन्न वाटण्याची विशेष सेवा त्यांनी बजावली. त्यामुळे तेथील प्रजेचे त्यांच्यावर विशेष प्रेम बसले. यामुळेच की काय, १९०१ साली कायम मामलेदाराची जागा शहापूर गावी सरकारातून त्यांना मिळाली. १९०३ ते १९०७ सालापर्यंत वांद्रे येथे रेसिडेंट मॅजिस्ट्रेट फर्स्ट क्लासचे काम त्यांनी केले व खूपच लौकिक संपादन केला. हिंदू व मुसलमान या दोन्ही जमातींचा त्यांच्यावर विशेष लोभ होता. गोविंदरावांना मुद्दाम बोलावून आणून त्यांना पानसुपारी केल्याशिवाय मुसलमान लोक ताबूत काढीत नसत. वांद्रयामधील वकील व पोलिस यांचेही त्यांच्यावर अत्यंत प्रेम होते. १९०७ साली गोविंदरावांची बदली मुरबाड, आनंद, जिल्हा खेडा; बोरसद, जि. खेडा इ. ठिकाणी झाली व तेथून १९१० साली वांद्रे येथे रेसिडेंट मॅजिस्ट्रेटच्या जाग्यावर त्यांची नेमणूक झाली व तिथे ते १९१६ मार्चपर्यंत होते व तिथेच ते सेवानिवृत्त झाले.

गोविंदरावजी १९०३ ते १९०७ या कालात वांद्रे येथे असताना त्यांचा हरी सीताराम ऊर्फ काकासाहेब दीक्षित यांचेबरोबर स्नेह जमला. हे त्यावेळी दोघेजण नित्य नेमाने भगवद्‌गीता वाचन करीत. १९०९ साली या उभयतांचा नानासाहेब चांदोरकरांच्या बरोबर परिचय झाला. त्यावेळी ते डेप्युटी कलेक्टरचे पदावर होते; व त्यांच्यामुळेच त्यांना श्रीसद्‌गुरू श्रीसाईबाबांचे पहिले दर्शन झाले. यामुळे या त्रयींना खूपच समाधान वाटले. श्रीसद्‌गुरू साईंनी गोविंदराव ऊर्फ अण्णासाहेब दाभोलकर यांच्यावर अलोट प्रेम केले. बाबांनीच त्यांना 'हेमाडपंत' हा किताब दिला; व त्यांच्याकडूनच श्रीसाईसत्‌च्चरित्राचे ५१ अध्याय पूर्ण करून घेतले. शेवटचा अध्याय हा त्यांनी निधनापूर्वी अवघे दोनच दिवस अगोदर छापण्यास पाठविला होता व हा माझा आता शेवटचा अध्याय असे त्यांनी आपल्या आप्त, नातलग, स्नेह्यांना दोन दिवस अगोदर कळविले होते. गोविंदरावांनी १९१६ साली पेन्शन घेतले व तेव्हापासून आपले आयुष्य परमार्थावर व परोपकारार्थ वेचले. खुद्द साईबाबांनीच त्यांना हेमाडपंत, तुम्ही आमचीच नोकरी करा, असे सांगितले त्याप्रमाणे त्यांनी तनमनाने श्रीसाईंची सेवा अखेरपर्यंत केली. याचेच फळ म्हणून की काय त्यांना कोणत्याही प्रकारची हालअपेष्टा सहन न करता चालताबोलता व त्यांचीच सेवा करता करता मरण आले.

गोविंदराव ऊर्फ अण्णासाहेब दाभोलकर यांचे भगवत् सेवेचे नियम फार असत. स्नानसंध्या आटोपल्यावर सद्‌गुरू चरित्र वाचणे, श्री विष्णू सहस्त्रनामाचे पाठ करणे, श्री एकनाथी भागवत व रामायण वाचणे व काही उपनिषदे व गीता इ.चा आध्यात्मिक अभ्यास करणे हा त्यांचा परिपाठ होता. निधनापूर्वी एक महिना अगोदर ते श्री एकनाथी भागवतातील विसावा अध्याय मोठ्या प्रेमाने वाचीत असत, व आपल्या पत्नी सौ. रखुमाबाई व मुलगी दुर्गाबाई यांना समजावून सांगत. त्यांची वृत्ती सदा आनंदी असे. आपल्याकडे येणाऱ्या-जाणाऱ्यांशी ते मोठ्या प्रेमाने बोलत. दिवसातून बारा तास ते काम करीत. त्यांना कथा ऐकण्याची खूपच हौस होती. त्यांना गजाननराव नावाचे एकुलते एक पुत्र. ते मेडिकल कॉलेजात त्यावेळी शिकत होते, अद्याप ते हयात आहेत. त्यांची

मुलगीसुद्धा मेडिकल कॉलेजात शिक्षण घेत होती.

सोमवार दि. १५ जुलै १९२९ रोजी दुपारी पावणे तीन वाजता गोविंदरावांची वांद्रे मुक्कामी एकाएकी हृदयक्रिया बंद पडली व त्यांना देवाज्ञा झाली. त्यांनी लिहिलेले 'श्रीसाईसत्‌च्चरित्र' खरोखरीच अमर ग्रंथ म्हणून प्रसिद्ध आहे. श्रीसाईंची ही अधिकृत ओवीबद्ध पोथी स्वतः त्यांनी श्रीबाबांना वाचून दाखविली आहे. बाबांनी ती स्वतः आपल्या कानांनी ऐकलेली आहे. हेमाडपंत हे प्रासादिक कवी होते. त्यांच्याजवळ एकदा बाबांनी उद्‌गार काढले होते,

''संसारात प्रत्येकाला सुखदुःखे भोगावी लागणारच; पण माझ्या एकनिष्ठ भक्ताला कुटुंब पोषणाला लागणाऱ्या आवश्यक गोष्टींची म्हणजे अन्नपाणी व कपडालत्ता यांची ददात मी कधीही पडू देणार नाही. माझ्यासारख्या कफल्लक फकिराकडून भक्तांनी जास्त अपेक्षा करू नयेत. क्षणभंगुर संपत्तीची आणि मानमान्यतेची खोटी आशा बाळगू नका. माझ्या शक्तीबाहेरच्या गोष्टी मागण्याकरिता माझे पाय धरू नका. त्या ऐवजी आपल्या सच्चिदानंद दयानंद प्रभूची मनोभावे आराधना कराल, तर तोच तुमच्या हाकेला धावून येईल. आम्ही निमित्तमात्र, परमेश्वराचे बंदे गुलाम आहोत. कोणत्याही धर्मातील परमेश्वराचे ध्यान एकदा निश्चित करा, म्हणजे माझ्या ठिकाणी तुम्हाला दुजाभाव आढळणार नाही. दुष्ट, घाणेरडे विचार काढून टाका आणि सदाचरणाने नित्य वागणाऱ्या मित्रांचीच संगत ठेवा.

''लोक मतलबी असतात. वेळ आली म्हणजे आपल्या साथीदाराला सोडून स्वार्थ पाहातात म्हणून नेहमी आपल्याला कधीही सोडणार नाही, असाच मित्र किंवा साथीदार पाहावा. सर्व भूतलावर प्रेम करावे, पण संग मात्र सद्‌गुरूचाच करावा. सद्‌गुरू आपल्या भक्ताला कधीच अंतर देत नाही.''

''आपण लोकांवर शुद्ध बुद्धीने उपकार करतो. त्यांचे कल्याण इच्छितो, पण कृतघ्न अशी जी माणसे असतात, ती आपला स्वार्थ साधण्यासाठी गोडगोड बोलून आपला उपयोग करून घेतात. कामापुरता मामा, काम संपले की, तो मामा येई न कामा.''

''गरज सरो आणि वैद्य मरो'' अशी त्यांची वृत्ती असते. मग कोणत्याही कारणाने कुरापत काढून ते भांडण करतात व तुमचा भाव विचारीत नाहीत; पण केलेले उपकार न स्मरून उलट अपकार करण्यातच संतोष मानतात. अशा माणसाचे प्रभू केव्हाही कल्याण करीत नाही. इतकेच नाही, तर त्याच्यावर परमेश्वराचा कोप होऊन शेवटी त्याचा सत्यानाशच होतो. म्हणून माणसाने नित्य उपकार स्मरावेत. कृतघ्न होऊ नये. केलेल्या उपकारांची फेड अंशतः तरी आपल्या सामर्थ्याप्रमाणे झालीच पाहिजे. नाही तर हे उपकारांचे ऋण जन्मोजन्मी पशुपक्ष्यांचे योनीत जन्म घेऊन फेडावेच लागते. वैर आणि ऋण ही कधीच चुकत नाही.''

श्रीसाईंनी हेमाडपंतांच्याजवळ काढलेले हे उद्‌गार म्हणजे खरोखरच भक्तांना सापडलेला अमृतनिधीच आहे. त्यांचा प्रत्येक शब्द लाख-लाख मोलाचा असा आहे यात शंकाच नाही.

या ओवीवृत्तातील पोथीच्या आज २० वर आवृत्त्या झाल्या आहेत. धन्य ते साईभक्त गोविंदराव दाभोलकर, आणि धन्य त्यांनी लिहिलेली बाबांची ती पोथी.

# श्रद्धेचे फळ

— श्री. बाळकृष्ण ए. देसाई
सी-३, हर्मेस पार्क,
३०, बंड गार्डन रोड,
पुणे - ४११ ००१.

मनुष्यप्राणी कोणत्या ना कोणत्या देवाची पूजा करतो, का तर त्याला जे काही मिळायचे असते, ते देवावरील अनन्य भक्तीने मिळू शकते. पण ही गोष्ट चटकन होत नसते. त्याला बराच काळ जावा लागतो. विद्यार्थी शाळेत जाऊ लागला, म्हणजे त्याला सारे काही येऊ लागले, हे समजणे जसे चूक आहे, तसेच देवभक्तीचे आहे. विद्यार्थ्याला प्रतिवर्षी एकेक पायरी चढावी लागते, नि मग एका तपानंतर त्याला हवे ते मिळविता येते. देव आणि भक्त यांचे असेच नाते आहे.

साईबाबांचे एक सूत्र नजरेसमोर ठेवून त्याचे अहर्निश पालन केले, तरच ते आपला अनुग्रह आपल्या भक्तावर करीत असतात. ''श्रद्धा आणि सबुरी'' हे त्यांचं सूत्र! अगोदर ज्याची आपण पूजा-अर्चा करतो, त्याच्यावर अत्यंत निष्ठापूर्वक श्रद्धा असली पाहिजे. नि दूसरं ती श्रद्धा दीर्घकाळ अखंड चालू राहिली पाहिजे, तेव्हाच मनःपूर्ती होत असते.

साईबाबा भक्तांना अचूक गोष्टी सांगत नि मगच त्यांच्या मनोकामना पूर्ण करीत, म्हणून ते देव. लोकांनी त्यांना देव म्हटलेलं आवडत नसे. ते एक साधु होते असंच ते समजत. पण आपण राम, कृष्ण यांना देव मानतो. का तर लोक सांगतात ते देव होते. त्यांना आपण पाहिलेले नसते. शिवाय ते ज्या काळात माणसात वावरले, त्या काळात ते तुमच्या आमच्या सारखेच व्यवहार करीत असत. मात्र त्यांच्या व्यवहारापासून कुणाचेच अकल्याण झाले नाही. दुर्जनाला शिक्षा नि सज्जनाला पाठिंबा असल्यामुळे लोकांना त्यांचे वागणे आवडे. त्यांच्या ठिकाणी आपपरभाव नव्हता, तसाच गरीब-श्रीमंतीचा प्रश्न नव्हता. दीनदुबळ्यांच्या उपयोगी पडून त्यांना समर्थ करणं हेच त्यांचं प्रमुख ध्येय होतं. हेच कार्य आपल्यात वावरुन श्री. साईबाबांनी केले.

सर्वभूति आत्मा एकच, ही भावना पटविण्यासाठी त्यांनी विशिष्ट घरातून जमवून आणलेली शिदोरी-खाद्य पदार्थ ते एका परळात ठेवित. भुकेच्या वेळी हवे तेवढे खात. राहिलेले अन्न कुत्री, मांजर, पक्षी खात. त्यातून उरलेले बाबा खात. पहाणारे लोक म्हणत, 'शी, शी! कसली घाण बाबा खात आहेत!' यावर बाबा म्हणत, 'माझ्या शरीरात जो आत्मा आहे, तोच त्यांच्याही शरीरात आहे, नि तुमच्याही! म्हणून ते काही निराळे नव्हेत.'

राम, कृष्ण ज्या काळात लोकांत वावरले, त्या काळातील लोक रामाला दशरथाचा पुत्र नि कृष्णाला वसुदेवाचा असेच म्हणत. त्यांच्याबरोबर खेळत, फिरत मजा करीत. त्यांना देव म्हणत नसत. त्यांच्या वागणुकीत कुणाबद्दलही आपपरभाव नव्हता. भेद नव्हता. जो सत्कर्म करतो, गोरगरिबांना आपला म्हणतो, त्यालाच त्यांचा आधार असे. त्यालाच त्यांच्या इच्छेप्रमाणे ते देत, मदत करीत. हे पाहिल्या नंतर साईबाबातरी कुठे वेगळे होते?

कोपरगावचे एक श्रीमान सद्‌गृहस्थ. जमीन जागा, पैसा अडका, नोकर चाकर ह्यांची त्यांच्यापाशी विपुलता होती. मात्र नव्हता पुत्र. तीन लग्नं केली. पण एकीलाही पुत्र संतान नाही. त्यामुळे मन विषण्ण. त्यांना कुणी शिरडीची वाट दाखवून म्हटलं, 'बाबांचं दर्शन घ्या! तुमचे मनोरथ पूर्ण होतील!'

मोठ्या कष्टानं तिन्ही स्त्रियांना घेऊन ते शिरडीला आले. टांगेवाल्याने त्यांना विचारले, 'इथं तुम्ही कुठं उतरणार?

ते गृहस्थ काय उत्तर देणार? इथं ना कुणाची ओळख न देख! आता... मनात विचार चालले आहेत तोच म्हाळसापती अन् माधव मास्तर शामा तिकडून चालले होते. त्यांनी टांगेवाल्याला म्हटलं, 'ह्यांचं इथं कुणी नाही ना! मग ह्यांना काशिरामकडे घेऊन जा. तिथं तो करील ह्यांची खाण्यापिण्याची सारी व्यवस्था!'

टांगेवाला काशिरामच्या दारात आला. मंडळी टांग्यातून उतरली. काशिरामने मोठ्या अदबीने त्यांची सारी व्यवस्था केली. कोपरगावचे ते शेठ लोडाला टेकून स्वतःचे पाय चोळीत होते. स्त्रियाही त्यांच्या शेजारी बसल्या होत्या. त्या सर्वांचे चेहरे कोणत्यातरी काळजीने फिकट, मलूल नि पाहणाऱ्याला उदास वाटत होते.

रात्रीच्या वेळी नवऱ्याच्या उशाला बसलेल्या त्या तिन्ही स्त्रिया त्याला खडसावीत होत्या, 'तुमच्या नशिबी काय वाढून ठेवलेले आहे हे जाणत असताही, तुम्ही ही एक, दोन, तीन लग्नं काय म्हणून केलीत? हातात पैसा नि श्रीमंती होती म्हणून? आम्हाला नरकात लोटून आपण काय मिळविलेत? आता आम्ही तुम्हाला तळतळून शाप दिले, तर त्यात आमचं चुकलं असं कोण म्हणू शकेल? तुम्ही पुढील जन्मी स्त्री होऊन आमच्या प्रमाणे मूल नाही, मूल नाही म्हणून दुःख करीत बसाल! कधीच तुम्हाला सौख्य लाभणार नाही, हाच शेवटी आमचा तुम्हाला शाप! कुठंही फिरलं तरी पळसाला पानं तीनच!'

बिचारा गृहस्थ भयभीत झाला. पण काशिरामचे शब्द त्याच्या डोळ्यासमोर नाचू लागताच काहीसा सावरुन ते शब्द तो पुन्हा पुन्हा मनाशी घोळवू लागला, "काय सांगू तुम्हाला, ज्याच्यावर गुरुकृपा झाली त्याला काय उणे आहे?"

काशिरामने त्या गृहस्थाला सांगितलं, "गुरुला आपलासा करणं हा मार्ग साधा नाही. मोठा बिकट आहे. लोक निंदा करतात, हसतात, नाना तऱ्हेच्या कंड्या उठवितात. त्या सर्वांना निर्धारानं तोंड देऊन गुरुमाऊलीचे पाय जो सोडीत नाही, त्यालाच भाग्याचे दिवस लाभतात. त्याची मनोकामना तृप्त होते."

काशिरामच्या शब्दांनी त्या श्रीमंत गृहस्थाचं म ल्हसित झालं. त्याने बाबांचे पाय मस्तकी धरले. नि सेवेला सुरवात केली. त्याच्या बायकांनी त्याची चेष्टा चालविली. तथापि डोळ्यासमोर श्रीबाबांची धिरोदात्त मूर्ति नि त्यांची भक्ति चालू झाली, अन् अखेर इच्छा प्राप्तीचा सुखद सोहळा पदरात पडला. निंदकांची तोंडं बंद झाली नि बाबांचे गोडवे घरोघर गाऊ लागले.

श्रीसाईबाबा साक्षात् दत्तगुरुचे अवतार. त्यांच्या कार्यभूमीत शिरडीत दर गुरुवारी यात्रा भरते. रामनवमीला श्रीरामजन्म साजरा केला जातो. आषाढ पौर्णिमा, गुरुपौर्णिमा म्हणून दुमदुमते. नवरात्रात नि विजयादशमीला मोठ्या आनंदोत्सवाला भरती येते. अशावेळी कुणाच्याही मनाचं पारणं फिटावं, नि रघुपति राघव राजाराम । पतीत पावन साईनामाच्या घोषाने प्रतिसाद ठिकठिकाणी उमटावे एवढा सुखसोहळा साजरा होत असतो. 'जिथे साईकृपा होई । तिथे काय उणे राही?'

# श्रीसाईबाबांचे तत्त्वज्ञान

— **कु. सुधा लक्ष्मण पाटील,**
महेश कृपा चाळ,
लोकमान्य नगर,
ठाणा-४०० ६०६.

अनेक युगानुयुगे भगवंतांना भूतलावरील प्राणीमात्रांच्या रक्षणासाठी अवतार घ्यावे लागले. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, गजानन महाराज, अक्कलकोट स्वामी, नित्यानंद स्वामी असे अनेक संत-महंत ह्या पृथ्वीवर होऊन गेले. त्याचप्रमाणे भगवान श्रीसाईबाबा हेही ईश्वराचे अवतार होते.

संत ज्ञानेश्वरांनी आपल्या योगसामर्थ्याने, घरातील प्रापंचिक अडचण असल्याने, मुक्ताबाईला आपल्या पाठीवर मांडे भाजण्यास सांगितले व वयाच्या १६ व्या वर्षी "ज्ञानेश्वरी" लिहिली.

समर्थ रामदासांच्या आईची दृष्टी गेली असताना, प्रत्यक्ष प्रभू रामचंद्रांच्या उपासनेने आईची दृष्टी तर आलीच व प्रभू रामचंद्रांचे साक्षात् दर्शनही घडले. अशी संत-महंतांची अनेक कार्ये आहेत.

श्री सद्‌गुरू साईबाबांजवळ असेच ईश्वरी सामर्थ्य होते. त्यांना रिद्धी-सिद्धी प्राप्त होती. श्रीसाईबाबा कित्येक वेळा श्रद्धावान भक्तांजवळ दक्षिणा (जवळ असलेली सर्व रक्कम) मागत असत. आणि 'चल-जा!' ह्या शब्दात, त्यास तेथून जाण्यास सांगत असत. व पुन्हा त्यांच्या पाठीशी गुप्तरितीने राहून ह्या ना त्या मार्गाने मदत करीत असत. अशी अनेक उदाहरणे आहेत. असे चमत्कार साईबाबा प्रत्यक्ष असताना घडत असत. व आजही घडत आहेत.

साईबाबांचे एक भक्त शिर्डीत गेले असता, तेथील दुकानात त्यांस श्रीसाईंची नयनरम्य प्रतिमा पाहून ती घेण्याची प्रबळ इच्छा झाली. परंतु फक्त प्रवासापुरतेच पैसे शिल्लक असूनही त्यांनी ती साईंची प्रतिमा घेऊन, श्रीसाई समर्थ आपल्या पाठीशी उभे आहेत अशी दृढ भावना मनाशी बाळगून, त्यांनी पायी चालावयास सुरूवात केली. साईबाबा जणूकाही त्याची सत्वपरिक्षा पहात होते. बरेच अंतर चालून आल्यावर त्यांस वाटेत एक २० रु. असलेले पाकीट सापडले व त्या पैशांतून ते सुखरूप घरी आले. असे

अनेक चमत्कार आज घडत आहेत. फक्त श्रद्धा व सबुरी हवी.

श्रीसाईबाबा अंगात कफनी, डोक्यास फडके अशा सामान्य वेशात रहात होते. परंतु त्यांचे सामर्थ्य बलवान होते. बाबांनी आपल्या तिरस्कार करणाऱ्या वाण्यांना, पाण्याने पणत्या पेटवून दाखविल्या. जमिनीवर चिमटा आपटून अग्नी निर्माण केला. उदीच्या सहाय्याने भक्तांची दुःखे दूर केली. सर्वांना श्रद्धा-सबुरी या महामंत्राने आपलेसे केले. त्यांनी भक्तांना दिलेल्या ११ वचनांतून आश्वासन दिले आहे —

"नित्य मी जिवंत जाणा हेच सत्य।
नित्य घ्या प्रचित अनुभवे।

बोला---- बाबांचा जयजयकार, जयजयकार....
साईबाबांचा जयजयकार, जयजयकार....

# श्री साईनाथांची आरती

जयदेव जयदेव जय साईनाथा, ऐकूनी कीर्ति तुमची
झुकतो माथा, जयदेव जयदेव..... ॥ धृ. ॥
'सबका मालिक एक' गर्जविला नारा
दुःखी जनतेच्या कष्टांचा वाहिला भारा
अनाथांना दिला मायेचा सहारा
धर्माच्या अंधारात उगविला तारा
जयदेव जयदेव जय साईनाथा, ऐकूनी कीर्ति तुमची
झुकतो माथा, जयदेव जयदेव..... ॥ १ ॥
चमत्कृतीने केले पाण्याचे तेल
दुष्ट लोक सारे झाले खजील
हिंदू-मुस्लिमांचा घातला मेळ
धर्म-मार्तंडांचा बंद केला खेळ
जयदेव जयदेव जय साईनाथा, ऐकूनी कीर्ति तुमची
झुकतो माथा, जयदेव जयदेव..... ॥ २ ॥
'शिर्डीचे बाबा' म्हणून लोक ओळखती
दर्शन घेण्या बाबांचे भक्तजन येती
बाबांच्या ऊदीने सर्व दुःख हरती
बघून साईंचा प्रताप, दोन्ही कर जुळती
जयदेव जयदेव जय साईनाथा, ऐकूनी कीर्ति तुमची
झुकतो माथा, जयदेव जयदेव.... ॥ ३ ॥

**— श्री. मिलिंद रमेशराव जोशी**
श्री. द.शं. घोडजकर यांचा वाडा,
वकिल कॉलनी, कंधार,
ता. कंधार, जि. नांदेड,
पिन - ४३१ ७१४.

# अन्नदान

— श्री. प्रमोद बी. रायसोनी
१६४, समर्थ नगर,
औरंगाबाद.

कलीयुगात नामस्मरणाला जेवढे महत्व आहे तेवढेच अन्नदानालाही आहे. अन्न हे पूर्ण ब्रह्म आहे म्हणूनच प्राचीन काळापासून अन्नाला महत्व प्राप्त होत आले आहे. बारा वाजले व पोटात काही नसेल तर जीव कासावीस होतो, यातना होतात, म्हणून दुपारचे बारा म्हणजेच भिक्षेची वेळ असा क्रम चालत आला. आपले महान संत साईदेव रोज बारा वाजता पाच घरी भिक्षा नित्यनियमाने मागत. ह्यावरून बाबांनी सुद्धा अन्नाला फार महत्व दिले होते. रोज ते अन्न गोळा करून पशुपक्षांना वाटीत. बाबांनी पूर्ण जाणले होते की, अन्ना शिवाय प्राणी मात्राला यातना होतात.

वस्त्रदान, विद्यादान, अन्नदान, अभयदान, द्रव्यदान असे अनेक दानाचे प्रकार आहेत. ह्या सर्व दानात अन्नदान हेच उच्च कोटीतले दान होय! दुसऱ्याचा आत्मा जेवून तृप्त झाला तर समाधान किती मिळते याची कल्पना प्रत्येकाला असावी यासाठी साईबाबांनी एका स्त्रीस, 'मला भूक लागली आहे, मला जेवण लवकर तयार करून आण' असे सांगितले. त्या स्त्रीने खरोखरच घाईघाईने स्वयंपाक तयार करून आणला व बाबांनी समोर भुकेने त्रस्त झालेल्या दुबळ्या कुत्र्याला ताट देऊन तृप्त केले. त्या स्त्रीला त्या वेळेस वाईट वाटले परंतु बाबांनी कृतीतून दाखवून दिले की, सर्व प्राणी मात्रांची भूक एकच आहे. तो आणि मी वेगळा नाही. तू जो स्वयंपाक आणला तो कुत्र्याने जरी खाल्ला तरी तो मला पोहचला. अशाप्रकारे अनेकविध प्रसंगांतून साईबाबांनी अन्नदानाची महती पटवून दिली आहे.

साई एका स्त्रीस म्हणत आहेत,

आई त्वां आज मज जेवूं घातलें। तेणे हें आकंठ पोट भरलें ।।
होते ते प्राण व्याकुळ झालें। ते तृप्त केले गे तुवां ।।
ऐसेच करीत जावे नित्य। हेची कामीं येईल सत्य ।।
मशीदींत बैसून मी असत्य। बोलेन हें त्रिसत्य घडेना ।।
भुकेल्या भाकर आधीं द्यावी। आपुल्या पोटानंतर खावी। धरावें जीवीं हे नीट ।।

साईबाबांना उपास-तपास अजिबात आवडत नसे. त्याचप्रमाणे बाबांनी स्वतः सांगितले आहे की, अरे गुरु शोधावयास निघाला आहेस का? भुकेने तू व्याकूळ आहेस, प्रथम भाकर तुकडा खा, तृप्त हो, गुरु तुला शोधत येतील.

शेवटी अन्नदानाची महती वर्णावी तेवढी थोडीच आहे. साई स्वतः मशिदीत चूल मांडीत व त्यावर एक मोठे डगे (भांडे) ठेवून स्वयंपाक करीत व लोकांना जेवू घालीत.

कलीयुगी अन्नदान हेच महत दान होय।
कित्येक संकटाचे, पापांचे, बिमोड करिती अन्नदान ।।

# ज्याचे मुखीं साई जगी त्यास भय नाही

— श्री. चंद्रकांत श्रीराम गरगटे
"साईकृपा", ३९९, गुरुवार पेठ,
सातारा-४१५ ००२.

मानवी जीवन हे अंधःकारमय आहे. परंतु ज्यांच्याजवळ साईनामरुपी दीपक आहे ते नेहमी प्रकाशातच असतात. ज्यांच्या अंतर्यामी सत्याचा प्रकाश आहे त्यांच्याकरिता बाहेर अंधःकार रहात नाही. जितका अंधःकार अंतर्यामी असतो तितकीच त्याची मात्रा बाहेर असू शकते.

जीवनात दोन गोष्टी मिळविण्यासारख्या आहेत आणि त्या म्हणजे सत्य आणि प्रेम. परंतु जो सत्य मिळविण्यात यशस्वी होतो, तो नकळत प्रेमात प्रतिष्ठित होतो. आणि ज्याचा प्रवेश प्रेमरुपी मंदीरात होतो, त्यास आपण सत्याच्या समोरच उभे आहोत असे आढळून येते. प्रेम हा सत्याचा प्रकाश आहे आणि सत्य प्रेमाच्या यात्रेची पूर्णता आहे.

हिरा हा मूलतः कोळसाच आहे. कोळशातच हिरा लपलेला असतो. त्याचप्रमाणे स्वतःतही सत्य लपलेले असते.

मानव देहातील प्रत्येक प्राणी सुखासाठी धडपड करीत असतो. क्षणिक, क्षणभंगूर अशा सुखाच्या लाटा यावरच बिचारा मिटक्या मारीत असतो. मानवास भयंकर अशा मोहाची निद्रा, अज्ञान आणि आळसाच्या वस्त्रांखाली लागली आहे. प्रत्येक प्राणी हा सुखासाठी धडपड करीत असतो. परंतु सर्वसुखी असा या जगामध्ये कोण आहे?

मनुष्य हा क्षणभंगूर प्राणी आहे, त्याचा भरवसा नाही. कारण प्रत्यक्ष आपल्या जीविताची सूत्रे दुसऱ्याच्या हाती असून आपण केवळ कळसूत्री बाहुल्यांप्रमाणे नाचत आहोत. ह्या संसाराच्या महापुरात एखाद्या गवताच्या काडीप्रमाणे हेलकावे खात तो नेईल तिकडे आपण जात आहोत. इतकेच नव्हे तर पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणे ऐटीत आपण चालत आहोत पण त्या बुडबुड्याइतके आपले आयुष्यही क्षणभंगूर आहे आणि आपणास त्या बुडबुड्याप्रमाणे केव्हा पटकन् फुटण्याचा प्रसंग येईल किंवा देहातील प्राणरूपी वायू केव्हा निघून जाईल, याची तरी शाश्वती आहे काय?

जगात दुःख पर्वताएवढे आणि सुख मात्र मोहरीएवढे असे असताना त्या सुखाच्या मागेच मनुष्य पळत सुटतो. जीवाचा आटापिटा करतो, मिळेल तेवढे सुख घेण्याचा त्याचा प्रयत्न असतो.

सुख मिळविण्यासाठीच प्रत्येकाचा प्रयत्न चालू असतो. सुखाच्या क्षणाचा जन्म हा दुःखातून व कष्टातून व्हावा असाच नियम आहे. माणसाची प्रगती होण्यास दुःख आवश्यक आहे, तो महत्त्वाचा संकेत आहे यात शंकाच नाही.

म्हणजेच सुख हेच एक शिखर गाठण्याकरिता आपण धावत असतो. सुख म्हणजेच सर्वस्व असे हळूहळू आपण मनाला बजावतो. आणि स्वतःच्या मनावर पांघरूण घालून त्याचे खरे स्वरूप झाकायला सुरुवात करतो. ऐहिक उपभोग हेच सर्वस्व मानू लागतो

आणि त्यासाठी वाटेल त्या मार्गाचा अवलंब करून स्वतःला 'चार्वाका'च्या अनुयायांत सामील करतो.

तात्पर्य, जोपर्यंत जगायचे आहे, जोपर्यंत हे आयुष्य आहे तोपर्यंत सुखाने जगावे, चैन करावी. म्हणजेच 'ऋण काढून सण करावा.'

मानव देह हा एक ना एक दिवस अग्निच्या स्वाधीन जाणार आहे, देह हा नष्ट होणारच, तो काही पुन्हा परत मिळणार नाही. आपल्या मृत्यूनंतरही जीवन चालूच असते. आत्मा व परमात्मा (जीव व शिव) यांची शाश्वत भेट होईपर्यंत हा जन्ममरणाचा खेळ चालूच राहतो.

प्रत्येक आत्मा नव्या संसारात नवा देह धारण करीत असतो. पूर्वजन्मीच्या इच्छा पूर्ण करण्याकरिताच पुनर्जन्म होत असतो. आपण सर्वजणच पुनर्जन्म घेऊन आलेलो आहोत. काही देणी व काही घेणी करिताच विशिष्ट कुटुंबात आपण आपल्या पूर्वकर्मानुसार सुख-दुःख भोगण्याकरिता, सुख-दुःख देण्याकरिता एकत्र आलेलो आहोत.

ज्या देहाच्या सुखाकरिता आपण धडपडतो, तो देह स्वतः काहीच सुख भोगत नाही तर त्या देहाशी तादात्म्य पावणारा 'देह म्हणजेच मी' अशी दृढ भावना करून घेणारा आत्माच सुख भोगतो व सुख भोगण्यापूर्वी देहाला व मनाला कष्ट आणि वेदना भोगायला लावतो.

आपण सुखाचा शोध जन्मभर करीत राहतो, लहान इच्छा व वासना पूर्ण करीत राहतो, तरी आपण तृप्त होत नाही. समाधानी व शांत होऊ शकत नाही.

जेव्हा आम्ही दुसऱ्याच्या दुःखाचा वाटा स्वीकारून त्याचे दुःख हलके करतो तेव्हा त्या दुःखात सहभागी होण्यात अंतरात्म्यास थोडे समाधान मिळते. जर दुसऱ्याचे भले झालेले पाहून मत्सर, द्वेष, तिरस्कार किंवा हेवा न वाटता स्वतःचेच भले झाल्याचा आनंद मनात दाटला तर आपला आत्मा विकास पावू लागला आहे, असे निश्चित समजावे. म्हणजेच समाजाच्या सुख-दुःखाशी जेव्हा मनुष्य एकरूप होऊ लागतो तेव्हा त्याच्या आत्म्याचा विस्तार होतो.

परंतु याकरिता प्रत्येक मानवाने परमेश्वराची आराधना, उपासना केली पाहिजे. मानवाने स्वतःला दुबळे अथवा क्षुल्लक समजू नये. मानवी शरीर हे जरी दुबळे असले तरी आपले मन कणखर असू शकते. म्हणजे आपण स्वतःचा उद्धार स्वतःच केला पाहिजे.

तेव्हा स्वतःच्या मनोवृत्तीचा विचार करा, आपल्याला काय रुचेल व काय पचेल याचाही विचार करा आणि त्याप्रमाणे प्रत्येकाने साईभक्तीस लागले पाहिजे. श्री साई उपासनेमुळे आपल्याला हे सामर्थ्य मिळू शकेल.

काळ धावत आहे, वेळ व्यर्थ वाया जाणार नाही याची प्रत्येकाने खबरदारी घेतली पाहिजे. कारण काळ आपल्यासाठी थांबत नाही. तेव्हा शुभ गोष्टीस कालावधी कशाला? शुभस्य शीघ्रम!

# कबीर: भक्तिसाधना

— श्री. य. न. पंडित
'अर्चना', शरणपूर,
नाशिक-४२२ ००२.

जीवनाच्या बंधानातून जीवनाला मुक्त करण्याचे व परमात्म्याला प्राप्त करून घेण्याचे अनेकानेक मार्ग रूढ आहेत. सर्व सरिता सागराला जाऊन मिळतात, त्याप्रमाणे हे सर्व मार्ग शेवटी परमात्म्याचा शोध घेत घेत तेथेच विलीन होतात.

ज्ञानमार्गाचे स्वरूप अतिशय सूक्ष्म आहे. परमात्म्याच्या ज्ञानाची अनुभूती प्राप्त करण्याकरिता अमूर्त, अनंत आदी शक्तीची आराधना करणे सामान्य साधकाला अत्यंत कठीण आहे. संसारापासून विरक्त राहून बहुतांश कर्मांचा त्याग करून ज्ञानसाधना करणे हे सामान्यांचे काम नव्हे!

हटयोगात मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपुर, अनाहत, विशुद्ध, आज्ञा आणि सहस्त्रदल या षट् चक्रांचे भेदन, इडा, पिंगला व सुषुम्ना या नाडवांच्या माध्यमातून कुंडलिनी शक्तीची जागृती इत्यादि केवळ असामान्यांनाच पेलणाऱ्या गोष्टी या कठोर साधनेत अंतर्भुत आहेत.

दैनंदिन कर्तव्ये पार पाडीत असताना ज्ञानसाधना किंवा हटयोगसाधना करण्याकरिता वेळ मिळणे जेवढे दुष्कर तेवढेच अष्टांग योगाचा अभ्यास करून मनावर पूर्ण ताबा मिळविणेही अत्यंत कठीण आहे.

सर्वसामान्यांकरिता भक्तियोगाची साधना ही सहजसाध्य आहे. कोणत्याही साधनेचे अंतिम ईप्सित भक्तीच्या माध्यमातूनही संपूर्णतः साध्य होते, हे अनेक संतांच्या उदाहरणांवरून सिद्ध झालेले आहे. निगुणपिक्षा सगुणाला, अमूर्तापेक्षा मूर्ताला, ज्ञानापेक्षा भावनेला, विरक्तीपेक्षा व्यवहाराला भक्तिसाधनेत अधिक प्राधान्य आहे. मात्र भक्तिसाधना अन्य साधनांशी विरोधी नाही. उलट कोणत्याही साधनेत भक्तियोगाचा अंतर्भाव झालेला असतो. ज्ञानयोग-हटयोग आणि भक्तियोग यात भिन्नता असली तरी त्यात विरोध नाही, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

कोणत्याही साधनेत मनावर नियंत्रण ठेवणे महत्त्वाचे असते. मन पवित्र, सात्विक व परमेश्वराबद्दल कृतज्ञतेने भरलेले असेल तर पमेश्वर प्राप्तीचा मार्ग सुलभ होतो. मनाला कशाप्रकारे वश करावयाचे, ताब्यात ठेवावयाचे हा एक गहन प्रश्न आहे. श्रीकृष्णांनी मनाचे चंचलत्व मान्य करून त्यावर एकच तोडगा सुचविला आहे,

**"अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते"**

निरंतर अभ्यासाने मनाची चंचलता कमी करता येते.

भक्तिमार्गात गुरुला जेवढे महत्त्व आहे, तेवढेच नामस्मरणालाही आहे. नामस्मरण अर्थातच विवेकपूर्वक झाले पाहिजे. भगवंताबद्दल भक्तीची भावना उफाळून आली पाहिजे. सर्वांभूती परमेश्वराचे दर्शन घडले तर आपोआपच आचारशुद्धी प्राप्त होते. मन सद्विचारांनी

व जीवन सदाचाराने भरून जाते. वैषयिक भावनांपासून अलिप्त राहिल्याशिवाय हे घडणे शक्य नाही. भक्तीची साधना करणारा साधक हळूहळू सुखदुःखाच्या अतीत जाऊ शकतो.

**कबीर सुमिरण सार है, और सकल जंजाल।**
**आदि अंत सब सोधिया, दूजा देखौं काल ॥**

कबीरदास म्हणतात, नामस्मरण हे जीवनाचे सार आहे. ते ब्रह्मतत्त्वापर्यंत जावून पोहोचते. बाकी सर्व भ्रम निर्माण करणारे आहे. आदिपासून अंतापर्यंत सर्व शोध केला तर नामस्मरण हेच महत्त्वाचे साधन आहे. बाकी सर्व काळाच्या ओघात वाहून जाणारे आहे.

**तूँ तूँ करता तूँ भया मुझमें रही न हूँ।**
**वारी फेरी बलि गई, जित देखौं तित तूँ ॥**

परमेश्वराच्या (रामाच्या) नावाने स्मरण करता करता मी परमेश्वरमय (राममय) झालो. माझा अहंकार नाहीसा झाला. जिकडे पहावे तिकडे तूच भरलेला दिसतोस. म्हणून अनेक वेळा मी तुला शरण आलो आहे.

**कबीर सूता क्या करे, जागि न जपै मुरारि।**
**एक दिनाँ भी सोवणाँ, लंबे पाँव पसारि ॥**

मनुष्याला उद्देशून कबीरदास म्हणतात, तू अज्ञान-अंधःकारात झोपून का राहतोस? जागृत होऊन वास्तविक स्थितीचा विचार कर. ज्या परमतत्त्वापासून तुझा जन्म झाला आहे, त्याच्यात लीन होण्याचा प्रयत्न कर.

**कबीर प्रेम न चषिया चषि न लिया साव।**
**सूनें घर का पाहुणाँ, ज्यूँ आया त्यूँ राव ॥**

कबीरदास म्हणतात. जर तू परमेश्वराच्या प्रेमाचा आस्वादच घेतला नाहीस, त्याची गोडीच तुला कळली नाही, तर या जगात तुझे येणे घरात आलेल्या पाहुण्यासारखे आहे.

**लूटि सकै तो लूटियौ, राम नाम है लूटि।**
**पीछैं ही पछिताहुगे, यहु तन जैहै छूटि ॥**

रामनामाचे धन जेवढे लुटता येईल, तेवढे लुटून घे. हे शरीर सोडण्याचा जेव्हा प्रसंग येईल, तेव्हा पश्चाताप करून काय फायदा?

**कबीर चित चमंकिया, चहुँ दिसि लागी लाइ।**
**हरि सुमिरण हाथूँ घडा, बेगे लेहु बुझाइ ॥**

कबीरदासांचे म्हणणे आहे की, मन अतिशय चचंल आहे. या चंचलतेमुळे विषयवासनांची आग चारही दिशांना पसरते आहे. पण तुझ्या हातात हरिनामाचा पाण्याचा घडा आहे. त्याच्याने ती आग विझवून टाक. नामस्मरणाने वासनांची आग नाहीशी होते.

बालसाईभक्तांसाठी

# बालवय आणि ज्ञानप्राप्ती

**— श्री. सुनील द. राणे**

बालसाईभक्तांनो, श्री साईबाबा हे अगदी कोवळ्या वयात म्हणजेच वयाच्या चार ते सोळा वर्षापर्यंत अदृश्य होते. ते कुठे होते, काय करीत होते याची कुणालाच माहिती नाही. ते जेव्हा दृश्य रूपात शिरडीत अवतरले तेव्हा त्यांना अलौकिक सामर्थ्य प्राप्त झालेले होते. साईभक्तांनो, साईबाबांना दिक्कालात पाहण्याची ही जी सिद्धी लाभली, ती कशामुळे? तपोबलाच्या, योगसाधनेच्याच जोरावर नाही का? लहान मूल हे निष्पाप असते, म्हणूनच ह्या निष्पाप जीवाने केलेली साधना ईश्वराप्रत त्वरेने पोचते. आणि मग आपल्या बाल भक्तासाठी परमेश्वराला साक्षात्कार द्यावा लागतो. मानव जसजसा वयाने मोठा होत जातो तसतसा मोह, माया, विकार, वासना ह्या गोष्टींच्या आधीन होतो. त्यामुळे त्याच्याकडून कळत नकळत अनेक चुका, पापं घडत जातात. ईश्वराशी तादात्म्य पावण्यासाठी प्रौढांना पापांचं क्षालन करावं लागतं, त्यासाठी प्रथम त्यांना प्रायश्चित घ्यावं लागतं. परंतु बालकांचं तसं नसतं. ईश्वराला लहान मूल हे फुलासारखं असतं. झाडाला जसं खत-पाणी घालावं तशी त्यावरील कळी फुलत जाते, आणि फुललेले पुष्प इतरांना सुगंध देते, वातावरण प्रसन्न करून टाकते. तसेच लहान मुलांवर योग्य संस्कार झाले, अनंतात पसरलेल्या चैतन्य तत्वाची त्यांना जाण झाली की ब्रम्हज्ञान आकलन करून घेण्याची त्यांना ओढ लागते. ब्रम्हज्ञानात सामावलेल्या आणि ब्रम्हज्ञानाचा पाया असलेल्या पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित, खगोलशास्त्र इत्यादी विषयांबद्दल जाण करून घेण्याची, त्यांचा परिपूर्ण अभ्यास करण्याची दांडगी आत्मशक्ती त्यांच्या ठायी निर्माण होते. ही ज्ञानलालसा लहान वयातच उत्पन्न झाली की ब्रह्मज्ञान अवगत होण्यास विलंब लागत नाही. कारण लहान मूल हे निष्पाप असते, हे वर उल्लेखिलेच आहे. एकदा का त्याला ब्रह्मज्ञानाची ओढ लागली की मग जरी तो जीव वयाने मोठा झाला तरी त्याला कोणत्याच वैषयिक वासना मोह पाडू शकत नाहीत. अशा सज्जनत्वाला परमेश्वराला साक्षात्कार हा द्यावाच लागतो. म्हणूनच संत ज्ञानेश्वर, ध्रुवबाळ, भक्त प्रल्हाद, श्रावणबाळ, श्री साईबाबा यांना कोवळ्या वयातच अलौकिक सिद्धी प्राप्त झाली होती.

साईभक्तांनो, ब्रम्हज्ञानाचा तीर गाठण्यासाठी ज्ञानाचा अथांग सागर पोहून जाणे आवश्यक आहे. खगोलशास्त्र, पदार्थविज्ञान, जीवशास्त्र, गणित, रसायनशास्त्र अशा ज्ञानाच्या अनेकविध लाटा ह्या सागरात आहेत. त्यांचे भेदन करून तुम्हाला ब्रह्मज्ञानाचा तीर गाठायचा आहे. ज्ञानेश्वर, ध्रुवबाळ, भक्त प्रल्हाद, श्री साईबाबा यांनी ज्ञानप्राप्तीसाठी केलेली साधना आपण केवळ वाचणार आहोत का? त्याचे आचरण करणार नाही का?... हो! ना! तर मग चला, आत्तापासूनच सुरूवात करू या. शुभस्य शीघ्रम!

# आत्मा जो शिवाचा राम जप

— श्री. शाम जुवळे
जनार्दन भुवन, ९ छबिलदास रोड,
दादर (प.), मुंबई-४०० ०२८

सर्वश्रेष्ठ ज्ञानी संत श्री ज्ञानेश्वर महाराज आपल्या आवडत्या हरिपाठात म्हणतात,

*"रामकृष्ण वाचा, भाव हा जिवाचा*
*आत्मा जो शिवाचा, राम जप"*

स्वानुभवाचे हे अमृततुल्य बोल सर्व मानव जातीच्या कल्याणासाठी हृदयीच्या जिव्हाळ्याने तसेच हार्दिक प्रेमाने काढलेले आहेत. अखिल सृष्टीवर म्हणजेच विधात्याच्या निर्मितीवर एवढे निःस्वार्थी प्रेम करणारा ज्ञानी-संत पृथ्वीतलावर विरळाच होऊन जातो. श्रीकृष्णाच्या परमपवित्र जन्माच्या वेळी ज्यांचा जन्म झाला असा हा ज्ञानी वारस जगाच्या इतिहासात प्रथमच झाला. तसाच प्रभु श्रीरामचंद्राच्या शुभ जन्माच्या वेळी श्रीसमर्थ रामदासांचा जन्म झाला. हे दोन्ही शुभप्रसंग फार बोलके आहेत. असे हे बोलके मौलिक बोल हृदयाची भाषा अवगत असणाऱ्यांनाच ऐकू येतात.

देह आणि आत्मा हे परस्पर विरोधी घटक असूनही त्यांचा देहात्म-संगम अत्यंत हृदयंगम असाच आहे. देह हा नाशवंत तर आत्मा हा अमर आहे. देह दृश्य स्वरूपात अवतरल्यामुळे स्थल, काल, कारण यांच्या मर्यादित त्याला स्वतःला जखडून घ्यावे लागले आहे. आत्मा हा स्वयंभू असल्यामुळे अत्यंत सूक्ष्म, अदृश्य, सर्वव्यापक, अमर्यादीत, नित्य, निर्मल, शाश्वत असा आहे. असा विरोधाभास जरी असला तरी देहाला अध्यात्म साधनेद्वारा आत्मसंगती साधून जीवाचा उद्धार करून देता येतो. ह्या दृष्टीकोनातून श्री ज्ञानेश्वरांच्या वरील अमृतबोलांचे दर्शन घडले असता बुद्धीला साधु-बोध झाल्याविना रहात नाही. असा साधु-बोध झालेली बुद्धी, शुद्धीकरण झाल्यामुळे सद्‌बुद्धी वा साक्षात् प्रतिभा म्हणून शास्त्रात गौरविलेली आहे. अशी ही अलौकीक प्रतिभाच जीवाला नामस्मरणाची गोडी प्राप्त करून देते. या अमृत गोडीमुळेच जीवाला शिवाच्या कल्याणकारी आत्म्याचे अत्यंत दुर्लभ असे दर्शन घडते. सत्यदृष्टीने विचार करता आत्म-दर्शन घडवून आणणे हेच अमोल अशा मानव जन्माचे प्रधान ध्येय असले पाहिजे.

जीवनात हरतऱ्हेचे प्रामाणिक प्रयत्न करून माणसाने जागतिक क्षेत्रात मान-सन्मान, पैसा-अडका जरूर मिळवावा, परंतु हे पक्के लक्षात ठेवावे की जीवनाचे प्रमुख उद्दिष्ट आत्मदर्शन म्हणजेच चित्त-शुद्धीकरण हेच होय.

★★★

# संतवाणी

## संत तुकारामांचे अभंग — शतकांचा प्रभाव

साहित्य निर्मितीच्या मागे काहीतरी प्रयोजन असते, असे साहित्य मीमांसकांचे मत आहे. मम्मटाने सांगितलेल्या, 'काव्यम् यशस्ये अर्थकृते व्यवहारविदे शिवेत रक्षतये सद्यः परनिवृत्तये कांता सम्मित तयोपदेशयुजे' ह्या कारिकेमध्ये साहित्याची बहुस्तरीय प्रयोजने सांगितली आहेत. असे जरी बहुतांशी खरे असले तरी उपरोक्त उल्लेखित कसोट्या संत साहित्याला लावून पहाणे म्हणजे संत साहित्यावर अन्याय करण्यासारखेच होईल. भावनांचा उत्स्फूर्त आविष्कार झाल्याने संत वाङ्मय साकार झाले. ही भावना म्हणजे ईश्वरभक्ती, परमेश्वराची ओढ!

संत तुकारामांच्या अभंगांत नादसाधर्म्य, भावना, प्रमाणबद्ध शब्दरचना या साहित्य घटकांना ईश्वर-चिंतन ह्या तत्वाने संघटित केले आहे, एकजिनसी केले आहे. म्हणजेच ह्या अभंगांत सेंद्रिय एकता (Organic Unity) आहे, म्हणून हे अभंग महान आहेत. अशा प्रकारचे संत वाङ्मयाबाबतचे विवेचन आज साहित्य सौंदर्य मीमांसक करीत असताना दिसतात. प्रज्ञावंतांनाही लाजवील अशी अभंग रचना करताना संत तुकारामांना साहित्य विषयक विविध दृष्टीकोन ज्ञात होते का? याला नाही असेच उत्तर आहे. तर मग पोलंडचा सौंदर्य शास्त्रज्ञ ओस्तोवस्की याने सांगितलेल्या 'शतकांचा प्रभाव' पाडण्याचे सामर्थ्य तुकारामांच्या अभंगांत कसे अवतरले? परमेश्वरी चिंतनात लीन झालेल्या संत तुकारामांना सर्वत्र परमेश्वरच दिसत होता. परमेश्वराच्या लागलेल्या ह्या ध्यासामुळेच आणि परमेश्वरी प्रेरणेमुळेच त्यांच्याकडून शतकांचा प्रभाव टाकणारे महान अभंग रचले गेले. अशा संतांच्या ठिकाणी ही प्रेरणा परमेश्वरी देणगीच असते.

साहित्याचे मूल्य हे रसिकच ठरवित असतो. (Value is valued from people — E.D. Hirch) संत तुकारामांच्या अभंगांनी गेली कित्येक वर्षे मानवी मनाला भारावून टाकले आहे. आजही तुकारामांच्या अभंगांचा प्रभाव उत्तरोत्तर वाढत आहे. याचे मूळ जर शोधू लागलो तर ते भक्तिभावात दिसते. यावरून भक्तिभावात किती सामर्थ्य आहे याचे प्रत्यंतर आपणास येते.

समाजात जेव्हा अस्थिरता निर्माण होते तेव्हा परमेश्वर संतमहंतांच्या रुपाने अवतार घेतो. यामुळेच संतांच्या ठिकाणी अलौकिक सामर्थ्य निर्माण होते. व त्यांच्या मुखातून, लेखणीतून विश्वाला व्यापून राहणारे विचार प्रकट होतात, वर्षानुवर्षे ते मानवाला स्तंभित करतात, आकर्षित करून घेतात. तुकारामांच्या पुढील काही अभंग पंक्ती लक्षात घेतल्या तर चराचरात त्यांना चैतन्यत्वाची जाणीव कशी होत होती हे दाखवून देतात :—

जेथे जातो तेथे तू माझा सांगाती चालविशी हाती धरोनिया

*

वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे पक्षीही सुस्वरे आळविती

# तिळगूळ घ्या, गोड बोला

"तिळगूळ घ्या, गोड बोला" असे तिळगुळाचे लाडू किंवा हलवा एकमेकांना देण्याचा हा संक्रांतीचा सण, पतंग उडवण्याचा हा सण, जावयाचा मान करण्याचा हा सण, हळदीकुंकू-समारंभ करण्याचा हा सण, असे आपण समजतो.

संक्रांतीच्या सणाशी 'गोड बोलण्याची' कल्पना निगडीत आहे; त्याचबरोबर एखाद्यावर 'संक्रांत येणे' म्हणजे काही तरी अनर्थ ओढवणे, अशी भयसूचक कल्पनाही निगडीत आहे, हे कसे काय? तसेच 'संक्रांत' म्हणजे संक्रमण, एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत जाणे. असे कोणते विशेष संक्रमण, ह्या दिवशी घडते, की ज्यासाठी हा दिवस सण म्हणून साजरा करावा? ह्या दिवशी "गोड बोला" असे म्हणताना तिळगूळच का द्यायचा? दुसरा एखादा गोड पदार्थ का देत नाहीत? लोक ह्या दिवशी पतंग का उडवितात? अशा अनेक शंका तुमच्या मनात येत असतील, नाही का?

हिंदू वर्ष बारा महिन्यांत विभागलेले आहे, तसेच ते बारा राशींतही विभागलेले आहे. सूर्य या बारा राशींतून फिरतो. खरे म्हणजे सूर्य फिरत नसतो, पृथ्वी त्याच्या भोवती फिरते. आपणाला मात्र, मोटारीतून जात असताना जशी बाजूची झाडे पळतात असे वाटते, त्याप्रमाणे सूर्य फिरतो असे वाटते. सूर्य एका राशीतून दुसऱ्या राशीत जातो तेव्हा प्रत्येक वेळी **'संक्रमण'** होते, **'संक्रांत'** होते. म्हणजे खरोखरच अशा बारा संक्रांती वर्षात होतात. पण त्यांत दोन संक्रांती महत्त्वाच्या आहेत. आषाढातली **कर्क संक्रांत** आणि पौष महिन्यातली **मकरसंक्रांत**. कर्क राशीत जेव्हा सूर्याचे संक्रमण होते तेव्हा तो जास्तीत जास्त उत्तरेला गेलेला असतो आणि तेथून तो दक्षिणेकडे वळायला त्या दिवसापासून सुरुवात करतो. आणि मकर राशीत जेव्हा त्याचे संक्रमण होते तेव्हा तो जास्तीत जास्त दक्षिणेला गेलेला असतो आणि ह्या दिवसापासून उत्तरेकडे वळायला सुरुवात करतो. ह्या दोन संक्रांतींच्या निमित्ताने हवामानात विशेष स्वरुपाचे बदल होतात.

ह्या दोन संक्रांतीपैकी मकर संक्रांत साजरी करण्याचे मुख्य कारण असे असावे : आमचे पूर्वज आर्य लोक उत्तर ध्रुवावर रहात असत. तेथे ६ महिने दिवस आणि ६ महिने रात्र. मकरसंक्रांतीच्या दिवसापासून सूर्य दक्षिणेकडून उत्तरेकडे वळू लागतो, म्हणजे उत्तर गोलार्धातील दिवस त्या दिवसापासून थोडा थोडा मोठा होऊ लागतो. ६ महिने रात्रीचा काळ आता ह्या दिवसापासून हळूहळू कमी व्हायला लागणार आणि आता सूर्यदर्शन होणार, ह्या कल्पनेने साहाजिकच त्या उत्तर ध्रुवावर राहणाऱ्या आर्यांना आनंद होई व ते सूर्याच्या संक्रमणाचा हा दिवस अत्यानंदाने साजरा करीत. मकरसंक्रांतीचा सण साजरा करण्याची ही प्रथा इतकी जुनी आहे.

आषाढातल्या कर्क संक्रांतीपासून पौषातल्या मकर संक्रांतीपर्यंतच्या काळाला 'दक्षिणायन' म्हणतात आणि मकरसंक्रांत ते कर्कसंक्रांत ह्या काळाला 'उत्तरायण' असे म्हणतात. मकरसंक्रांतीपासून दिवस मोठा होतो, कर्कसंक्रांतीपासून दिवस लहान होतो. मकर संक्रांतीच्या आदल्या दिवसाला 'भोगी' म्हणतात आणि पुढील दिवसाला 'किंक्रांत' म्हणतात.

संकासुर आणि किंकरासुर अशा दोन राक्षसांना देवीने अनुक्रमे संक्रांतीच्या दिवशी

आणि पुढील दिवशी ठार मारले. म्हणून ह्या दिवसांना ही नावे पडली आहेत. ही संक्रांत दरवर्षी निरनिराळ्या वाहनांवर बसून येते अशी समजूत आहे. तसेच तिला ज्या वस्तू आवडतात, किंवा ज्या वस्तूंकडे तिची नजर जाते, त्या वस्तू महाग होतात अशीही समजूत आहे. ह्यावरून एखाद्या वस्तूवर 'संक्रांत येणे' म्हणजे 'ती वस्तू नष्ट किंवा दुर्मिळ होणे' असा अर्थ लावला जातो.

वास्तविक 'संक्रांत' ही काही देवांनी राक्षससंहारासाठी निर्माण केलेली देवी नव्हे. संक्रांतीला देवीचे रुप देणे ही ज्योतिषशास्त्राने केलेली कल्पना आहे. ही देवी दरवर्षी निरनिराळ्या वाहनावरून येते, तिची निरनिराळ्या वस्तूंवर दृष्टी पडते व त्यांचे दुर्भिक्ष्य होते, हे सुद्धा ज्योतिषशास्त्राने मांडलेले निष्कर्ष आहेत. मात्र मकरसंक्रांतीपासून सुरू होणारे उत्तरायण हे शुभ मानण्याची प्रथा प्राचीन कालापासून आहे. ह्या उत्तरायणाला 'देवायन' असेही नाव आहे. ह्या उत्तरायणात आत्मा सूर्यलोकी जाऊन परब्रह्म-परमेश्वराकडे जातो, अशी समजूत आहे.

भीष्म शरपंजरी पडले होते, मरणोन्मुख झाले होते, त्यांनी उत्तरायण सुरू होईपर्यंत प्राण सोडले नाहीत, उत्तरायण सुरू होताच प्राण सोडले असा उल्लेख आहे.

द्रोणाचार्यांची पत्नी कृपी हिला दुर्वास ऋषींनी संक्रांतीचे व्रत सांगितले व तिने ते आचरिले, तेव्हा तिला पुत्र झाला. ह्यावरून संक्रांतिव्रत हे पुत्रप्राप्तीसाठी उपयोगी व्रत आहे असे मानले जाते.

कुंभकोणम येथे हेम ऋषीने तप केले असता शारंगपाणी ह्या देवाने त्याला संक्रांतीच्याच दिवशी दर्शन दिले.

जो मनुष्य उत्तरायणाच्या ह्या (संक्रांतीच्या) दिवशी तिळांसहित धेनूचे दान करतो, त्याच्या सर्व इच्छा पूर्ण होतात.

संक्रांतीच्या दिवशी तिळाचा अर्क लावून तिळयुक्त उदकाने स्नान करावे, ब्राह्मणांना तिलदान द्यावे व शिवमंदिरात तिळाचे दिवे लावावे, असे शिवरहस्यात सांगितले आहे.

जो मनुष्य संक्रांतीच्या दिवशी स्नान करणार नाही, तो सात जन्मांपर्यंत रोगी आणि गरिबीत राहील, असे देवीपुराणात म्हटलेले आहे.

संक्रांतीच्या दिवशी पितरांची पूजा करावी. (तीळ व उदक यांच्या साहाय्याने तर्पण करावे.)

तिळाला आपल्या धर्मकार्यांत फार महत्त्वाचे स्थान आहे. सर्व पितृकार्यांत तिळाला महत्त्व आहे. तिळाला संस्कृतमध्ये 'स्नेह' असाही शब्द आहे. ह्या 'स्नेह' शब्दाचा अर्थ स्निग्धता, प्रेम असा आहे.

लक्ष्मीपूजनाच्या वेळी लक्ष्मीला आवडणारा नैवेद्य म्हणून जसा गुड (गूळ) मिश्रित धने हा पदार्थ सांगितला आहे, तसा ह्या संक्रांतीसाठी गुडमिश्रित तिल असा नैवेद्य सांगितला आहे. म्हणूनच ह्या दिवशी तिळगूळ देऊन, तिळाचा गुणधर्म जो 'स्नेह' (प्रेम, मैत्री) तो मागितला जातो व म्हणूनच "तिळगूळ घ्या, गोड बोला" असे म्हटले जाते.

स्त्रियासुद्धा ह्या दिवशी स्नेहवर्धक असा हळदीकुंकवाचा समारंभ करतात. संक्रांतीपासून रथसप्तमीपर्यंत केव्हाही हे हळदीकुंकू केले तरी चालते. मैत्री टिकविण्यासाठी, स्नेह

वाढविण्यासाठी, एकमेकींच्या अडचणी व दुःखे समजून घेण्यासाठी ह्या हळदीकुंकू-समारंभाचे महत्त्व फारच मोठे आहे. संक्रांतीच्या निमित्ताने सुवासिनी स्त्रिया 'सुगड' (सुघट) देतात. एका मडक्यामध्ये बोरे, भुईमूग, गाजरे, उसाचे तुकडे, वालीच्या शेंगा, सुपारी, काही पैसे वगैरे गोष्टी टाकून व ते मडके झाकण्यासाठी त्यावर दुसरे मडके ठेवून ते सुगड म्हणून दुसऱ्या एखाद्या सुवासिनीला देतात. ही केवळ सद्भाव, स्नेह, आपुलकी दर्शविण्यासाठी करावयाची एक कृती समजावयाची. काही सुवासिनी अशी पाच सुगडे पाच सुवासिनींना देतात. काही स्त्रिया ह्या निमित्ताने काही गरीब स्त्रियांना दान करतात.

संक्रांतीच्या दिवशी तळलेले पक्वान्न खायचे नाही, असा संकेत (धार्मिक आदेश नव्हे) आहे. म्हणूनच त्या दिवशी गुळाच्या पोळ्या, तिळावर साखरेचा पाक चढवून हलवा वगैरे पदार्थ करतात.

संक्रांतीच्या दिवशी पतंग उडविण्याच्या कृतीला धार्मिक आधार असा काही नाही. मात्र फार पूर्वीपासून ही प्रथा चालू आहे. प्राचीन काळातले राजेरजवाडे देखील ह्या दिवशी पतंग उडवीत असत. त्यामुळे पतंग उडविण्याला एक प्रकारचे धार्मिक महत्त्व मिळाल्यासारखे वाटते.

निरनिराळ्या पुराणांत संक्रांतीची निरनिराळी व्रते सांगितलेली आहेत. त्या सर्वांत दान आणि जप ह्या गोष्टींना महत्त्व दिलेले आहे. आज ह्या सणाला लोक धार्मिक महत्त्व फारसे न देता तो एक सांस्कृतिक सणच समजतात आणि तिळगूळ, हळदीकुंकू-समारंभ वगैरेंच्या द्वारा जनसंपर्क साधण्यासाठी त्याचा उपयोग करतात.

## ऑल इंडिया साई समाजाचे यंदाचे अधिवेशन

ऑल इंडिया साई समाज, मैलापूर, मद्रास या प.पू. नरसिंह स्वामीजींनी स्थापन केलेल्या व प.पू. राधाकृष्ण स्वामीजींनी अध्यक्षपद सांभाळून मार्गदर्शन केलेल्या जगप्रसिद्ध संस्थेतर्फे २३ वे श्रीसाई भक्तांचे अधिवेशन यंदा मद्रास येथे संस्थेच्याच भव्य वास्तूत २९.१.१९८७ ते १.२.१९८७ असे चार दिवस भरविण्यात येत आहे. या चार दिवसापैकी एक दिवस श्रीसाईभक्त भारतीय लेखक कवींचाही एक भव्य मेळावा भरविण्यात येत आहे. या भव्य अधिवेशन व लेखक कवी संमेलनाला जोडूनच संस्थानच्या मद्रास-मैलापूर येथील मंदिरात श्रीसाईबाबांची मूर्ती प्रतिष्ठापित करण्याचा व सोहळा समारंभाची पण आयोजना करण्यात आली असून देशातील परदेशातील अनेक ज्येष्ठ-श्रेष्ठ साईभक्त मंडळी या संपूर्ण पाच दिवसांच्या कार्यक्रमास हजर रहाणार आहेत. तरी समस्त साई भक्तांनी या संपूर्ण समारंभास अगत्याने यावे अशी आग्रहाची विनंती संस्थेचे अध्यक्ष श्री.टी. केशवराव व मानद चिटणीस श्री. मुथ्थू वेंकटरामन हे करतात. साईभक्तांनी आता त्वरीत संपर्क व्यवस्थापक श्री ऑल इंडिया साई समाज, मैलापूर, मद्रास ६०० ००४ येथे साधावा.

# ग्रंथ परिचय

## 'मानवी समस्या आणि हिंदु तत्त्वज्ञान'

श्री. शंबुक लिखित व श्री. द. सी. परांजपे प्रकाशित 'मानवी समस्या आणि हिंदुतत्वज्ञान' हा ग्रंथ नुकताच प्रसिद्ध झाला असून या पुस्तकाचा बहिरंग जसा नयन मनोहर आहे तसेच या पुस्तकाचे बहिरंग व अंतरंग दोन्हीही बुद्धिला प्रेरणा व मनोविश्लेषण करण्यास प्रवृत्त करतात. मानवी जीवनाच्या प्रत्येक अंगाचा ज्या तत्त्वज्ञानात सूक्ष्म व सखोल विचार केलेला आहे ते हिंदु तत्वज्ञान सर्वश्रेष्ठ कसे हे पटवून देण्यासाठी अन्य तत्त्वज्ञानांतील विचारही लेखकाने प्रस्तुत पुस्तकात समाविष्ट केले आहेत.

आर्थिक समस्या, सामाजिक समस्या, कामगार समस्या, शैक्षणिक समस्या, गुन्हेगार समस्या, वैज्ञानिक समस्या, विद्यार्थ्यांमधील बेशिस्त व अभ्यासातील अनास्था, मालक वर्गातील प्रचंड नफेखोरी, कामगारांचे शोषण व उलट कामगारांचाही कामातील बेशिस्तपणा, स्त्रियांचे शोषण व त्यांचाही बेजबाबदारपणा, समाजातील गुन्हेगारी व क्रौर्य, बेबंदशाही, अण्वस्त्र युद्धाची व संपूर्ण विध्वंसनाची भीती, एकमेकांविरूद्ध द्वेष भावना अशा अनेकविध जटील समस्या मानवाला आज भेडसावित आहेत. या बहुविध समस्यांचे निराकरण करण्याचे सामर्थ्य केवळ हिंदुतत्त्वज्ञानात आहे, हे सूत्र लेखकाने संपूर्ण पुस्तकभर खेळविले आहे. त्यासाठी त्याने अनेक उदाहरणे व दाखले दिले आहेत.

सर्वसाधारण दोन वेळा भरपूर व चांगले अन्न, अंगभर वस्त्रे, चांगलासा निवारा, समजूतदार कुटुंब व या सर्व गोष्टींची आयुष्याची शाश्वती. किमान एवढ्या गोष्टी तरी सुखी आयुष्यासाठी हव्यातच, मग अन्य मनोरंजन वगैरे गोष्टी आणखी वेगळ्या. अशी सर्वसामान्य समजूत आहे. परंतु एवढं करून सुद्धा समाधान होईल किंवा नाही याची शाश्वती आहे का? असा प्रश्न उपस्थित करून लेखकाने मानवी समाधानाचा उलगडा करताना, मानवाचे ईश्वरीकरण होणे हे मानवी जीवनाचे अंतिम ध्येय आहे, तेच खरे समाधान आहे. हिंदु तत्वज्ञानाने हे अंतिम ध्येय उदात्त ठेवले आहे, असे लेखकाने प्रतिपादिले आहे.

व्यक्तिगत अहंकार, सामाजिक अहंकार, चुकीचा ध्येयवाद व चुकीच्या मार्गाने मार्गक्रमण अशी नानाविध कारणे मानवी समस्यांच्या मूळाशी आहेत. ही कारणेच नष्ट केली म्हणजे मानवी समस्या उद्‌भवणारच नाहीत. ही कारणे मानवाने नष्ट कशी करायची ह्याचे विश्लेषण प्राचीन काळापासून चालत आलेल्या व आधुनिक युगात शिल्लक असलेल्या हिंदु तत्त्वज्ञानात आहे. याचा जर सूज्ञांनी विचार केला व त्याचा तळागाळापर्यंत प्रसार, प्रचार केला तर मानवाची चाललेली अधोगती, मानवी संहार, दंभाचार इत्यादी मानवी जीवनास दुःखी करणाऱ्या गोष्टींचा निःपात होण्यास फार काळ लागणार नाही. म्हणून प्रत्येक मानवाने हिंदु तत्त्वज्ञानाप्रमाणे आचरण करावयास हवे. असे बोधामृत लेखकाने सदर पुस्तकाद्वारे वाचकांस दिले आहे.

हिंदु तत्त्वज्ञान वगळता अन्य तत्त्वज्ञाने प्रतिक्रियात्मक वा काही वैयक्तिक प्रतिष्ठा राखण्यासाठी निर्माण झालेली आहेत. व्यक्तीनुसार, समाजानुसार वा कालमानानुसार निर्माण होणाऱ्या समस्या यांचा विचार होणे वा त्या सोडवण्याचा प्रयत्न होणे हे या तत्त्वज्ञानांना केवळ अशक्य आहे. असे ठाम मत लेखकाने प्रतिपादिले आहे. यात तथ्य आहे असे जाणवते कारण लेखकाचा हिंदु तत्त्वज्ञानाबरोबरच इतर तत्त्वज्ञानांचाही अभ्यास गाढा असल्याचे पदोपदी आढळते. लेखकाचे विवेचन हे तौलनिक दृष्टीने असल्याने त्यांना अन्य तत्त्वज्ञानांचा विचार करणे अपरिहार्य होते. म्हणूनच ते हिंदु तत्त्वज्ञानाची महती या पुस्तकाद्वारे पटवू शकते.

**स्वतः ईश्वर रूपात विलीन होणे, ईश्वरच होणे, असत्‌कडून सत्‌कडे, अंधाराकडून प्रकाशाकडे, सुख दुःखाकडून अक्षय्य सुखाकडे, सगुणाकडून निर्गुणाकडे, सांताकडून अनंताकडे अशी ही मानवी जीवनाची वाटचाल असते.** ही वाटचाल एका जन्मात संपत नाही तर असे अनेक जन्म घ्यावे लागतात, मुक्त व्हावयास पुनर्जन्म व पर्वजन्म हे हिंदुतत्वज्ञानाचे फार अभूतपूर्व असे वैशिष्टय आहे. हिंदु तत्त्वज्ञानाने हे उद्दिष्ट जगासमोर ठेवले आहे. यातच हिंदु तत्त्वज्ञानाची व्यापकता दिसून येते. **या हिंदु तत्त्वज्ञानाचे प्रमुख वैशिष्टय म्हणजे ह्या तत्त्वज्ञानात काळानुसार, परिस्थितीनुसार आवश्यकतेनुसार बदल होत गेला.** अमुक एक व्यक्ती वा अमुक एक ग्रंथ या तत्त्वज्ञानाच्या मूळाशी नाही. मानवी मनात जितक्या प्रकारचे विचारतरंग उमटू शकतील त्या सर्व विचारतरंगांचा विचार साधकबाधक पद्धतीने करण्यात आलेला आहे. जगातील आजच्या तत्त्वज्ञानाचेच काय पण भावी काळात निर्माण होणाऱ्या अनेक तत्त्वज्ञानांचे मूळ सुद्धा हिंदु तत्त्वज्ञानात सापडू शकते इतका विशाल व सर्वंकष विचार या तत्त्वज्ञानाचा कालानुरूप झालेला आहे.

**एखाद्या उचित मार्गावर श्रद्धा ठेवून जर एखादा मार्गक्रमण करीत असेल तर तो अंतिम उद्दिष्ट गाठू शकेल, फक्त त्याने इतरांचा द्वेष करता कामा नये.** जो इतरांचा द्वेष करतो, इतरांचे अस्तित्व नाकारतो, तो अधर्म व जे असे करावयास सांगते ते तत्त्वज्ञान नष्ट केले पाहिजे असे हिंदु तत्त्वज्ञान सांगते. हा हिंदु तत्त्वज्ञानातील विचार लेखकाने सोप्या सुबोध शब्दांत उद्‌धृत केला आहे.

हिंदु या शब्दाची संकल्पना सुस्पष्ट करताना, लेखक लिहितो, **हिंदु तत्त्वज्ञानाची परिभाषा ही मानवी जीवनाची परिभाषा आहे** हे निखळ सत्य वाचकांनी अगदी मनावर ठसवून घ्यावे. वस्तुतः 'हिंदु' या शब्दाचा अर्थ जो स्वतःस हिंदु म्हणवून घेतो वा जो जन्मतः हिंदु असतो तो नव्हे तर हिंदु तत्त्वज्ञान जो आपल्या आयुष्यात आणून स्वतःचे जीवन उच्च स्तरांवर नेतो व ज्याची वाटचाल अंतिम उद्दिष्टाच्या दृष्टीने चालू आहे तो हिंदु.

**हिंदु तत्त्वज्ञान हे मानवाच्या उन्नतीचे, उत्क्रांतीचे तत्त्वज्ञान असल्याने ते मानवी तत्त्वज्ञान आहे.** म्हणूनच जगातील अनेकांचे लक्ष हिंदु तत्त्वज्ञानाकडे वळले आहे. आज जर्मन, रशियन, अमेरिकन विद्यापिठांत हिंदु तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी पीठे निर्माण झाली आहेत.

हिंदु तत्त्वज्ञान हे जगाच्या कल्याणासाठी कसे उपयुक्त आहे हे पटवून देताना लेखकाने, विचारवंत, शासनकर्ते, शास्त्रज्ञ इत्यादी समाजातील जबाबदार व्यक्तिंनी हिंदु तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला तर मानवी समस्या ते समर्थपणे हाताळू शकतील असे सुचविले आहे.

अन्न, वस्त्र, निवारा ह्या गोष्टी माणसाचे मन व बुद्धि यांसाठी पुरेश्या नाहीत, तर शाश्वत सुखासाठी मन धडपडत असते. हा विचार फक्त हिंदु तत्त्वज्ञानाने मांडला आहे. म्हणून कितीही भौतिक सुखे माणसाने उपभोगली तरी ती आध्यात्मिक दृष्टीने कुंठीतच राहतात. त्याचे मन उन्नत व्हायला पाहिजे. शाश्वत सुख त्याला मिळाले पाहिजे. या दृष्टीकोनातून निरीक्षण केल्यास, भौतिक-आध्यात्मिक विचारांच्या मंथनात आध्यात्मिक विचार हेच महत्वपूर्ण ठरतात. त्याचेच प्रतिपादन हिंदू तत्त्वज्ञानात केलेले आहे. आपण ईश्वर बनण्याचा प्रयत्न करायला ते शिकवते. ज्या परमात्म्याचे आपण अंश आहोत त्यापर्यंत पोहचण्याची धडपड विचारवंत मानव करीत असतो. येथे **श्रद्धा** हीच श्रेष्ठ ठरते. व हेच तत्व हिंदु तत्त्वज्ञान सांगते. यासाठी असलेला मनोनिग्रह होण्यासाठी योग, साधना इत्यादी मार्ग पतंजली सारख्या ऋषींनी सांगितले आहेत. साध्य-त्याज्य, व्यवहार्य-अव्यवहार्य, शाश्वत-अशाश्वत यांची चर्चा हिंदु तत्त्वज्ञानात केलेली आहे.

**हिंदु तत्त्वज्ञानाने कोणत्याही मानवाला कमी लेखलेले नाही.** कुटुंब व्यवस्थेपासून शासन व्यवस्थेपर्यंत आश्रम व्यवस्था, वर्णव्यवस्था ह्यांद्वारे कार्याची वाटणी योग्य पद्धतीने करून ह्या तत्त्वज्ञानाने समतोल साधला आहे.

संस्कारात्मक सण आणि व्रते, महिलांविषयी दृष्टीकोन, आरोग्य-आयुर्वेद, भक्ती, पुनर्जन्म, कर्मफल चिकित्सा, संस्कारांचे महत्त्व, सोऽहं, चिंतनिका ही पुस्तकातील अखेरची प्रकरणे लेखकाच्या समर्थ लेखणीतून उत्कृष्ट उतरली आहेत. ह्या शेवटच्या प्रकरणांनी ह्या पुस्तकाला पूर्णाकार प्राप्त करून दिला आहे. यातच ह्या प्रकरणांतील विचारांचे गमक सामावलेले आहे.

ॐकार हा कुंडलिनी व खड्ग या दोन्हींनी युक्त असा या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर दाखविला आहे व या छायाचित्रातूनच लेखकाचे मनोगत व्यक्त होते. 'खड्गशक्तीविना आध्यात्मिक शक्ती ही नपुसक ठरेल तर आध्यात्मिक शक्तिविना खड्गशक्ती ही क्रूर व विध्वंसक ठरेल' ही लेखकाची छायाचित्रामागची आशयपूर्ण कल्पना संपूर्ण हिंदु तत्त्वज्ञान आपल्या नजरेसमोर उभे करते. एवढा अर्थगर्भ आशय ह्या छायाचित्रात सामावलेला आहे.

हे पुस्तक वाचल्यानंतर वाचकाला योग्य दिशेने विचार करण्याची विशाल दृष्टी लाभेल यात शंकाच नाही. कारण तेवढे सामर्थ्य हिंदु तत्त्वज्ञानात आहे, तेवढेच कर्तृत्व हिंदु तत्त्वज्ञानाचे श्रेष्ठत्व पटवून देणाऱ्या ह्या 'मानवी समस्या आणि हिंदु तत्त्वज्ञान' ह्या पुस्तकात आहे.

संकेत, लालबाग

* पुस्तकाचे नाव - मानवी समस्या आणि हिंदुतत्त्वज्ञान
* पृष्ठे ३४४, मूल्य रु. ७५/-
* राजहंस प्रकाशन, नागनाथाचे पाराजवळ, सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०.

# अन् बाबांच्या व्यापकत्वाची खूण पटली

— डॉ. अनिल एन. मोरे
"साईधाम", मु. धनसार (अल्याळी आंबेवाडी),
ता.पो. पालघर, जि.ठाणे - ४०१ ४०४.

शिरडीत बाबा हयात असताना बरेच भक्त दर्शनासाठी येत. काही मोठ्या श्रद्धेने तर कुणी आपल्या मित्रांबरोबर मित्रांनी नेले म्हणून शिर्डीत यायचे. मी माझ्या इष्टदेवताशिवाय कुणा संतापुढे लोटांगण घालीत नाही, तर साईबाबांसारख्या यवनाला मी नमस्कार करणार नाही, अशा कित्येक लोकांना बाबांनी आपल्या इष्टदेवतेच्या, गुरुच्या रुपात दर्शन दिले, त्यांना आपलं बनवलं, *अन् बाबांच्या व्यापकत्वाची खूण पटली.* १) ह.भ.प. दासगणूंस बाबांनी द्वारकामाईत श्री पांडुरंगाचे दर्शन दिले.

२) बापूसाहेब जोगांच्या हट्टापायी दुपारच्या आरती नंतर बाबांनी त्यांना अक्कलकोट स्वामींच्या रुपात दर्शन दिले.

३) एकदा प्रयागतीर्थी स्नान करावं असा विचार दासगणूंच्या मनात आला म्हणून बाबांची आज्ञा घेण्यास दासगणू बाबांकडे आले तेव्हा बाबा त्यांना म्हणाले, "अरे हेच आपलं प्रयागतीर्थ आहे व त्यासाठी दूर जायची आवश्यकता नाही". आणि काय नवल! बाबांच्या चरणी "उभयांगुष्टी उदक निथळले अन् गंगायमुनोदक पाझरले" (श्री.साईसत्.अ.४/१०२-१०४)

४) १९१० साली परमानंद हे भाजलेल्या हाताच्या उपचारार्थ आले आणि त्यांना श्री साईंच्या दर्शनाचा लाभ झाला.

५) मुळे शास्त्रीस दुपारच्या आरती नंतर मशिदीत घोलप गुरुंचे दर्शन दिले. (श्री. साईसत्.अ.१२/१२८-१२९) आणि मुळ्यांनी श्री साईच्या चरणी मिठी मारली. (श्री. साईसत्.अ.१२/२३६)

६) एक मामलतदार आपल्या डॉक्टर मित्राला, जो रामभक्त होता त्याला शिर्डीत घेऊन आले. आपण श्री साईंना नमस्कार करणार नाही अशी त्यांची अट होती. कारण बाबा मुसलमान होते असा त्यांचा समज होता. आणि मुसलमानाच्या पायी नमन करण्यास हे मन तयार नाही असं डॉक्टरांनी आपल्या मामलतदार मित्रास सांगितले होते. परंतु हे दोघेही जेव्हा मशिदीत गेले तेव्हा डॉक्टरांनीच प्रथमतः लोटांगण घातले. ह्याबाबत त्यांना विचारले असता, "रामरुप म्या देखिले श्यामला" असे ते वदते झाले. (श्री.साईसत्.अ.१२/१६०) ह्या पद्धतीने बाबांनी डॉक्टरांना रामरुपात दर्शन दिले.

७) मोठ्या स्वार्थी भावनेने आलेल्या मद्रासी पुरुषाच्या बायकोची साईपदी भक्ती होती म्हणूनच बाबांनी मध्यानाची आरती चालू असताना तिला रामरुपात दर्शन दिले. (श्री.साईसत्.अ.२९/३५-३६) ह्याच बाईचा पती लोभी होता. तो विचार करु लागला की, साईबाबा आम्हा सर्वांस बाबांच्या रुपात दिसतात आणि हिलाच कसे रामस्वरुपात दिसतात, परंतु ही साईंची कृपा होती. पूर्वी ही रामदर्शन नेहमी घेत असे.

रामदर्शन हिला सुखकारी होते. परंतु द्रव्यलोभामुळे रामदर्शनाचा अभाव होऊ लागला आहे. हे बाबांना अवगत होते म्हणूनच तिला त्यांनी रामस्वरुपात दर्शन दिले.

८) उपरोक्त बाईच्या ( मद्रासीण ) पतीस भयंकर स्वप्न पडले व ह्या स्वप्नात बाबांनीच त्यास वाचवले व श्री समर्थ रामदासांच्या स्वरुपात दर्शन दिले. (श्री. साईसत् अ. २९/७६).

९) बाळकराम मानकरास बाबांनी मच्छिंदरगडावर तपासाठी पाठवले व मानकर तप करण्यास मग्न असताना प्रत्यक्ष गडावर बाबांनी त्यांना दर्शन दिले. (श्री साईसत् ३१/९२ — ९३) नुसते दर्शनच दिले नाही तर काहीवेळ बाबांनी त्यांच्याशी बातचीतही केली. (श्री साईसत् ३१/९४ — ९७).

१०) पुढे हेच मानकर मच्छिंदरगड सोडून पुण्यास दादरचे तिकिट घेण्यास आले. (कारण ह्यांना वांद्रयास यावयाचे होते) तर कटिप्रदेशी लंगोटी आणि खांद्यावर कांबळी असा वेश परिधान करुन एक कुणबी आला आणि त्यांनी बालकरामांना कुठे जाता असे विचारले. मी दादरला चाललोय असे बाळकरामांनी सांगितल्यावर त्या कुणब्यांनी तिकिट विनामुल्य बाळकराम मानकरांस दिले, अन् हा कुणबी गर्दीत दिसेनासा झाला. तिकिट मिळणे मुष्किल असतानाही फुकटात तिकिट देणारा हा कुणबी म्हणजे ' श्रीसाईच ' होते.

११) बाबा एक दिवसाआड चावडीत झोपत. मशिदीतून पालखीद्वारे मिरवणूकीने बाबा चावडीत जात असताना सपटणेकरांना बाबा पांडूरंगाच्या रुपात दिसले. (श्री. साईसत् चरित्र अध्याय — ४८/१५९)

◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆

# साई माझी माऊली

साई तू दयेचा अथांग सागर
घाली मायेची पाखर भक्तांवरी ॥ धृ. ॥

करा मनाने चिंतन
ठेवूनी श्रद्धा आणि सबूरी
मग येईल प्रचिती तुम्हालागी ॥ १ ॥

साई एकाच वेळी
हजारोंच्या हाकेला धावशी
तू आहे कोठे कोठे
मज प्रश्न पडे ॥ २ ॥

साई माझा प्रिय सखा
साई माझा पाठीराखा
साई माझा मोक्षदाता
मनी नित्य हेची जागा ॥ ३ ॥

साई एकदा तरी देरे मला तू दर्शन
आस मनी हिच रोज करीतसे ॥ ४ ॥

**— सौ. उमा वाळिंबे**
कृतार्थ ३/४,
पुणे-सातारा रोड,
पुणे - ३७.

# साईनाथांनी मृत्यूच्या दारातून वडिलांना परत आणले

— सौ. संगीता गोडबोले
(एम्.ए.,बी.एड्.)
परिमल, प्लॉट नंबर ३७२, सेक्टर २८,
प्राधिकरण, पुणे-३५.

सन १९७१ सालामधील गोष्ट आहे. अजूनही आठवण झाली तरी साईंच्या लीलेने मन ओथंबून येते. माझे वडील श्री. जी.के. नाडगीर यांच्या कमरेच्या मणक्याचे हाड सरकले होते. डॉक्टरांनी ऑपरेशन करायला सांगितले. त्याप्रमाणे पुण्याच्या ससून हॉस्पिटलमध्ये त्यांना ठेवण्यात आले. त्यावेळी वडील रस्टन कंपनीमध्ये कामाला असल्याने इ.एस्.आय्.च्या स्कीमप्रमाणे फॉर्म वगैरे भरून ऑपरेशनपूर्वी २ दिवस त्यांना ॲडमिट करण्यात आले होते. पण अचानक ऑपरेशनपूर्वी त्यांना हृदयविकाराचा झटका (हार्ट ॲटॅक) आला. अशावेळी ऑपरेशन बाजूलाच राहिले. लगेच त्यांना इमर्जन्सी वॉर्डमध्ये हलविण्यात आले. ऑक्सिजनवर ठेवण्यापर्यंत वेळ आली. आम्हाला काहीच सुचेनासे झाले.

अशावेळी संध्याकाळी तपासणीस राऊंडला आलेले डॉक्टर दुसऱ्या एका डॉक्टरांना सांगत होते, "हा पेशंट फक्त २४ तासांचा सोबती आहे." अर्थात ते हे इंग्रजीतून बोलले. माझ्या आईची व माझी त्यावेळी मनाची काय परिस्थिती झाली असेल हे लिहिणे अशक्य आहे. जवळ कोणीही नातेवाईक नव्हते. व मीही त्यांची एकुलती एकच मुलगी. आम्ही फक्त साईनाथांचा धावा सुरू केला.

माझ्या वडिलांनी डॉक्टरांचे '२४ तासांचा सोबती' हे वाक्य ऐकताच मला येथून दवाखान्यातून घेऊन चला असा ओरडा सुरू केला. 'माझा मृत्यू आलाच असेल तर मी साईनाथांच्या फोटोशी मरेन, येथे दवाखान्यात मरणार नाही' असे ते म्हणू लागले. डॉक्टरांची राऊंड झाल्याने ते परत गेले होते. नर्स वगैरे अशा परिस्थितीत डिसचार्ज द्यायला तयार नव्हत्या. आई खूपच घाबरलेली व त्यावेळी मी तशी अनुभवाने लहानच असल्याने मला कोणताच निर्णय घेता येईना. डिसचार्ज न घेता घरी आल्यास इ.एस्.आय्.च्या स्कीमप्रमाणे असणारा अर्धा पगार मिळणार नव्हता. घरात ते एकटेच मिळविणारे होते. घरी नेले नाही तर '२४ तासांचा सोबती' असे डॉक्टरांनी सांगितल्याने वडिलांची शेवटची साईंच्या चरणी मृत्यू यावा ही इच्छा पूर्ण होणार नव्हती. नर्स डिसचार्ज द्यायला तयार नव्हत्या. मी व आईने फक्त साईमाऊलींवर सारा भार टाकला. साईंची उदी मोठ्या श्रद्धेने लावली.

आईने वडिलांना फक्त एक रात्र दवाखान्यात काढा. सकाळी डॉक्टरांकडून डिसचार्ज घेऊ असे सांगितले. पण कुणाचेही न ऐकता ते दवाखान्यातून निघून रात्री १० वाजता घरी आले. थोडक्यात ते दवाखान्यातून पळून आले. घरी आल्यावर वडिलांनी साईंच्या फोटोचे दर्शन घेतले व श्रद्धेने ऊदी लावली. त्या दिवशीची काळरात्र फक्त साईंचा करुण धावा अश्रुपूर्ण नयनांनी करण्यात गेली.

दुसऱ्या दिवशी सकाळी आमचे फॅमिली डॉक्टर बिनीवाले यांना आम्ही घरी बोलावले. पण त्यांनी साफ नकार दिला. कारण ससून हॉस्पिटलमधून डिसचार्ज न घेता आलेल्या अशा केसची जबाबदारी स्वीकारण्यास ते तयार नव्हते. त्यांच्या दृष्टीने त्यांचेही बरोबर होते. पण ही गोष्ट वडिलांना सांगितली तर त्यांच्या मनावर अजून मोठा आघात झाला असता. आम्ही बाबांचे नाव घेऊन फक्त ॲनासिनच्या २ गोळ्या वडिलांना डॉक्टरांनी दिल्या आहेत असे सांगून दिल्या व डॉक्टर थोड्याच वेळात येतील असे सांगितले.

मी व आईने फक्त बाबांचा मनोभावे धावा सुरू केला. वडिलांची साईंबद्दलची श्रद्धा प्रखर होती. मृत्यू आला तरी साईंच्या फोटोजवळ यावा ही इच्छा. पण आम्हाला आमचे वडील हवे होते. साईंविना कोणताच आधार नव्हता. संकटकाळी साई हे कोणत्या ना कोणत्या रुपाने भक्तांसाठी धावून येतात हेच खरे. आमच्या ओळखीपैकी एका व्यक्तीने एका होमिओपथीच्या डॉक्टरांना वडिलांच्या समजुतीसाठी आणले. अर्थात् खऱ्या अर्थाने आमचे डॉक्टर श्री. साईनाथच होते, ज्यांनी माझ्या वडिलांना मृत्यूच्या दाढेतून बाहेर ओढून काढले.

दोन दिवसांनी वडिलांची तब्येत थोडीशी सुधारली. साईनाथांनी आमच्या करुण व आर्द्र हाकेला साद घातली. आजपर्यंत वडिलांच्या मणक्याचे ऑपरेशन केलेले नाही. पण त्यावेळी डिसचार्ज न घेता आल्याने इ.एस्.आय्.च्या स्कीमप्रमाणे अर्धापगार मिळाला नाही व नोकरीसुद्धा खूप बिनपगारी रजा झाल्याने जायची वेळ आली होती. पण साईंच्यावर ज्यांची दृढ श्रद्धा आहे, त्यांच्यावर कितीही संकटे आली तरी त्यांना तोंड देण्याचे मानसिक धैर्य भक्तांपाशी येतेच व त्या संकटातून आपल्या भक्ताला साईनाथ सहीसलामत सोडवतात.

पुढे साईंच्या कृपेने नोकरीवर वडिलांना घेण्यात आले. अर्धा पगार मिळाला नाही. पण ''मृत्यू यायचाच असेल तर तो साईंच्या चरणापाशीच यावा'' अशी इच्छा बाळगणाऱ्या साईभक्ताला जीवन व नोकरी या दोन्ही गोष्टी साईंच्या कृपेनेच मिळाल्या. एवढेच नाही तर आज रिटायर्ड झाल्यानंतर माझ्या वडिलांनी साईंच्या कृपेने व त्यांच्याच प्रेरणेने साईनाथांची मूर्ती आपल्या बंगल्यातील डायनिंग हॉलमध्ये ठेवली आहे. ●

## श्रीसाईलीलाच्या सभासदांस निवेदन

श्री साईलीला मासिकाचे नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्या व वर्गणी संपलेल्या जुन्या सभासदांनी आपली वर्गणी श्री साईबाबा संस्थान, मुंबई कार्यालय, साईनिकेतन, ८०४ बी, खोदादाद सर्कल जवळ, दादर, मुंबई - ४०० ०१४. येथे प्रत्यक्ष/मनिऑर्डर द्वारे भरावी. चेक पाठवायचा झाल्यास तो 'श्री साईबाबा संस्थान शिरडी' या नावावर असावा, कोणत्या कारणासाठी मनिऑर्डर करीत आहात त्याचा खुलासा मनिऑर्डरवर करावा, मनिऑर्डरवर जेथे 'संदेश के लिए स्थान आणि भेजनेवाले का नाम व पूरा पत्ता' असे नमूद केलेले असते त्या दोन्ही ठिकाणी सभासदांनी आपले नाव व पूर्ण पत्ता लिहिणे आवश्यक आहे.

# मुलाचा पाय बरा झाला

— श्री. शाम वि. जावळकर
७५३, गुरुवार पेठ,
गोरावडे वाडा, पुणे - २.

२० मे १९८५ ची गोष्ट. आमच्या वाड्यातील माझ्या मित्राचे लग्न वाईला असल्यामुळे वाड्यातील आम्ही सर्वजण वाईला गेलो होतो. घरामध्ये फक्त माझी आई व माझी दोन लहान मुले चंद्रशेखर, वय वर्षे ५ व मुलगी शितल, वय वर्षे २ घरामध्येच होती. दुपारचे तीन किंवा चार वाजले असतील. आमच्या घरासमोर कुल्फीची एक गाडी आली होती. तीन-चार लहान मुले त्या कुल्फीवाल्याला पैसे देवून कुल्फी घेत होती. ते पाहून चंद्रशेखर त्याच्या आजीकडून पैसे घेऊन कुल्फी आणण्यासाठी घराबाहेर पडला. इकडे तिकडे न पाहता तो सरळ रस्त्यावर धावत गेला. तेवढ्यात एका सायकलस्वाराची धडक त्याला लागली व तो रस्त्यावर आडवा पडला, त्याच्या पायावरून सायकलचे चाक गेले होते. आमच्या आळीतील इतर लोकांनी उचलून त्याला जवळच असलेल्या दवाखान्यात नेले. तेथे त्याच्या पायाचा फोटो काढला असता त्याच्या पायाच्या हाडाचे दोन तुकडे झाले होते. त्याच्या पायाचा फोटो पाहून आम्हा सर्वांना धक्काच बसला. कारण त्याचा पाय आता परत चांगला होणार नव्हता. आमच्या घरातील सर्वजण सारखे रडू लागले. कारण माझ्या थोरल्या दोन भावांच्या मुलांचे पायसुद्धा अधूच होते. आणि माझ्या मुलाचा पाय अधूच होणार हे आता सिद्ध झाले होते. माझा हा एकुलता एक मुलगा होता कारण मी दोन मुलांवर ऑपरेशन केले होते. त्यामुळे घरातील सर्वांना दुःख झाले होते. आम्हाला हा सर्व दैवी प्रकार वाटला. कारण आम्हा तिन्ही भावांच्या मुलांचे पाय अधू झाले होते. परंतु आमच्या हातात काही नव्हते. डॉक्टरांनी आम्हाला सांगितले की, ह्याचा पाय संपूर्ण बरा होणार नाही. आता माझ्यापुढे एकच मार्ग होता आणि तो म्हणजे देवाची प्रार्थना करणे.

मी तडक श्री साईबाबांच्या मंदीरात गेलो. बाबांना प्रार्थना केली की, माझ्या मुलाचा पाय बरा होऊ द्या. मी माझ्या कुटुंबासमवेत आपल्या दर्शनासाठी शिर्डीला येईन.

माझ्या मुलाचा पाय प्लॅस्टरमध्ये होता. डॉक्टरांनी सांगितले होते की, एक वर्षभर त्याला पाय जमिनीवर टेकू देवू नका. परंतु आमचा मुलगा खूप हट्टी, तो काही कुणाचे ऐकेना. आम्ही कोणी घरी नसलो की, तो वाड्यात खेळावयास जायचा. तीन महिन्यानंतर त्याच्या पायाचे प्लॅस्टर काढले व परत फोटो काढला तर काय चमत्कार! त्याचा पाय होता तसा पूर्ववत् झाला. डॉक्टरांना तर संशय आला की, आपण त्याच्या दुसऱ्या पायाचा तर फोटो नाही ना काढला. डॉक्टरांनी परत त्याच्या पायाचा फोटो काढला व मगच त्यांची खात्री पटली अन् डॉक्टर उद्गारले, हा तर देवाचा चमत्कार!

त्याचक्षणी मला बाबांची आठवण झाली व मी बोलल्याप्रमाणे माझ्या मुलाच्या वाढदिवसाच्या दिवशी बाबांच्या दर्शनासाठी आम्ही शिर्डीस गेलो. त्याचवेळेस मी एक संकल्प सोडला की, दरवर्षी माझ्या मुलाच्या वाढदिवसाच्या दिवशी बाबांच्या दर्शनासाठी शिर्डीस येईन.

# श्री साईनाथ कृपाळू

— श्री. बी.सी. पाटील
आर.बी. २/३३ अे, १५ बंगला, भुसावळ.

मी सन १९६४ ला प्रथम शिरडी येथे गेलो. तेव्हापासून ते चालू वर्षापर्यंत दरवर्षी किमान एकदा तरी शिरडी येथे जात आहे. जसे जसे मला लहान मोठे अनुभव आले, तस-तशी माझी बाबांवरील भक्ती व श्रद्धा वाढतच गेली.

असाच मी १९८२ मध्ये सहकुटुंब (पत्नी व दोन मुले) शिर्डी येथे गेलो तेव्हा माझ्या नंबर दोनच्या मुलाची प्रकृती खूपच खालावलेली होती. ती शिर्डीला अधिकच बिघडली. ती एवढी की, आता मुलगा हातचा जातो असे वाटले. बाबांजवळ प्रार्थना केली की, बाबा आता आम्ही काय करायचे ते आम्हाला काहीच सुचत नाही. आम्हाला दोनच मुले व त्यातल्या त्यात सौ.चे कुटुंब नियोजनाची बिनटाक्याची शस्त्रक्रिया झालेली. तेव्हा जे काय करावयाचे ते तुम्हीच करा बाबा. दुपारच्या आरतीनंतर आम्हाला कोणीतरी सांगितले की, येथे जवळच एक न्हाव्याचे दुकान आहे, त्याला नेऊन दाखवा. त्याला मुलाची प्रकृति दाखविली. त्याने सांगितले की, दर अमावास्येला दहीभात आणि नारळ वाहत्या नदीत सोडावयाचे. आम्ही घरी परतलो व दुसऱ्याच दिवशी अमावास्येला तो प्रयोग केला. तेव्हा मुलाच्या प्रकृतीत बरीच सुधारणा झाली. असे आम्ही तीन महिने केले. तस-तशी त्याची प्रकृती अगदी ठणठणीत बरी झाली. आम्हाला तो न्हावी साईरूपानेच भेटला असे वाटते. विशेष आश्चर्याची बाब म्हणजे सौ. चे ऑपरेशन झालेले असतानाही सन १९८३ मध्ये तिला दिवस गेले आणि आम्हाला परत तिसरा मुलगा झाला. एके रात्री सौ.च्या स्वप्नात बाबा आले व म्हणाले की, तुम्ही फार हळहळत होता ना! घ्या मी तुम्हाला अजून एक मुलगा दिला.

दुसरा अनुभव मला माझ्या मोठ्या मुलाबद्दल आला. तो १९८४ ला नवव्या इयत्तेत शिकत होता. त्याची परिक्षा जवळ आली असतानाच त्याला टॉयफॉईडचा ताप भरला. मी बाबांजवळ कळकळीची प्रार्थना केली की, बाबा त्याच्याऐवजी मला ताप येऊ द्या परंतु त्याची परिक्षा पार पडू द्या. आणि काय आश्चर्य! पुढील दोनच दिवसात मला ताप भरला आणि मुलाचा ताप उतरला. त्याने परिक्षा व्यवस्थितरित्या दिल्यानंतर परत माझा ताप गेला आणि त्याला ताप भरला तेव्हा माझ्या डोळ्यातून घळघळा अश्रू वाहिले.

तिसरा अनुभव अगदी ताजाच आहे. माझ्या नित्याच्या देवपूजेत २५ पैशाच्या नाण्याएवढे एका बाजूने ओम व दुसऱ्या बाजूने हनुमानाचा फोटो छापलेले नाणे आहे. एके दिवशी पूजेच्या शिळ्या फुला सोबत चिपकून ते नाणे आमच्या मागील वाड्याच्या बागेत रेतीमध्ये पडले. ते शोधण्यासाठी मी खूप प्रयत्न केला. परंतु ते सापडले नाही. मनाला खूप हळहळ लागली. त्याच रात्री बाबा सौ.च्या स्वप्नात आले व तिला त्या जागेवर नेऊन नाणे येथे शोध असे सांगितले. सकाळी उठल्याबरोबर ती त्याच जागेवर शोधायला बसली तर दोन मिनिटांत ते पूजेचे नाणे गवसले.

श्री साईमाऊली आपल्या भक्तांची किती काळजी घेतात हे यावरून दिसून येते.

# पातलो साईपदी, चालता सप्तपदी

— श्री. म.प. घोंगे
बी/४०२, ओर्ले को.ऑप. हौ.सोसायटी,
साईबाबानगर, गुरुद्वाराजवळ,
बोरीवली (पश्चिम),
मुंबई नं. - ४०० ०९२.

बालपणी मी जेथे रहात असे तेथे (माहिम) प्रत्येक वर्षी दसऱ्याला सार्वजनिक साईउत्सव होतो. सात दिवसांचा तो सोहळा पाहताना माझं मन फार आनंदीत होत असे. त्यातला विशेष दिवस म्हणजे पालखी मिरवणुकीचा. त्यादिवशी साईबाबांची फुलांनी सजवलेली पालखीची लेझीम बँडसहित भव्य मिरवणूक निघते. अधुमधून पालखीला खांदा लावण्यासाठी साईभक्तांची चढाओढ लागते. माझ्या खांद्यावर पालखी घेण्यास जेव्हा मला मिळायची तेव्हा अंगात एक वेगळाच संचार होत असे. प्रत्यक्ष साईच आपल्या खांद्यावर हात ठेवून आपल्या बरोबर चालत आहेत असा भास होत असे. तो दिव्य आनंद वर्णन तरी कसा करावा? शब्दच अपूरे पडतील.

मी विवाहबद्ध झालो आणि अशा या सोहळ्याच्या आनंदाला पारखा होऊ लागलो. कारण विवाहानंतर अपूऱ्या जागेअभावी मला (विक्रोळीला) दुसरीकडे राहण्यास भाग पडले. पालखीच्या सोहळ्याला तरी वंचित होऊ नये म्हणून त्यादिवशी मिरवणुकीत भाग घेण्यासाठी संसारी जबाबदारीतून दूर होऊन वेळात वेळ काढून मी तेथे (माहिमला) जात असे. कधी कधी जाणं शक्य होत नसे. आठवणीने मन व्याकूळ होत असे. अशा या मनाच्या व्याकुळतेने एकच ध्यास घेतला की आपलं निवासस्थान अशा ठिकाणी व्हावं की जेथे साईदरबार असावा. साईजवळ मी नेहमी माझी ही मनोकामना पूर्ण होण्याबद्दल प्रार्थना करीत असे.

आज श्रीसाईंनी माझ्या त्या इच्छेची आपल्या कृपाकटाक्षाने पूर्तता केलेली आहे. बोरीवली (प.) येथील साईबाबानगरात अगदी साईमंदिराजवळच मला त्यांच्या कृपेने माझे निवासस्थान मिळाले आहे. त्यापूर्वी ७ वर्षे मी दुसऱ्याच्या निवासी राहिलो. यावर्षी मे महिन्यातील गुरुपुष्यामृत योगाच्या सुमूहूर्तावर साईबाबा नगरात गृहप्रवेश झाला. यापूर्वीची ७ वर्षे मला सप्तपदी चालल्यासारखी वाटली. बरेच भलेबुरे अनुभव देऊन साईंनी मला जीवनातील काही तत्वे पटवून दिली. व नंतरच यशाची माळ मला अर्पण केली. सप्तपदीनंतर वधु सासरी जाते. पण मला मात्र माझे माहेर मिळाल्याचा आनंद झाला आहे. कारण दररोज बाहेर जाता-येता भव्य व नयनरम्य साईमुर्तीचे मनोहारी दर्शन होतेच. शिवाय दर गुरुवारी साईदरबारात होणाऱ्या भक्तिसोहळ्यात सहकुटुंब भाग घेण्याचा आनंद मिळतो.

हाचि गुरुकृपेचा नवलावा। जेथे काही न लव ओलावा ।।
तेथे निबर तरु फुलावा। दाट उफलावा अप्रयासे ॥

# श्री साईबाबा धावून आले आणि माझ्या मुलाला पुनर्जन्म दिला

**— श्री. लक्ष्मण देऊ धुरी**

सेंट्रल लेबर इन्स्टिट्यूट, सायन, मुंबई नं. - ४०० ०२२.

साई साई नित्य म्हणाल
सात समुद्र करीन न्याहाल
या बोला विश्वास ठेवाल
पावाल कल्याण निश्चये
घ्या ही बाबांची प्रचिती

आठ वर्षापूर्वी माझा मुलगा भुपेंद्र तीन वर्षाचा असताना डायरीया या आजाराने फार आजारी होता. तो नॅशनल हॉस्पिटल (माहीम) येथे एकोणीस दिवस ॲडमिट होता. त्याची प्रकृती फारच गंभीर होती. डॉक्टर आणि हॉस्पिटलमधील स्टाफ फारच प्रयत्न करीत होते. परंतु मुलाची प्रकृती दिवसेंदिवस अगदीच खालावत चालली होती. डॉक्टरपण म्हणाले, आम्ही फार प्रयत्न करीत आहोत परंतु मुलाची प्रकृती सध्या अधिकच गंभीर आहे. अगर चार दिवसांमध्ये मुलाच्या प्रकृतीमध्ये सुधारणा दिसून आली तर घाबरण्याचे कारण नाही. एके दिवशी मुलाची प्रकृती पहिल्यापेक्षा सिरीयस झाली. डॉ. बजाज हे नेहमी ३.३० ते ४.०० या वेळात येत असत. परंतु त्या दिवशी मुलाची प्रकृती ज्यावेळी जास्त झाली त्याचवेळी ते एक वाजता हॉस्पिटलमध्ये हजर झाले. डॉक्टरांनी पुष्कळ प्रयत्न केले. दुसऱ्या दिवसापर्यंत मुलाची प्रकृती फारच गंभीर होती. संध्याकाळचे सात वाजले होते. आम्ही सर्वजण मुलाच्या कॉटजवळ उभे होतो. मुलाने एका मोठ्या माणसाप्रमाणे बोलून दाखवायला सुरवात केली की, तुम्ही आता सर्व घरी जा, मी माझ्या घरी जातो, मला जेवायला बोलवित आहे. हे त्याचे शब्द मी ऐकताच एक मिनिटाच्या आत काय होणार हे मी समजलो. मला साईबाबांनी स्फूर्ती दिली. मी ताबडतोब मुलाचा हात हातात धरला आणि मोठमोठ्याने साई स्तोत्र म्हणायला सुरुवात केली. मी समजलो, मुलगा जर वाचला तर याच साईबाबांच्या कृपेने, असे म्हणत मी स्तोत्र बोलायला सुरुवात केली. माझ्या तोंडून साईस्तोत्र म्हणून संपले आणि काय चमत्कार! मुलगा ताबडतोब कॉटवर उठून बसला. मी जाऊन डॉक्टरांना सांगितले. डॉक्टरांना विश्वास बसेना. कारण डॉक्टर मुलाच्या कॉटजवळ येऊन मुलाच्या पोटाचे १०/१० मिनिटांनी मेजरमेंट घेऊन जात होते. अशाप्रकारे या मुलाची गंभीर स्थिती होती परंतु साईबाबांनी त्याला मृत्यूच्या दाढेतून सोडवून घेतले व त्या मुलाला बरे केले. आज हा मुलगा सहावीच्या वर्गामध्ये आहे. अवर लेडी ऑफ गुड कौन्सील हायस्कूल, सायन येथे तो शिकत आहे.

रोज संध्याकाळी न विसरता तो इतर मुलांना बरोबर घेऊन व स्वतः पेटी वाजवून साईबाबांची भजने गातो. अशा अनेक मोठमोठ्या संकटांतून बाबांनी मला वाचविले आहे, वाचवित आहेत.

# बाबा तारी त्यास कोण मारी

— श्री. शंकर हरीभाऊ चौबळ
मधुकुंज सोसायटी,
ब्लॉक नं. १०२, दाऊद बाग,
जयप्रकाश रोड, अंधेरी (प.),
मुंबई नं. - ४०० ०५८.

इ.स. १९१२ सालची हकीगत. बाबांच्या हयातीत घडलेली एक सत्य घटना. माझे वडील बंधु (कै. आत्माराम) हे न्युमोनियाने वांद्रा येथील निवासस्थानी अतिशय आजारी होते. त्यांना डॉ. तेंडुलकरांचे औषध चालू होते. पाच-सहा दिवस औषध घेतल्यानंतर डॉक्टर म्हणाले, "केस गंभीर आहे. अमावस्येचा दिवस उलटला तर केस हातात येण्याची शक्यता आहे, पण तोपर्यंत निश्चित काही सांगता येणार नाही." पहाता पहाता अमावास्येचा दिवस उजाडला आणि सर्वांच्या पोटात धस्स झाले. जसा दिवस वर जात होता, तशी काळजी वाढत होती. बघता बघता रात्रीचे दहा वाजले आणि बंधुंची प्रकृती बिघडावयास सुरुवात झाली. ते बेशुद्ध झाले. वडिलांची चिंता वाढू लागली. त्यांनी मुलाची आशा सोडून, ते बाबांच्या फोटोपुढे माळ जपत बसले. बाबांच्या पुढे समई तेवत होती. पलंगावर माझी कै. आई व मावशी दोघी शुश्रृषा करीत होत्या. रात्रीचे १२ वाजले, गडद अंधार पडला होता. कुत्र्यांचे रडणे ऐकू येऊ लागले. रात्र भयाण वाटू लागली आणि सर्व निराश झाले. वडील बाबांच्या चिंतनात मग्न होते. इतक्यात एक भयंकर चमत्कार घडला. बाबा भावाच्या पलंगाजवळ प्रत्यक्ष प्रगट झाले. बाबांनी भावाच्या अंगावरून आपला हात फिरविला. भाऊ एकदम जागा होऊन म्हणाला, "आई ते बघ, बाबा आले आहेत." आईला व वडिलांना बाबा दिसले नाहीत परंतु मावशीला बाबा दिसले. तिने त्यांना नमस्कारही केला. वडिलांना आजारी भावाचे शब्द ऐकून गहिवरून आले. त्यांनी लगेच शिर्डीस जाण्याचा निश्चय केला. बाबांचे दर्शन घेतल्याशिवाय पाण्याचा एक थेंबसुद्धा घ्यावयाचा नाही असे त्यांनी ठरविले. दुसऱ्या दिवशी दुपारी ३-०० च्या सुमारास ते शिर्डीस पोहचले व स्नान करून बाबांच्या दर्शनास गेले. दर्शन घेताक्षणीच बाबा त्यांना म्हणाले, "अरे, मी गेल्या रात्री वांद्रयास जाऊन आलो व तुझ्या मुलाच्या अंगावरून हात फिरविला. आता कोणाची हिम्मत आहे त्याच्या केसाला हात लावण्याची. काही काळजी करू नको. आल्यासारखा थोडे दिवस येथे रहा." त्याप्रमाणे वडील ३ आठवडे तेथे राहिले. बाबांची आज्ञा मिळताच ते परत घरी आले. घरी भावाच्या प्रकृतीत बरीच सुधारणा झाली होती. यावेळेपर्यंत त्याला शिर्डीस जाण्याचा योग आला नव्हता. २/३ वर्षांनी वडील त्याला शिर्डीस घेऊन गेले. बाबांच्या दर्शनास तो गेला असताना, बाबांनी त्याला चंदनाचे तेल आपल्या डोक्यास लावण्यास सांगितले. तेल लावत असताना, एक दोन थेंब बाबांच्या डोळ्यात गेले. ते पाहताच माधवराव देशपांडे म्हणाले, "मुला, बाबांच्या डोळ्यात तेल जात आहे. तू एवढा मोठा झालास तरी तुला कसे कळत नाही." असे म्हणताच,

भावाने आपला हात मागे ओढला. परंतु बाबांनी त्याचा हात तसाच धरून ठेवला व बाबा माधवरावांस म्हणाले, "शामा, त्याला बोलू नकोस. त्याला कळले पाहिजे की, मी त्याच्या आजारात कसा डोळ्यात तेल घालून बसलो होतो." ह्याचा अर्थ माधवरावांना कळला नाही. वडिलांनी नंतर सर्व हकीगत माधवरावांना सांगितली. तेव्हा ते ऐकून माधवरावांनासुद्धा गहिवरून आले. ते म्हणाले, "बाबा तारी त्याला कोण मारी." भावाचा मुक्काम शिर्डीत ३-४ दिवस होता. एक दिवस बाबा भावास म्हणाले, "अरे, आयुष्यात तुला पहिला पगार रु. ३०/- मिळेल व तू रु. ३००/- वर सेवानिवृत्त होशील." त्याप्रमाणेच तंतोतंत घडले. त्याला पहिली नोकरी सरकारी कचेरीत मिळाली. त्यावेळेस त्याला रु. ३०/- पगार होता. तो इ.स. १९५३ साली सेवानिवृत्त झाला. त्यावेळेस त्याचा शेवटचा पगार रु. ३००/- होता. म्हणजे बाबांनी जसे सांगितले तसेच घडले. बाबांचे शब्द म्हणजे ब्रह्मवाक्य. वरील हकिगतीवरून हेच सिद्ध होते की, बाबा आपल्या भक्ताच्या संकटकाळी कसे धावत येतात व त्याच्या पुढील आयुष्याची कशी तरतूद करतात.

# असे घडले साईदर्शन

**— श्री. सुरेश सातपुते**
लालबाग, मुंबई - ४०० ०१२.

फेस पावडरच्या प्रचारार्थ मला अनेक ठिकाणी जावे लागते. भिवंडी हे गाव नजिक असल्याने तेथे मी वारंवार जात असतो. भिवंडी-कल्याण ह्या मार्गावर एक अत्यंत सुंदर व चित्ताकर्षक असे साईमंदिर आहे. त्याचे बांधकामही खास प्रकारे केलेले असल्याने बस मधून जाता-येता तिन्ही बाजूंनी गाभाऱ्यातील "श्री"च्या मूर्तीचे दर्शन होते. असे असले तरी तेथे एकदातरी थांबावे असे नेहमीच वाटे. परंतु कामाच्या गर्दीमुळे ते शक्य होत नव्हते. असे किमान ३/४ वर्षे घडत होते. मात्र मंदिर दिसताच तेथे थांबलेच पाहिजे असे प्रत्येक वेळी मनात येईच येई.

— आणि एके गुरुवारी बाबांनी ही इच्छा अद्‌भुतरितीने पूर्ण केली. त्या गुरुवारी मी कल्याणहून भिवंडीस येत होतो, जी रिक्षा मिळाली त्यात चालक व त्याचे दोन मित्र बसले होते. आणि दुरूस्तीचे काम करवून ती रिक्षा आपल्या गावी म्हणजे भिवंडीस निघाली होती, म्हणजे "धंद्या"वर नव्हती. असे त्यांच्या बोलण्यावरून माझ्या लक्षात आले. त्या खेरीज त्यांच्या गप्पांचा विषय होता ड्रिंक्स व बार या संबंधी. मीही टाईमपास म्हणून त्या गप्पा निर्हेतुक ऐकत होतो. प्रवास चालूच होता. सर्वसाधारण दोन-एक किलोमिटरवर मंदिर असावे, पुन्हा दर्शनाची प्रबळ इच्छा झाली. वाटले सांगावे त्यांना. पुन्हा वाटले गप्पावरून ही मंडळी काही भाविक दिसत नाहीत. उगाच कशाला "नाही" म्हणून घ्या. लगेच साईबाबा आठवले. म्हटले पाहू या. बाबा दर्शन घडवितात का?

आपण काही स्वतःच्या तोंडाने यांना विनंती करावयाची नाही. म्हणून मग साईस साकडे घालून गप्पच राहिलो. काही काळ प्रवास झाला.

साई मंदिर आता वेगांत नजिक येत होते. पहाता पहाता ते दिसूही लागले. परत विनंती करण्याची जोरदार उर्मी आली पण तरीही बोललो नाहीच. कारण तसेच ठरविले होते ना. इतक्यात त्यांच्यातील एक जण म्हणाला —

"ए! साईबाबांच्याकडे घे की रे? परत रात्री यायला नको!"

चालक म्हणाला, "बरं!"

इतक्यात तिसरा म्हणाला — "ए, आता नको! रात्री येऊ परत."

माझी किंचितशी घालमेल झाली. परत पहिला म्हणाला—

"ए, रात्री परत कशाला? आताच चला! नंतर मला म्हणाला, थोडा वेळ थांबू. तुम्हाला उशीर नाही ना होणार? मी मनात कृतज्ञतेने गहीवरलो.

म्हणून काही उत्तर केलं नाही. त्यांची आपसात 'हो'-'ना' अशी चर्चा झाली. परंतु चालकाने सरळ रिक्षा मंदिराचे प्रांगणात नेऊनच उभी केली. सर्वांनी चपला वगैरे रिक्षांतच ठेवून आरामात साईदर्शन घेतले. पाच दहा मिनीटे मंदिरात घालवून पुन्हा भिवंडीच्या दिशेने निघालो. त्या रिक्षावाल्यांनी मला १ रु. कमी दर आकारून इच्छित स्थळी सोडले. हे दुसरे आश्चर्य! कारण त्या स्थळापर्यंत रिक्षा जात नाहीत.

— असे होते "त्या" गुरुवारचे साई संकल्पित दर्शन. साईंनी फार दिवसांची मनोकामना अकल्पित मार्गाने पूर्ण केली.

# अरे साईनाथा

नाही मजला आधार कुणाचा
तुजवीण अरे साईनाथा ।। धृ ।।
शिर्डीचे सिंहासन तुझे
किर्तीचा डंका त्रिभुवनी गाजे
राहूनीया स्वतः शांत
मजलाही दावी मार्ग शांतीचा
अरे साईनाथा ।। १ ।।
हृदयमंदिरी तव मूर्ती रेखिली
परम सुखाची खाण गवसली
आनंदाचे अमृत शिंपता
घट देई मज तव मायेचा
अरे साईनाथा ।। २ ।।

गावू दे मन तुझीच गाथा
तव चरणावरी ठेवू दे माथा
भक्तांच्या मनात रंगता
रंग दे मजलाही भक्तीचा
अरे साईनाथा ।। ३ ।।
अवघे जीवन होवू दे साईमय
नाही मग उरले कोणतेच भय
भक्तांची अंतरे पूजिता
मज लाभू दे आसरा साई माऊलीचा
अरे साईनाथा ।। ४ ।।

**सौ. नीता उल्हास जाधव**
६२९, सरेकर आळी,
महाड, रायगड.

# सेवाभावी साईनाथ

— श्री. दत्ताराम पुंजाजी धुगे
विशेष कार्यकारी दंडाधिकारी
३/३७, रमेशचंद्र चिमणलाल चाळ,
ताडदेव, मुंबई-४०० ०३४.

शिरडीत साईबाबांच्या दर्शनाला दुरून-दुरून भक्त मंडळी येत असत, येत आहेत. काही आपला आजार बरा होण्यासाठी, तर काही आपली संकटे नष्ट करण्यासाठी, पुत्रप्राप्तीसाठी, धंद्यात प्रगतीसाठी. श्री साईबाबांच्या हयातीत गुरुचरणी दिवसेंदिवस भक्तगण वाढतच होता. साईबाबा आपल्या अलौकिक शक्तीवर, सुरुवातीला झाडपाल्याची औषधे देत. त्यानंतर आपल्या पेटत्या धुनीतील उदी औषध म्हणून देत. ती उदी कोणत्याही रोगावर जालीम इलाज करीत असे. तीच उदी आजपर्यंत गुणकारी औषध ठरत आहे. साईबाबांनी स्वतःला कधीही महात्मा अथवा परमेश्वर म्हणवून घेतले नाही. तर साईबाबा नेहमी स्वतःला ईश्वराचा बंदा सेवक म्हणत असत. बाबा शिष्यांना स्वतःस कधीही गुरू म्हणू देत नसत. परंतु ते आपल्या गुरुची एकनिष्ठेने पूजा करीत असत. लिंबाच्या झाडाखाली बाबा मंत्र पुटपुटत गुरुचे चिंतन करीत असत. बाबांनी ती जागा सेवकांना खणायला लावली. खोदल्यानंतर त्या जागेच्या खड्ड्यात दोन बत्त्या पेटलेल्या होत्या, फुलं होती. हे दृश्य पाहिल्यावर भक्तगण आश्चर्यचकित झाले आणि त्या कडुलिंबाचा पाला गोड लागू लागला. आणि शिरडी गावातील लोकांना साईबाबांचे खरे महत्त्व पटू लागले.

साईबाबांनी शिरडीवर आलेल्या अनेक नैसर्गिक आपत्तींवर आपल्या प्रचंड सामर्थ्याने मात केली. ते सदैव भक्तांच्या पाठीशी आधारस्तंभ म्हणून उभे राहिलेले आहेत. एवढेच नव्हे तर वेळप्रसंगी बाबांनी भक्तांची दुखणी आपल्या अंगावर घेवून स्वतःचा कधीही विचार केला नाही, निस्वार्थपणे जनसेवा केली. शेवटपर्यंत त्यांनी आपला देह जनहितासाठी चंदनासारखा झिजवला.

अमरावतीचे दादासाहेब खापर्डे यांची पत्नी आपल्या मुलाला घेऊन शिरडीत बाबांच्या दर्शनाला आली होती. शिरडीमध्ये मुलाला प्लेग होऊन तो तापाने विव्हळू लागला. त्याच्या आईला काही सुचेनासे झाले. तिने बाबांना विनंती केली. बाबा तिला म्हणाले, तुम्ही मुलाची काळजी करू नका, तुमचा मुलगा बरा झाला आहे कारण त्याचे दुखणे मी स्वतः घेतले आहे. खरोखरच बाबांच्या काखेत अंड्याएवढी गाठ आली होती आणि दादासाहेब खापर्डेंचा मुलगा बरा झाला.

एका बाईचे सहा वर्षापासून डोके दुखायचे. तिची डोकेदुखी बाबांनी कायमची बंद केली. ती साईबाबांच्या चरणी डोके ठेवून आनंदीत झाली.

नांदेड शहरातील रतनजी मोठे व्यापारी. त्यांना बारा मुली होत्या पण एकही मुलगा नव्हता. ते नेहमी मनातून अस्वस्थ रहात. अशावेळी त्यांना दासगणू महाराजांनी बाबांचे दर्शन घेण्यास सांगितले. रतनजी कामाच्या व्यापामुळे शिरडीला जाऊ शकत नव्हते. रतनजीच्या भेटीसाठी संत मौलीसाहेब अचानक घरी गेले. शेठजींनी मौलीसाहेबांना

भक्तीभावाने घरात बोलावून त्यांची पूजा केली. पुष्पहार-पेढे-बर्फी त्यांना अर्पण केले. मौलीसाहेब प्रसन्न होऊन थेट शिरडीला गेले. काही दिवसांनी रतनजी शिरडीस गेले, त्यांनी बाबांना नमस्कार केला. तेव्हा साईबाबा त्यास म्हणाले, पूर्वी तू मला तीन रुपये चवदा आणे दक्षिणा दिलीस. जा, अल्ला मालीक तुझी इच्छा पूर्ण करो, तुझ्या मनासारखे होईल. हे ऐकताच रतनजी शेठजींना संत मौलीसाहेब भेटल्याचा उलगडा झाला. त्यांना काय वस्तू भेट दिल्या होत्या हे सुद्धा पटले. आणि सद्‌गुरू साईबाबांच्या आशीर्वादाने रतनजी शेठ यांना पुत्रलाभ झाला, त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. अशी कैक उदाहरणे श्री साईबाबांच्या महानतेची प्रचिती देतात.

# जपाचे महत्त्व

अनादी कालापासून मानवी जीवनात जपाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मन आणि सर्व इंद्रियांना काबूत आणणे, स्मरणशक्ति वाढविणे, सद्‌गुणांचा परिपोष करणे, चित्तवृत्ती शांत ठेवणे, मन एकाग्र करणे ह्या गोष्टी जपाने साध्य होत असतात. व्यवहारी जीवनात जगत असताना विवेक बुद्धीने विचार करण्याची कुवत जपामुळेच प्राप्त होत असते. सद्‌आचरण करणाऱ्या, सद्‌गुणी व सद्‌विचारी व्यक्तिंनी आपल्या इष्ट देवतेच्या मंत्राचा जप करताना मन व वातावरण प्रसन्न राहण्यासाठी पुढील गोष्टी केल्यास दुधात साखर पडल्याचा आनंद त्यांना लाभेल.

★ जपाला बसताना, स्नान करून धूत वस्त्र नेसून शुद्ध व प्रसन्न मनाने, पूर्वेकडे तोंड करून, पद्मासन घालून, सुती किंवा लोकरीच्या स्वच्छ बैठकीवर बसावे.

★ कुलदेवतला नमस्कार करुन व इष्ट देवताचे ध्यान करून शुद्ध मनाने जपाला सुरुवात करावी.

★ जपातील सर्व शब्दांचा उच्चार, स्पष्ट व शुद्ध करावा.

★ स्वच्छ व शांत जागी आसन घेऊनं बसावे. जप करताना मध्यंतरी बोलणे, उठणे वगैरे काही करू नये. मांडीही बदलू नये. मन एकाग्र करून जप करावा.

★ मंत्रातील शब्दांचा अर्थ समजून घेऊन मंत्राचा जप करावा. जपमाळ चांगली व स्वच्छ असावी.

★ जपाला सुरुवात केल्यानंतर, दररोज कमीत कमी एक माळ (एकशे आठ वेळा) तरी जप करावा. खंड पडू देऊ नये. नियमितपणे केलेल्या जपाला फार महत्त्व आहे.

★ मंत्राचा १४ लक्ष जप झाला की एक पुरश्चरण पूर्ण होते. एक माळ (एकशे आठ जप) म्हणजे जप शंभर समजावा.

★ जप करताना जपमाळ, मधल्या बोटाच्या मधल्या पेरावर ठेवावी. अंगठ्याने मणी खाली ओढावा. माळ पिशवीत ठेवावी. माळ व पिशवी स्वच्छ असावी.

★ जप संपल्यावर उच्चारात अगर दुसऱ्या कोणत्या बाबतीत चूक झाली असेल, तर त्याबद्दल ज्या देवताच्या मंत्राचा जप असेल त्याचे ध्यान करून क्षमा मागावी.

★ कोणत्याही कार्याला प्रारंभ करण्यापूर्वी कुलदेवतेचे नामस्मरण करणे महत्त्वाचे आहे. अन्यथा सर्व व्यर्थ होय.

# शिरडी वृत्त

## सप्टेंबर १९८६

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी भक्तांची गर्दी नेहमीप्रमाणे होती. रविवार, गुरुवार, सणांचे सुटीचे दिवशी बरीच गर्दी होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे —

कीर्तन :- १) ह.भ.प. मधुकर गणेश सुर्यवंशी, संस्थान गवई, कीर्तनकार, प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्त्वाचे दिवशी झाली.

प्रवचन :- १) ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिरडी २) ह.भ.प. विश्वनाथ महाराज, सुराळे.

**भजन, गायन, वादन इ. :-** १) श्रीमती शोभा राजू, हैद्राबाद २) शाहीर गहिनीनाथ देशमुख, मालेवाडी ३) श्री. दशरथ सुखसे ४) श्री. दगडू गोळे ५) श्री. विठ्ठल बोहंडवे ६) श्री. रामदास रणदिवे ७) सौ. शांताबाई पिंजण ८) श्री. सुरेश आवळे ९) श्री. विश्वनाथ भिमा पागल १०) श्री. विक्रम त्रिभुवन, वैजापूर ११) श्री.एम.बी. शिदोडकर, पंढरपूर १२) श्री. नंदकुमार वासूदेव सामंत, बोरीवली १३) कु. रंजना जाधव, फलटण १४) श्री. सुधी सराफ, पंचवटी १५) श्री. माथुरदास बाबा १६) कु. मंदाकिनी उजागरे १७) श्री. विनोद पटवर्धन १८) श्री. वाजपेयी १९) श्रीमती सिद्धेश्वरी शर्मा, सिहोर २०) श्री. दौलतभाई, मुंबई २१) श्री. अरुण सोमानी, संगमनेर २२) श्रीमती सुजाता चौधरी, परभणी २३) श्री. पृथ्वी वेंकटेश्वर राव, हैद्राबाद २४) श्री. जयवंतराव कुळकर्णी, मुंबई २५) श्री. अनंतराव पांचाळ २६) श्री. मनोहर कदम २७) श्री. बाळकृष्ण बुवा कदम २८) श्री. अशोक कदम २९) सौ. पुष्पा पागधरे ३०) श्री. वसंतकुमार ३१) श्री. बाळ साठे.

**हवापाणी :-** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

## ऑक्टोंबर १९८६

या महिन्यात श्री साईबाबांचा पुण्यतिथी उत्सव आल्याने बाहेरगांवचे साईभक्तांची गर्दी जास्त प्रमाणात होती.

**दसरा उत्सव प्रारंभ दिन :- शनिवार, दि. ११.१०.८६ —** रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५.१५ वा. काकड आरती झाली. आरती संपल्यानंतर ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधी मंदिरातून गुरुस्थानमार्गे द्वारकामाईत आली. त्या ठिकाणी श्री साई सत् चरित्र अध्याय वाचनास सुरवात झाली. सकाळी ६.३० वा. श्रींचे स्नान झाल्यानंतर नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त दु. ४.०० ते ६.०० पर्यंत ह.भ.प. मनुमहाराज कोकलेगांवकर, नांदेड यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. सायंकाळी धुपारती झाल्यानंतर ७.३० ते ९.०० मंदिरासमोर स्टेजवर व ११.३० ते पुढे मंदिराबाहेर

सौ. आसावरी वायकुळ, मुंबई यांचा गायन कार्यक्रम झाला. रात्रौ ९.१५ ते ११.१५ पर्यंत श्रींच्या पालखीची गावातून मिरवणूक निघाली. मिरवणूक वाद्यांच्या गजरात फिरून आल्यानंतर शेजारती झाली.

**मुख्य दिवस - दसरा - रविवार, दि. १२.१०.८६ —** पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५.१५ वा. काकडआरती सुरू झाली. ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक द्वारकामाईतून निघून गुरुस्थानमार्गे समाधि मंदिरात आली. नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळी ९.०० वा. भिक्षाझाळी कार्यक्रम सुरू झाला. संस्थान विश्वस्तांसाठी १० व साईभक्तांसाठी २० झोळ्या ठेवण्यात आल्या होत्या. विश्वस्तांनी आपसात ठरवून झोळ्या घेतल्या व भक्तांसाठी झोळी घेऊ इच्छिणाऱ्या भक्तांची नावे नोंदवून सोडत पद्धतीने वीस (२०) भाग्यवान साईभक्तांना निवडण्यात आले. मंदिर प्रमुख श्री. वि. वि. बागवे यांनी त्यांची नांवे नोंदवून त्यांना झोळ्या दिल्या. शिरडी गावात घरोघर भिक्षेसाठी गेल्यावर सुवासिनींनी श्रींच्या निशाणाची पूजा, आरती करून भिक्षा झोळीत गहू, ज्वारी, बाजरी, तांदुळ, नारळ, फळे, पैसे अशी भिक्षा यथाशक्ती अर्पण करून प्रसाद घेतला. झोळी कार्यक्रम संपल्यानंतर धान्य, पैसे संस्थान मध्ये जमा करून झोळ्या मंदिर प्रमुख यांचेकडे जमा करण्यात आल्या. सकाळी १०.३० ते १२.०० ह.भ.प. मनु महाराज कोकलेगांवकर, नांदेड यांचे साईबाबा पुण्यतिथी अख्यान कीर्तन झाले. त्यानंतर माध्यान्ह आरती झाली व तीर्थप्रसाद वाटण्यात आला.

दुपारी १.०० ते ३.०० वाजेपर्यंत श्रींच्या आराधना विधीचा कार्यक्रम झाला. ब्राम्हणांना धोतर, उपरणे, सुवासिनींना खण व सेवेकऱ्यांना धोतरजोड व कापड देण्यात आले. सायंकाळी ५ वा. सिमोल्लंघन मिरवणूक वाजत गाजत खंडोबाचे देवळाजवळ गेली. त्या ठिकाणी श्रींच्या निशाणाची व शमीची पूजा झाल्यानंतर सोने लुटण्याचा कार्यक्रम झाला. त्यानंतर उपस्थित साईभक्तांनी खंडोबा देवाचे दर्शन घेतले व मिरवणूक परत येतेवेळी गावातील सर्व मंदिरात जाऊन देवतांचे दर्शन घेतले.

रात्रौ ९.१५ ते १२.०० पर्यंत श्रींच्या रथाची गावातून भव्य मिरवणूक निघाली होती. मिरवणूकीला श्रीकृष्ण बॅण्डपथक, मुंबई अग्रभागी होते. सनई, चौघडा, डफ व राहाता येथील बॅण्डपथक बरोबर होते. साईभक्तांचे गायन, वादन, भजन इ. कार्यक्रम झाले. श्री. रघुनाथ बाबुराव सांडभोर, सिने-कलाकार पुणे यांचा भारूड कार्यक्रम झाला. ग्रामस्थांनी गारूड-भारूड कार्यक्रमात भाग घेतला. रात्रभर कलाकारांच्या हजेऱ्या झाल्या. श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले होते.

**दसरा उत्सव - तृतीय दिन - सोमवार, दि. १३.१०.८६ —** ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. गुरुस्थान ठिकाणी ७.३० ते ८.३० रुद्राभिषेक झाला. नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त रात्रौ ८.३० ते १०.०० पर्यंत ह.भ.प. श्री. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिरडी यांचे एकादशी-प्रवचन झाले. १० वा. शेजारती झाली. शेजारतीनंतर रात्रौ मंदिराबाहेर शांतीनिवास जवळ स्टेजवर "डॉ.कैलास" हे तीन अंकी नाटक, नाट्य रसिक संघ, शिरडी यांनी सादर केले.

**दसरा उत्सव - सांगता दिन - मंगळवार, दि. १४.१०.८६ —** पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५.१५ वा. काकडआरती झाली. नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळी १०.३० ते १२.०० ह.भ.प. मनु महाराज कोकलेगांवकर, नांदेड यांचे कालाकीर्तन झाले. दहीहंडी कार्यक्रम झाल्यावर माध्यान्ह आरती झाली व तीर्थप्रसाद वाटण्यात आला. धुपारतीनंतर रात्रौ ७.३० ते १०.०० पर्यंत श्री. अजित कडकडे, मुंबई यांचे गायनाचा कार्यक्रम झाला. १० वा. शेजारती झाली व उत्सव समाप्त झाला.

**कोजागिरी पौर्णिमा :—** शुक्रवार दि. १७.१०.८६ रोजी रात्रौ ७.३० ते ८.३० कीर्तन कार्यक्रम कै. डॉ. के.बी. गव्हाणकर आणि पार्टी, मुंबई यांनी केला. रात्रौ ९.४५ वा. श्री साईबाबांची पूजा संस्थान पुरोहीत यांनी व चंद्रग्रहण असल्याने चंद्रपूजा कार्यक्रम मा. कार्यकारी अधिकारी, श्री. रा.द. बन्नेसाहेब यांचे हस्ते झाला. १० वा. शेजारती झाल्यानंतर मंदिर बंद झाले. उपस्थित भक्तमंडळींना दुध, पोहे, वगैरे प्रसाद वाटण्यात आला. मंदिराबाहेर शांतीनिवास जवळ स्टेजवर रात्रौ ११.०० ते सकाळी ६.०० वाजेपर्यंत कै. डॉ. के.बी. गव्हाणकर आणि पार्टीतील सहकाऱ्यांनी ''रूप घोड्याचं गुण गाढवाचं'' हा लोकनाट्य कार्यक्रम सादर केला.

या महिन्यात कलाकारांनी खालीलप्रमाणे हजेरी दिली.

कीर्तन :- १) ह.भ.प. मधुकर गणेश सूर्यवंशी, गवई कीर्तनकार, प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्त्वाचे दिवशी झाली. २) ह.भ.प. मनु महाराज कोकलेगांवकर, नांदेड ३) ह.भ.प. सौ. सहस्त्रबुद्धे, मुंबई ४) ह.भ.प. मयसिंग महाराज, डोंगरगाव ५) ह.भ.प. शिवनाथ महाराज, लिहादा (अमरावती).

प्रवचन :- ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिरडी.

**भजन, गायन, वादन इ. :—** १) श्री.ए. सांबाशिवाराव, मछलीपट्टण २) श्री. सुभाष हिलगे, कोल्हापूर ३) श्री. दिनेश इनामदार ४) श्री. विजय दळवी ५) श्री. अशोक उपाध्ये ६) श्री. सुरेश मोरे ७) श्री. बापु संकपाळ ८) श्री. सुनील धारवाड ९) श्री. धिरजकुमार वाकरेकर १०) श्री. बाळ शिंदे ११) श्री. मामा बेडेकर १२) श्री. मधुकर राव १३) कु. निर्मला मंगेशकर १४) आशु वराळे १५) अरुणा वाकरेकर १६) कल्पना शिंदे १७) श्रीमती वराळे १८) श्री. सुरेश मयर, संगमनेर १९) श्री. दिपक शांताराम शहरकर २०) श्री. विजय रामकिसन वर्मा २१) श्री. महेश विनायक राजूरकर २२) श्री. इंगळे बाबा, संगमनेर २३) श्री. रामचंद्र जगन्नाथ कवळे, पिरोडे २५) श्री. श्रीकांत मोघे, सातारा २६) श्री. नवरात्र गुजराथी मंडळ, शिरडी २७) श्री. एम. के. सक्सेना, दिल्ली २८) श्री. परदेशी २९) श्री. श्रीराम सातर्डेकर ३०) श्री. बाळासाहेब कुलकर्णी, लक्ष्मीवाडी ३१) सौ. आसावरी वायकुळ, मुंबई ३२) श्री. विलास वायकुळ ३३) श्री. निनाद वायकुळ ३४) श्री. गोविंद हरचेकर ३५) श्री. सदा जाधव ३६) श्री. वसंत लाखण ३७) श्री. जनार्दन लाखण ३८) श्री. वसंत पांडुरंग शेतक ३९) श्री. रघुनाथ बाबुराव सांडभोर, पुणे ४०) श्री. शाहीर गफुर शेख, पुणे ४१) श्री. सहादु विठोबा वाघमोरे, पुणे ४२) श्री. नारायण क्षीरसागर, औरंगाबाद ४३) श्री. भोलानाथ समेळ, मुंबई

४४) श्री. दौलत शर्मा, मुंबई ४५) श्री. सखाराम राघुजी गुरव, कोपरगांव ४६) श्री. हरकचंद चंद्रभान रुणवाल, आलेगांव ४७) श्री. नाना गोविंद गवते, विटावा ४८) श्री. अनिल उत्तखार, नांदेड ४९) श्री. विष्णु दयाळ खीदास, उन्हाव ५०) श्री. रामचंद्र जगन्नाथ कावळे, विरोडे ५१) श्री. दत्ता घाग, मुंबई ५२) श्री. तुकाराम परदेशी, शिरडी ५३) सौ. रेखा मडावी, भिंगार ५४) श्रीमती प्रमिला दत्तात्रय पंडीत, कोपरगांव ५५) श्री. विश्वास जोशी, राजगुरुनगर ५६) श्री. पंडितराव रामचंद्र जोशी, राजगुरुनगर ५७) श्री. पांढुरे, मुंबई ५८) श्री. दिप गांगुली, मुंबई ५९) श्री. नामदेव नागु भोईर, नवघर ६०) श्री. सी.व्ही. प्रसाद, हैद्राबाद ६१) श्रीमती एन. गुप्ता ६२) श्री. पंजाब दवंगे, शिरडी ६३) श्री. रघुवीर शांताराम मिराणे, शिरडी ६४) श्री. दिगंबर भातोडे, रहाता ६५) श्री. शशीकांत नागरे ६६) श्री. मधुसुदन आवटी, गणेशनगर ६७) कु. शेखर नटवरलाल विसपूते, शिरडी ६८) श्री. ज्ञानेश्वर वैद्य, शिरडी ६९) श्री. अशोक गुंजाळ, शिरडी ७०) श्री. शेख नबाब उमरपटेल, अस्तगांव ७१) श्री. दत्तात्रय करडीले, अस्तगांव ७२) श्री. हिरालाल उपाध्याय, लक्ष्मीवाडी ७३) श्री. नारायण गंगाराम रोडगे ७४) श्री. वाल्मीक कचरू शेलार, वैजापूर, ७५) श्रीमती लिलावती गुजराथी, शिरडी ७६) श्री. बालमभाई पापाभाई बॅण्ड, रहाता ७७) श्री. नौरे के. इराणी, मुंबई ७८) श्री. एकनाथ जामखेडकर, आंबड ७९) श्री. गोकुळ मारुती घोडके, शिरडी ८०) श्री. ज्ञानोबा तात्या बाडेकर, शिरडी ८१) श्री. श्रीकृष्ण बॅण्डपथक, मुंबई ८२) श्री. जतर्धन नागरे, शिरडी ८३) श्री. रघुनाथ नागरे, शिरडी ८४) श्री. बारावकर काका ८५) श्री. माणिक साळी ८६) श्री. शांताराम मिराणे ८७) श्री. मधुकर निवृत्ती भालेराव ८८) श्री. ओ. पी. पवार ८९) श्री. नाट्य रसिक संच, शिरडी ९०) श्री. एच. ए. पटेल ९१) सौ. एम. एच. पटेल ९२) श्री. पी. आर. यादव ९३) श्री. एम. आर. आंबोडकर, लक्ष्मीवाडी ९४) श्री. एस. एस. कोटस्थाने, शिरडी ९५) सौ. एस. एम. आंबोडकर ९६) कॅप्टन गोपालशेट्टी, साकरवाडी ९७) श्री. बी. आर. काळपांडेसाहेब, रावळगांव ९८) श्री. एस. एस. वाघ, साकरवाडी ९९) श्री. कल्याण रामचंद्र पत्तेवार, नांदेड १००) कु. उज्ज्वला मनोहर कोकलेगांवकर १०१) श्री. नंदू चव्हाण, मुंबई १०२) श्री. केदार म्हात्रे १०३) सौ. धनश्री चव्हाण १०४) श्री. बिच्चु अय्यर १०५) श्री. शशीकांत दळवी १०६) श्री. सतीश राव, मुंबई १०७) श्री. विलास महाडीक १०८) श्री. ओंकार विलास परळकर, मुंबई १०९) श्री. बारकू शेठ मांडवकर, मुंबई ११०) श्री. अजित कडकडे, मुंबई १११) सौ. अनुराधा पिंपळगांवकर, पुणे ११२) श्री. साई बँकर ११३) श्री. जगदीश मयेकर ११४) श्री. प्रदीप केरकर ११५) श्री. दत्ता जोगदंडे ११६) श्री. श्रीकृष्ण लघाटे ११७) श्री. सुरेश [illegible]र्लेकर ११८) कु. प्रेमा भोजणे ११९) श्री. महेश सावर्डेकर, मुंबई १२०) श्री. मार्तंड लक्ष्मण भागवत १२१) सौ. बन्साबाई बाधवारे, नेवासा १२२) श्री. शंकर पवार १२३) श्री. नाथा कावंडे १२४) श्री. शरद मुसळे १२५) श्री. रामराव गोविंदा डूकरे १२६) श्री. शशीकांत पुसाळकर, मुंबई १२७) श्री. कृष्णराव सुर्वे, मुंबई १२८) श्री. दिदारसिंग १२९) श्री. रमेश दासगांवकर १३०) श्री. दत्तात्रय कृष्णराव सुर्वे

१३१) श्री. सुरेश इनरकर १३२) श्री. मंजूनाथ आचार्य १३३) श्री विलासबुवा पाटील, मुंबई १३४) सौ. पद्मजा रघुनाथ सहस्त्रबुद्धे, घाटकोपर १३५) श्री. आप्पा सामंत १३६) श्री. रमेश धनावडे १३७) श्री. प्रदीप कृष्णा लाड १३८) श्री. रामदास पाटील १३९) श्री. शाहीर दत्ता ठुले, मुंबई १४०) श्री. रमेश अनंत राणे १४१) श्री. काशीनाथ बाळासो. गवळी १४२) श्री. गोपाळ सीताराम बोभाटे १४३) श्री. अशोक अनंत परब १४४) श्री. दामोदर शंकर पाटोळे १४५) श्री. रमाकांत पवार १४६) श्री. दत्ता कदम १४७) श्री. ज्ञानेश्वर भि. ढोरे १४८) श्री. ज्ञानेश्वर हंसा मोरे १४९) श्री. बाबुराव नारायण घाडगे १५०) श्री. बाळकृष्ण लक्ष्मण महाब्दी १५१) कु. संगीता मोरजकर १५२) सुलोचना उरणकर १५३) श्री. सदानंद परशुराम सावंत १५४) श्री. सुभाष अंकुश आरोसकर १५५) श्री. हरीश्चंद्र विठ्ठल पवार १५६) श्री. मारुती धोंडू बोते १५७) शाहीर तळसंदेकर १५८) श्री. तानाजी गोपाळ चिखलकर १५९) श्री. ह.भ.प. सहस्त्रबुद्धे १६०) शाहीर सुखदेव कांबळे १६१) श्री. विनायक कृष्णा लाड १६२) श्री. प्रफुल्ल गजानन राजापूरकर १६३) श्री. शांताराम केशव काळेबेरे १६४) श्री. मोहन नारायण पावटे १६५) श्री. माणिक धोंडु काळे १६६) श्री. सुधाकर बाबूराव पाटील १६७) श्री. नामदेव गुलाबराव केणी १६८) श्री. अनंत गोपाळ तावडे १६९) श्री. एकनाथ दत्ताराम बोभाटे १७०) श्री. दिपक भागोजी मोर १७१) श्री. अंनत दत्ताराम पांचाळ १७२) श्री. प्रवीण कायाप्पा सोनवणे १७३) श्री. एकनाथ दशरथ धनावडे १७४) श्री. शिरीष मोहन १७५) श्री. प्रकाश शिंदे १७६) श्री. स्वामीनाथ बाबूराव कांबळे १७७) श्री. वसंत गवाणकर १७८) श्री. सुधीर गव्हाणकर १७९) श्री. हरीश गव्हाणकर १८०) श्री. विलास दत्तात्रय भेदार १८१) श्री. दत्तात्रय संभाजी परब १८२) श्री. उल्हास सदानंद साप्ते १८३) श्री. गणेश दत्ताराम धावडे १८४) श्री. बाबा घाडी १८५) श्री. पांडुरंग मारुती लाड १८६) श्री. प्रताप गजानन जुकद १८७) श्री. गुलजार भजनी मंडळ १८८) श्री. अरुण सोमानी १८९) श्री. रामस्वामी १९०) श्री. डॉरामलिंगम ॲण्ड पार्टी, हैद्राबाद १९१) श्री. एस. साईनाथ १९२) कु. कल्पना विश्वनाथ १९३) श्री. शैलेंद्र कुमार १९४) श्री. पी. अंजय्या १९५) श्री. गोपाल चौरासिया १९६) श्री. दत्तू शंकर घुमरे, खेडलेझुंगे १९७) श्री. ज्ञानदेव किसन जगताप १९८) श्री. केदु पंगारा १९९) श्री. तानाजी चौधरी २००) सौ. तितिक्षा बलसारी, मुंबई २०१) डॉ. व्ही.के. भाटे २०२) श्रीमती चंद्राबेन व्ही. भाटे २०३) कु. कृष्णा व्ही. भाटे २०४) श्री. अनुरागकुमार श्रीवास्तव, गोरेगाव २०५) श्री. अनिलकुमार पकारे, सांताक्रुझ २०६) श्री. राजन पटेल.

**हवापाणी :—** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पहाटे थंड आल्हाददायक हवा असते.

> 'ईश्वरपूजा म्हणजे त्याच्या गुणांचे चिंतन. तो अतर्क्य व अवर्णनीय आहे, तरी सृष्टिक्रमावरून समजतो. त्याची पूजा करण्यासाठी जिथे व ज्यावेळी मन शांत असेल, ती जागा व ती वेळ चांगली'.
>
> **— राजा राममोहन राय**

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ३१-०० | ६-५० |
| २. | —''— | इंग्रजी | १४-५० | ५-२५ |
| ३. | —''— | हिंदी | ८-५० | ५-२५ |
| ४. | —''— | गुजराथी | १९-०० | ५-२५ |
| ५. | —''— | कन्नड | १०-०० | ४-०० |
| ६. | —''— | तेलगु | — | — |
| ७. | —''— | तामीळ | — | — |
| ८. | —''— | सिंधी | २२-०० | ४-५० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | ६-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | — | — |
| ११. | —''— | हिंदी | १०-५० | ४-०० |
| १२. | —''— | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६-०० | ४-०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | —''— | हिंदी | १-०० | ३-५० |
| १६. | —''— | गुजराथी | — | — |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | —''— | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | —''— | गुजराथी | ०-८० | ३-५० |
| २०. | —''— | तेलगु | — | — |
| २१. | —''— | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | — | — |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | १-६५ | ३-५० |
| २५. | —''— | इंग्रजी | १-६५ | ३-५० |
| २६. | —''— | हिंदी | १-६५ | ३-५० |
| २७. | —''— | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | —''— | तेलगु | २-०० | ३-५० |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | ०-८० | ३-५० |
| ३०. | मार्गदर्शिका (शिर्डी गाईड) | मराठी | १-५० | ३-५० |
| ३१. | —''— | इंग्रजी | १-५० | ३-५० |
| ३२. | —''— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| ३३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ७-२५ | ४-०० |
| ३४. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ६-५० | ४-०० |
| ३५. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-०० | ४-०० |
| ३६. | अष्टोत्तर शत नामावली | मराठी | १-०० | ३-५० |
| ३७. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |

Regd: No. MH/BYE/26
LICENCE No. 19
Licence to Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14.

# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## फोटोंची यादी

| अनु. क्र. | फोटोचे नांव | साईज | किंमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|---|
| १. | द्वारकामाई फोटो (प्लॅस्टिक कोटेड) | १७" x २२" | ३-५० | ३-५० |
| २. | —"— | १४" x २०" | १-५० | ३-५० |
| ३. | —"— | ७" x १०" | ०-६० | ३-५० |
| ४. | दगडावर बसलेले साईबाबा (काळा/पांढरा) | १४" x २०" | ०-८० | ३-५० |
| ५. | मूर्ती फोटो | १४" x २०" | १-५० | ३-५० |
| ६. | —"— | १०" x १४" | ०-९० | ३-५० |
| ७. | —"— | ७" x १०" | ०-६० | ३-५० |

**पुस्तकं आणि छायाचित्रे मिळण्याचे ठिकाण :—**

१. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान,
पो. शिरडी, ता. कोपरगांव, जि.- अहमदनगर.

२. साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई-४०० ०१४.

मुद्रक : श्री. एम.डी. राजन, गीता ऑफसेट, बी - २३ रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट,
नायगांव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई - ४०० ०३१.
**संपादक व प्रकाशक :** श्री. रा.द. बत्रे, साई निकेतन,
डॉ. आंबेडकर मार्ग, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०४ बी.,दादर, मुंबई - ४०० ०१४.